
शब्द
# रुची

४५

मार्च २०२१
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६०




storytel

# शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे

**यांच्या प्रेरणादायी आवाजातील**

**पंधरा दुर्मिळ व्याख्यानांचा खजिना फक्त स्टोरीटेल ॲपवर!**

**आजच डाऊनलोड करा!**




QR code स्कॅन करा
किंवा www.storytel.com
या वेबसाईटला भेट द्या.

Download on the App Store
GET IT ON Google Play

*T&C apply.

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**मार्च २०२१, वर्ष आठवे**
**अंक अकरावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर, अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **प्रदीप म्हापसेकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, सहकारी – सुमेधा कुवळेकर**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☏ २४२१६०५० / २४३०६६२४
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**


**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४५

## अनुक्रम

- **शिरीष वीरकर** / ६
  वेलू तयाचा गेला गगनावेरी
- **विद्या हर्डीकर-सप्रे** / ८
  आठवणींची मोरपिसे
- **नीरजा** / १०
  तिसरा डुळा - दुंगभलेल्या आयुष्याचा लेखाजोखा
- **हर्षदा सुंठणकर** / १२
  किरण येलेंच्या साहित्यातील स्त्री
- **राजीव श्रीखंडे** / १५
  कमला हॅरिसच्या निमित्ताने...
- **अपर्णा पाटील** / १८
  प्रेरणादायी
- **प्रतिभा सराफ** / २१
  अजूनही खूप काही...
- **प्रशांत पवार** / २५
  'लौंडे' को मिली पद्मश्री...
- **विनायक कुळकर्णी** / २९
  'ओमोज् नॅचरल्स' कोविडची इष्टापत्ती
- **नीलिमा कढे** / ३१
  माझा नृत्य-चित्रमय कलाप्रवास
- **राधिका कुंटे** / ३४
  नव्या वाटा, नवी आव्हाने
- **कॅप्टन नीलम इंगळे-लोबो** / ३८
  कोंडून ठेवलेल्या धनास मोकळे करा...
- **कैलास जोशी** / ४१
  कोरोना आणि मुलींचे शिक्षण काही निरीक्षणे
- **प्रभा जोशी** / ४४
  मुंबईचे दिवस
- **पुष्पा खरे** / ४७
  ताई - एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व
- **दीपक घारे** / ४९
  व्हिज्युअल आर्ट ऑफ महाराष्ट्र - महाराष्ट्राच्या कला परंपरेचा इंग्रजीतील पहिला महत्त्वाचा ज्ञानकोश
- **ग्रंथाली वृत्तांत** / ५१
- **ग्रंथाली ग्रंथपाने** / **चांगदेव काळे** / ५५

ग्रंथाली





## प्रभु अजि गमला

डॉ. स्मिता निखिल दातार

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

कवी, चित्रकार, लेखक, गुलाबसंशोधक, उद्यानतज्ज्ञ, टेक्स्टाइल डिझायनर, गोवामुक्तिसंग्रामातले स्वातंत्र्यसैनिक, राष्ट्रपती पुरस्कार विजेते, उद्यानमार्गदर्शक, गोमंतक लोकसाहित्य संशोधक, समाजकार्यकर्ते असे हे बहुआयामी, हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व. 'प्रभु अजि गमला' हे चरित्र त्यांच्या जीवनाचा एक सुंदर प्रवास आपल्या समोर ठेवते.




## शरदाचे चांदणे

स्मिता महाजन

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

पं. शरद साठे यांनी शास्त्रं सांभाळून गण्यात रंग भरत गायकी आकर्षक होईल याचा त्यांचा विचार निरंतर चालू असे. त्यांच्या अभ्यासपूर्ण गायकीचा, गुरूपरंपरेतल्या आणि गाण्यातल्या त्यांनी जपलेल्या सौंदर्यतत्त्वांचा मागोवा घेणे पुढील सर्व गाण्यांच्या अभ्यासकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.

**– विकास कशाळकर**

### मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०२१

# संपादकीय...

**आठ** मार्च, महिलादिन! 'शब्द रुची'च्या या अंकाच्या गाभ्याशी हे विशेष निमित्त आहे. 'ती' शतकानुशतके चालते आहे एका आश्वासक-उजळ क्षितिजाकडे! ज्या काळात तिला स्त्रीमुक्ती वगैरे माहीत नव्हती, तेव्हाही तिचे स्वत:चे विचार तिच्याकडे होतेच. त्याखेरीज 'राम नाही ग, नाही ग सीतामाईच्या मोलाचा' अशा अर्थाची ओवी ती लिहू शकली नसती. मनात साचलेलं आणि साठलेलं कुणासमोर तरी व्यक्त करण्याची धडपड तिनं अखंड केली, मग ते निर्जीव 'जातं' असो किंवा एखादी जिवलग 'सई'! तिला निखळपणे व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य आपल्या संस्कृतीनं कधी दिलं नाही, त्यामुळे व्यक्त होण्याच्या जागा तिच्यापाशी अभावानंच होत्या. काळाच्या वाटेवर हळूहळू तिला लेखणीचं बळ मिळालं. पुढल्या टप्प्यावर तिनं स्वत:ची भाषा घडवली. ही भाषा पुरुषांच्या शब्दांच्या जगापेक्षा वेगळी होती. अमृता प्रीतमसारखी कवयित्री 'माझ्या मृत्यूनंतर माझ्या देहापाशी माझी लेखणी ठेवा' असं म्हणते तेव्हा, तिच्या शब्दांचा अर्थ खूप काही सांगून जातो.

लेखणीच्या बळावर स्त्रीनं समाजाच्या बंदिस्त चौकटींना धक्के दिले. मात्र या धक्क्यांतून झालेल्या पडझडीमागे नवं जग निर्माण करण्याची तीव्र आस होती. व्यवस्थेच्या काळोख्या जागांवरची धूळ झाडून तिनं आपली गाणी रचली. शांताबाई शेळके यांच्या ओळींचं इथं स्मरण होतं...

'हे भरलेपण झाकून ठेवीन<br>
माझ्या दक्ष पापण्यांनी<br>
आतल्या काळोखात उमलतील<br>
मोगऱ्यासारखी शुभ्र गाणी

सध्याच्या भोवतालातला विषाणू घाबरवून टाकत असताना 'शुभ्र', 'उजळ', 'सुंदर' असं काही शोधण्याची उमेद जिवंत राहणं कठीण आहे, तरी एकमेकांच्या जगण्याचा आधार बनणं हीच माणूसपणाची खूण आहे. 'ग्रंथाली'नं नेहमीच यावर विश्वास ठेवून आपली वाटचाल केली. काळाला समांतर राहून नव्याचा शोध घेण्याची ग्रंथालीची धडपड आमच्या वाचकांना कोरोनाकाळात जाणवत असणारच. 'साहित्याच्या पारावर', 'साहित्य-आस्वाद' या नव्या उपक्रमांनी ग्रंथालीनं वाचकांशी असलेले आपलं नातं अधिक दृढ केलं. यू ट्यूब चॅनेलच्या माध्यमातून 'ग्रंथाली'शी जोडून घेणं आता सर्वदूर वाचकांकरता सोयीचं झालं आहे. एकाच वेळी जगभरातल्या वाचकांपर्यंत 'ग्रंथाली'ची साद पोचणं या नव्या उपक्रमांमुळे सोपं झालंय. अनोळखीपणाच्या दऱ्या मिटवण्याचं काम भाषा आणि साहित्य करत असतं. दुखऱ्या मनांकरता फुंकर जितकी हवी तितकीच विझल्या मनांना चेतवणारी ठिणगीही हवी. अस्वस्थ मनांना सांत्वन हवं नि जगण्याचं नवं आश्वासनही हवं. 'ग्रंथाली' म्हणून तर नव्या-नव्या वाटा शोधतेय. वाचकहो, म्हणूनच हे आवाहन सहप्रवासी होण्याकरता!

**– डॉ. वीणा सानेकर**<br>
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६<br>
veenasanekar2018@gmail.com

'ग्रंथाली'च्या **granthali watch या यूट्यूब चॅनेलला सबस्क्राइब करा** आणि
'ग्रंथाली'ला डिजिटल माध्यमातून नवे व्यासपीठ उभे करण्यास 'अर्थ'बळ द्या, एका क्लिकवर!
**'साहित्य-आस्वाद'** आणि आगामी **'ग्लोबल साहित्यसफर'** हे नवे दोन उपक्रम अनुभवा.

**www.granthali.com** ही वेबसाइट 'ग्रंथाली'च्या ४६ वर्षांचं संचित आणि
आगामी उपक्रमांची माहिती यासाठी अवश्य पाहा.
'साहित्याच्या पारावर'चे ४५ कार्यक्रम, दिवाळीपहाट, शब्द रुचीचे अंक, वाचकदिन आणि
पुस्तकप्रकाशने इथे पाहता येईल.
आजवर आहात तसे याही माध्यमात सोबत राहा.



शिरीष वीरकर

# वेलू त्याचा गेला गगनावेरी

**ज**यंत विष्णू नारळीकर यांची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड होणे हा एक सुखद धक्का आहे. नारळीकर हे जिवंतपणीच legend बनलेले व्यक्तिमत्त्व आहे.

त्यांचे वडील प्रख्यात गणिती आणि आई संस्कृतची पंडिता. शिक्षणाचा वारसा लाभलेल्या जयंतरावानी वयाच्या २१ व्या वर्षी रँग्लरची केंब्रिज विद्यापीठातील गणितातली सर्वोच्च पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी ॲस्ट्रोफिजिक्स म्हणजे खगोलशास्त्राचे अध्ययन केले. खगोलशास्त्रात गणिताच्या आधारेच सिद्धांत मांडावे लागतात. त्यांची गणिती शैक्षणिक पार्श्वभूमी त्यांना उपयोगी पडली. त्यात अनेक पारितोषिके आणि डॉक्टरेट मिळवून ते त्यांचे गुरू फ्रेड हॉईल यांच्याबरोबर काम करू लागले. केंब्रिजमधील त्यांच्या वास्तव्यात त्यांनी आपल्या गुरूबरोबर विश्वाची निर्मिती कशी झाली असावी याबद्दल स्टेडी स्टेट थेअरी हा सिद्धांत मांडला. विश्वनिर्मितीचे कोडे उकलण्याचा प्रयत्न मानव सतत करत आला आहे. हा सिद्धांत मांडल्यावर जगातील नामवंत खगोलशास्त्रज्ञांत त्यांची गणना होऊ लागली.

केंब्रिजमधील संशोधन आणि अध्यापन जोमात चालू असताना त्यांनी मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला. ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रीसर्च संस्थेत रुजू झाले. हा निर्णय घेणे त्यांना खूप कठीण गेले असणार. जागतिक कीर्ती लाभलेला एक शास्त्रज्ञ ऐनभरात असताना मायदेशी परततो ही ब्रेन ड्रेनच्या वातावरणात देशाच्या दृष्टीने फार मोठी सकारात्मक घटना होती.

आपले संशोधन आणि अध्यापन जोमाने चालू ठेवून विज्ञाननिष्ठ समाज घडवण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. गावोगावी जाऊन व्याख्याने दिली. विज्ञानाची आवड जनसामान्यात निर्माण व्हावी म्हणून त्यांनी अथक प्रयत्न केले. भारतात दुर्लक्षित राहिलेल्या खगोलशास्त्राचा अभ्यास आणि संशोधन यांना चालना देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन आंतर विद्यापीठ स्तरावर आयुका या संस्थेची स्थापना झाली. नारळीकर यांच्या नेतृत्वाखाली आयुकाची सुरुवात झाली. आज ही संस्था खगोलशास्त्रामध्ये जोमाने काम करत आहे.

आपले पूर्ण आयुष्य नारळीकरांनी खगोलशास्त्र अध्यापन आणि संशोधन आणि विज्ञान प्रचार आणि प्रसार यासाठी वाहून घेतले. डॉक्टर जयंत नारळीकर हे आजच्या युगातील आधुनिक विज्ञानऋषीच आहेत. संशोधन करणारे शास्त्रज्ञ आपल्या प्रयोगशाळेतच बंदिस्त राहतात, नारळीकर मात्र लोकांपर्यंत पोचले. मराठीत विज्ञानकथा फारच कमी प्रमाणात लिहिल्या जात. नारळीकरांच्या वलयामुळे विज्ञानकथा सर्वदूर पोचल्या. विज्ञान अधिक लोकप्रिय होण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. नारळीकर लिहिते झाल्याने मराठी भाषेतील विज्ञानकथादालन अधिक समृद्ध आणि व्यापक झाले.

खरा विज्ञानकथालेखक भविष्यात होणाऱ्या वैज्ञानिक प्रगती आणि त्याचे समाजावर होणारे परिणाम यावर भाष्य करत असतो. एका अर्थाने तो द्रष्टा असतो. इंग्रजीमध्ये आर्थर क्लार्क आणि ॲसिमॉव्ह हे विज्ञानकथालेखक याचसाठी प्रसिद्ध आहेत. नारळीकरांनी १९७५ साली लिहिलेल्या 'पुत्रवती भव' या कथेमध्ये त्यांनी भविष्यात गर्भलिंगनिदान विज्ञानाला शक्य होईल आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्भातील बालिकांचे गर्भपात होतील,

आपल्याला पुत्र व्हावा यासाठी असे गर्भपात केले जातील आणि ते रोखण्यासाठी कायदा करावा लागेल, असे लिहिले होते. प्रत्यक्षात अगदी तसेच घडले. सोनोग्राफीतंत्राने विज्ञानाने प्रसूतीपूर्व गर्भनिदान करणे शक्य केले आणि शासनाला प्रसूतीपूर्व गर्भलिंगनिदानावर बंदी घालणारा कायदा १९९४ मध्ये करावा लागला.

१९७८ साली त्यांनी लिहिलेल्या 'धूमकेतू' या कथेमध्ये एक धूमकेतू पृथ्वीवर आदळणार असतो. त्यावर रॉकेट सोडून त्याचा मार्ग बदलण्यात येतो. त्यामुळे पृथ्वीला होणारा संभाव्य धोका टळतो. प्रत्यक्षात १९८२ साली खरोखरच एक धूमकेतू पृथ्वीच्या दिशेने येत होता. तो धूमकेतू पृथ्वीवर आदळला असता तर कदाचित पृथ्वीवरील जीवसृष्टी संपुष्टात आली असती. त्यावेळी नासाने रॉकेटचा उपयोग करून धूमकेतूचा भ्रमण मार्ग बदलण्याचे ठरवले होते. सुदैवाने धूमकेतूचा भ्रमणमार्ग बदलल्याने पृथ्वीवर होणारा संभाव्य धोका टळला. नारळीकरांनी या दोन्ही कथांमधून वैज्ञानिक भविष्याचा वेध घेतल्याचे स्पष्टपणे दिसते. नारळीकर यांनी लिखाण मराठी ऐवजी इंग्रजीत केले असते तर विज्ञानलेखक म्हणून ते कदाचित जगन्मान्य झाले असते.



जयंत विष्णू नारळीकर

भारतात परतल्यानंतर त्यांचे संशोधन चालू राहिले. केंब्रिजमधल्या आपल्या सहकाऱ्यांबरोबर त्यांनी पृथ्वीवर अवकाशातून जीव येतात याबाबत प्रयोग केले. इंडियन स्पेस रीसर्च ऑर्गनायझेशन च्या मदतीने त्यांनी अवकाशात पृथ्वीपासून ४१ किलोमीटर अंतरावर फुगे पाठवून अवकाशातून पृथ्वीवर सूक्ष्म जिवाणू येतात हे सिद्ध केले. 'लॅन्सेट' या जीवशास्त्राशी निगडित प्रथितयश जगन्मान्य जर्नलने या प्रयोगाची दखल घेतली.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी फलज्योतिष्यावर संशोधन करून आकडेवारीसह फलज्योतिष हे शास्त्र नाही असे त्यांनी सिद्ध केले. नारळीकरांचा स्वभाव अतिशय मृदू असल्याने त्यांनी हिरिरीने विज्ञाननिष्ठ चळवळ पुढे नेली असे दिसत नाही. त्यांच्या विज्ञानकथा चांगल्या असल्या तरी त्यांच्या वैज्ञानिक गुणवत्तेच्या तुलनेत त्या फिक्याच आहेत असे वाटते.

त्यांना नोबेल पारितोषिक का मिळाले नाही याची बरीच कारणे आहेत. मुख्य म्हणजे विश्वाच्या निर्मितीचे हे वैज्ञानिक भाकीत आहे. Steady-state Theory किंवा Big Bang हे सिद्धांत असून कोणताच निर्विवादपणे सिद्ध झालेला नाही. त्याचबरोबर त्यांचे गुरू फ्रेड हॉईल यांचे आणि नोबेल पारितोषिक समितीचे संबंध फारसे सलोख्याचे नसल्याने हॉईल आणि त्यांचे शिष्य विक्रमसिंघे आणि नारळीकर कोणालाच नोबेल मिळू शकले नाही. ही फार दुर्दैवाची बाब आहे.

जयंत नारळीकर नावाचा कणादऋषींची परंपरा आपल्या ज्ञानाने आणि प्रतिभेने पुढे नेणारा आधुनिक वैज्ञानिक ऋषी मराठी असावा ही आपल्यासाठी केवढी अभिमानाची बाब आहे.

**– शिरीष वीरकर**
भ्रमणध्वनी : ७७३८१४४४५
shirish.veerkar@gmail.com



लॅन्सेट या जीवशास्त्राशी संबंधित जागतिक स्तरावरील नियतकलिकाने नुकतीच राणी बंग यांच्या महिला प्रजोत्पादन क्षेत्रातील कामाची दखल घेऊन त्यांच्या कामाचा गौरव केला आहे. लॅन्सेटमध्ये बंग दापंत्यावर कौतुकाचा वर्षाव व्हायची ही काही पहिली वेळ नाही. १९८७ मध्ये राणीताईंनी गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिल्यांच्या शारीरिक आणि मानसिक समस्यांविषयी अभ्यास करून शोधनिबंध प्रसिद्ध केला होता. अशा तऱ्हेचा हा जगातील पहिलाच शोधनिबंध होता. त्याची दखल जागतिक स्तरावर घेतली गेली. युनिसेफने माता आणि बालक ही संकल्पना ह्या शोधातून घेऊन त्यावर माता-बालसंगोपन ही प्रणाली जगभर राबवली. आदिवासी बालकांच्या मृत्युदरात कमी होण्यासाठी प्रशिक्षित दाईमार्फत त्वरेने औषधे देऊन बालमृत्यूचे प्रमाण बंगांनी कमी करून दाखवले.

आपल्या कामाला संशोधन आणि उपाययोजना यांची जोड देऊन बंग दाम्पत्याने अभूतपूर्व कामगिरी करून दाखवली आहे. राणीताई गेली कैक वर्षे किशोरवयीन मुला-मुलींसाठी लैंगिक शिक्षण देण्याचे काम करत आहेत. वयपरत्वे होणाऱ्या शारीरिक बदलांबरोबर किशोरवयीन मुलामुलींमध्ये मानसिक बदलपण होतात. या सर्वंकष बदलाला कसे सामोरे जावे याचे शिक्षण राणीताई देतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर असे ऑनलाइन वर्गही त्यांनी घेतले आहेत. लॅन्सेटने या दीर्घकाळ चालणाऱ्या प्रशिक्षणाबाबत राणीताईंचे अभिनंदन केले आहे.

बालमृत्युदर कमी करणे, प्रत्येक गावांमध्ये प्रशिक्षित खाजगी आरोग्यसेवक उपलब्ध करणे, माता-बालसंगोपन ही संकल्पना राबवणे, प्रती माणशी किमान किती उष्मांक शरीराला आवश्यक आहेत हे जागतिक स्तरावर सिद्ध करणे, असे कितीतरी आरोग्यविषयक महत्त्वाचे प्रश्न बंग दाम्पत्याने यशस्वीपणे राबवून समाजोपयोगी भरीव कामगिरी केली आहे. 'ग्रंथाली'ने यापूर्वी राणीताईंची 'गोईण' आणि 'कानोसा' ही दोन पुस्तके प्रसिद्ध केली आहेत.

'ग्रंथाली' परिवारातर्फे राणीताईंचे मनःपूर्वक अभिनंदन.



विद्या हर्डीकर–सप्रे

# आठवणींची मोरपिसे

अनुराधा गानू! तिच्या व्यक्तिमत्त्वाला एक मृदुल पण डौलदार पिसारा होता! त्याचे मोरपिशी रंग तिच्या स्वप्नांना होते! स्वप्नांना शब्दांकित करण्याचं डोळस लाघव तिच्याकडे होतं. ते शब्द सत्यात उतरवण्याचा अखंड ध्यास तिला होता. कधी नभात मेघ दाटून आले तर, कधी उन्हाची तलखी; पण तिच्या स्वप्नांचे रंग तजेलदार मोरपिशी; शब्द टवटवीत आणि तिचा ध्यास नवीनतेचा!

अनुराधा गानू हे लॉस एंजेलिस भागातील एक बहुगुणी व्यक्तिमत्त्व! बुद्धिमान विद्यार्थिनी, अगत्यशील सुगृहिणी, प्रेमळ मैत्रीण, यशस्वी व्यवसायिका, विचारवंत लेखिका, तरल स्वप्निल कवयित्री आणि गीतकार, प्रयोगशील नाट्यकर्ती, कुशल अभिनेत्री, समाजऋण मानणारी कष्टाळू कार्यकर्ती, अशी अनेक गुणरत्नं अनुराधाच्या पिसाऱ्याला होती. गुणसुमने ही वेचियली या भावे । की 'तिने' सुगंधा घ्यावे ।। अशी सावरकरांच्या कवितेतली वृत्ती अनुराधामध्ये होती. जन्मभूमी, कर्मभूमी आणि मायमराठी ही अनुराधाच्या कामामागची तीन सूत्रं होती.

अनुराधा म्हणजे पूर्वाश्रमीची मीना देवधर. अर्थशास्त्र विषयात प्रथम क्रमांकाचं यश मिळवून, विवाहानंतर अमेरिकेत आली. इथेही M.B. आणि C.P. करून स्वत:चा व्यवसाय सुरू केला.

खरं तर मराठी, मराठी साहित्य हा काही तिच्या पदवीच्या अभ्यासाचा विषय नव्हता. परंतु आपल्या मुलांना मराठी शिकवताना आजूबाजूच्या मराठी मुलांना मराठी शिकवण्यासाठी अनुराधानं प्रयोग सुरू केले. 'कल्पकतेनं आणि रंजकतेनं मराठी कसं शिकवावं आणि मुलांना मराठीची गोडी कशी लावावी' हा तिचा ध्यास होता. रवींद्रनाथांच्या काबुलीवाला या नाटुकल्याचं मराठी लेखन आणि नाट्यप्रयोग हा तिचा पहिला प्रकल्प.

त्यानंतर 'परीची शाळा' नावाचा सुमधुर बालगीतांचा; पुस्तक आणि पाटीसह व्हीसीडी संच काढून तिनं प्रत्येक मराठी घरात मराठी पोचवण्याचा मोठा प्रयोग केला. मराठीसाठी शैक्षणिक साधने बनवण्याचा हा अमेरिकेतील पहिला प्रयोग.

मराठीच्या प्रेमामुळेच लॉस एंजेलिस मराठी मंडळात अनुराधाचा बरीच वर्षं सक्रीय सहभाग होता. कार्यकारिणीच्या कामात अगदी पदर बांधून मोदक करण्यापासून कार्यक्रमांचं संहिता लेखन करून नाटकात भूमिका करण्यापर्यंत! येसूबाईपासून ते पुलंच्या 'एका रविवारची कहाणी'मधील ठसठशीत कानडी मामीपर्यंत; अनुराधाच्या अनेक भूमिकाही प्रेक्षकांच्या चांगल्याच लक्षात आहेत!

अनुराधानं विविध प्रकारचं लेखन केलं. ललित लेख, कविता, याबरोबर नाटक, संगीतिका, वगनाट्य, नृत्यनाट्य असं सादरीकरणाचं लेखन आणि प्रयोग अनुराधानं पुष्कळ केले. तिच्या लेखनात विषयांची आणि विचारांची समृद्धता आहे. यात तिची बहुश्रुतता जाणवते. अनेक वेळा पुनर्लेखन करण्याची आणि ते घासूनपुसून लखलखीत करण्याची तयारी आणि कष्ट तिच्या लेखनात दिसतात आणि त्यांचं चीजही झालं. काही उदाहरणं द्यायची तर कॅपिटल पनिशमेंट या इंग्रजी काव्यसंग्रहाचा 'अजब तुझे सरकार' हा सुंदर अनुवाद करून तिनं मंगेश पाडगावकरांची 'हे तर अनुसर्जन' अशी शाबासकी मिळवली. तिच्या सुमधुर गीतांना चाली लावून त्यांची अनुराधा पौडवाल आणि श्रीधर फडके यांच्या आवाजातली 'दाटून आले मेघ नभात' ही ध्वनिफीत प्रसिद्ध झाली. 'लोकसत्ता' लोकरंग पुरवणीत प्रसिद्ध झालेलं तिचं 'मोरपिसे' हे स्तंभलेखन खूप



अनुराधा गानू

लोकप्रिय झालं. त्याचं ग्रंथालीतर्फे पुस्तक प्रसिद्ध झालं. अनुराधानं पुष्कळ धडपड करून 'मोरपिसे'चा इंग्रजी अनुवादही प्रसिद्ध केला.

'एकता' या त्रैमासिकातलं एकमेकींच लेखन वाचलं आणि माझी अनुराधाशी ओळख झाली. मैत्र जुळलं. मुळात सामाजिक बांधिलकी ची जाणीव असल्यामुळे स्वत:जवळ असलेली लेखनकला आणि नाट्यगुणांचा उपयोग करून सामाजिक प्रकल्प करण्याची माझी संकल्पना तिला अगदी सहज पटली! संगीतासाठी डॉ. गोपाळ मराठे यांनी हात पुढे केला.

मग पुढचे अनेक निधीसंकलनाचे उत्सव आम्ही एकत्रितपणे केले. लॉस एंजेलिसमधील अनेक मराठी कुटुंबं आमच्याबरोबर एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर योगदान करू लागली.

'माझे माहेर पंढरी'च्या दोनशे कलाकारांच्या भव्य कार्यक्रमानं ही वाटचाल सुरू झाली. ती तीस वर्षं चालली. आणखी काही उदाहरणं म्हणजे 'हरवले ते गवसले का' हे वगनाट्य! यात अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या मराठी माणसांच्या पहिल्या पिढीनं काय कमावले आणि काय गमावलं याचा आलेख होता.

'माझी माय सरसोती' ही अनुराधा गानूनं लिहिलेली आणि निर्मिती केलेली बहिणाबाईंच्या आयुष्यावरची संगीतिका गाजली. त्यात तिने भूमिकाही केली होती.

अशा काही निधीसंकलन उत्सवातून महाराष्ट्रात मांगवली, हराळी अशा गावी चांगले प्रकल्प उभे राहिले.

याशिवाय पंचतंत्रावर आधारित 'सफारी' या संगीतिकेचा प्रयोग लॉस एंजेलिस मराठी मंडळाच्या मदतीसाठी केला.

'माझी माय सरोसोती'च्या कार्यक्रमावर अनुराधाचा विशेष जीव होता. त्यामुळे ती अधिवेशनात सादर करावी म्हणून तिचं पुनरुज्जीवन करून अनुराधानं त्याची तयारी केली. सराव उत्साहानं सुरू झाला. २००९च्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात 'माझी माय सरसोती' मुख्य रंगमंचावर करायचं ठरलं होतं. अनुराधाचं एक स्वप्न साकार होणार होते.पण अधिवेशन आठ दिवसांवर येऊन ठाकलं असताना अचानक अनुराधावर पक्षाघाताचा जोरदार आघात झाला, अनुराधा अक्षरश: कोलमडली! कार्यक्रम रद्द करावा लागला. मात्र अनुराधाची जिद्द अशी, की त्यानंतरच्या एकामागोमाग एक आलेल्या नवनव्या आजारांना तोंड देत तिनं सात वर्षांनी सोलापूरच्या रंगमंचावर हजार लोकांच्या उपस्थितीत, तिथल्या स्थानिक कलाकारांना घेऊन 'सरसोती' सादर केली!

अनुराधानं जिद्दीनं शारीरिक व्याधींचा सामना केला. तिनं लेखन सोडलं नाही, की आपले प्रयोगशील प्रकल्प सोडले नाहीत.

अमेरिकेतल्या गरीब लोकांसाठी गोधड्या बनवण्याचा एक उपक्रम केला. इंग्रजी कवनं लिहिली. गीता पाठ केली... आणि अनेक गोष्टी!

अनुराधाचा आणखी एक गुण म्हणजे तिची पाककला. लोकसंग्रह दांडगा. लोकांना बोलावून प्रेमानं जेवूखाऊ घालण्याची हौस. त्यामुळे मित्रमैत्रिणी, पाहुणे यांची वर्दळ गानू कुटुंबाकडे असे. प्रकाश-मंदाकिनी आमटे, जयंत आणि मंगला नारळीकर, ग्रंथाली प्रकाशनाचे लोक, वसंत बापट, व्यंकटेश माडगूळकर यशवंत देव असे खास पाहुणेही येऊन गेले. त्यांच्याबरोबर अनौपचारिक सभा रंगल्या.

त्यांची आठवण लॉस एंजेलिस भागातल्या मराठी रसिकांना आहे, तशी अनेक मराठी अधिवेशनांत आणि मराठी मंडळाच्या कार्यक्रमांत अनुराधानं लिहिलेली सुंदर गीतं लोकांच्या आठवणीत आहेत.

परमेश्वराच्या सर्जनशीलतेची अनेक विलोभनीय रूपं अनुराधाच्या संवेदनाशील कविमनाला दिसली. आजूबाजूच्या माणसात ती पहाण्याचा प्रयत्न तिनं केला आणि आपल्या कुवतीनुसार आजूबाजूचं जग सुंदर करण्याचा ध्यास तिनं घेतला. कधी नभात मेघ दाटून आले तर, कधी उन्हाची तलखी; पण तिच्या स्वप्नांचे रंग तजेलदार मोरपिशी; शब्द टवटवीत आणि तिचा ध्यास नवीनतेचा होता.

अनेक लोकांना निर्मळ प्रेम देऊन, आणि आठवणींची मोरपिसं देऊन अनुराधानं अखेर नऊ फेब्रुवारीला चिरविश्रांती घेतली.

तिच्या मागे पती वामन, मुलं सिद्धार्थ व विक्रम आणि सुना, नातवंडे आहेत.

**– विद्या हर्डीकर सप्रे**
कॅलिफोर्निया
vidyahardikar@hotmail.com



नीरजा

# तिसरा डुळा
## दुंभगलेल्या आयुष्याचा लेखाजोखा

किरण येले हे गेली वीस-पंचवीस वर्षं वेगवेगळ्या साहित्यप्रकारात लेखन करत आहेत. खरं तर त्यांची मूळ ओळख कवी म्हणूनच आहे. 'चौथ्यांच्या कविता' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह २००० साली प्रकाशित झाला. त्यानंतर 'ग्रंथाली'नं 'बाईच्या कविता' नावाचा त्यांचा दुसरा कवितासंग्रह २०१० साली प्रकाशित केला आणि ते ग्रंथालीचे लेखक झाले. 'बाईच्या कविता' या संग्रहामुळे किरण येले लोकप्रिय झाले. काव्यलेखनाबरोबरच त्यांनी कथालेखन, नाट्यलेखन तसंच काही मालिकांचं लेखनही केलं. किरण येले हे अनुवादाचंही काम करतात. हिंदी साहित्याविषयी व उर्दू भाषेविषयी त्यांना विशेष प्रेम आहे.


'मोराची बायको' हा त्यांचा पहिला कथासंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरला आणि त्यानंतर डिसेंबर, २०१९ मध्ये -आलेल्या त्यांच्या 'तिसरा डुळा' या कथासंग्रहानंही वाचकांचं लक्ष वेधून घेतलं. एकूणच किरण येले यांनी कविता आणि कथा या साहित्यप्रकारांत स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

आजची सामाजिक व्यवस्था, राजकीय परिस्थिती आणि त्याचा सर्वसामान्य माणसाच्या जगण्यावर झालेला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम हा येले यांच्या कथांचा मूळ गाभा आहे. त्यांच्या कथांमध्ये येणारी पात्रं ही मध्यमवर्गीय जाणिवेची क्वचितच असतात. अनेकदा ती कनिष्ठ वर्गातील असतात. त्यांच्या कथांत येणारं वातावरण महानगरातील निम्नवर्गीय परिसरातील असतं. अनेक घटना या गल्लीमोहल्ल्यात घडत राहतात. विशेष म्हणजे सामान्य माणसाच्या जगण्यातले गुंते ते उलगडतात. हे गुंते अनेकदा राजकीय आणि सामाजिक परिस्थितीमुळे आणि जातीय, धार्मिक व वर्गीय दरीमुळे  निर्माण झालेले असतात.

'तिसरा डुळा' या कथासंग्रहात एकूण सात कथा आहेत. या सातही कथांतील पात्रं ही वेगवगळ्या महानगरांत रोज भेटणारी आहेत. त्यात लोकल ट्रेनच्या लगेजच्या डब्यातून प्रवास करणारे प्रवासी आहेत, देवळासमोर बसणारे भिकारी आहेत, छोट्या छोट्या गाळ्यांत दुकान टाकून बसलेले, हारून आणि लालूसारखे दुकानदार आहेत, कारखाने बंद पडल्यानंतर त्या जुन्याच जगात जगणारे 'प्रॉपर्टी एक्झिबिशन'सारख्या कथांतील मशिन ऑपरेटर आहेत आणि जत्रेत सोंग नाचवणारे म्हादू किंवा मंगळीसारखे लोक आहेत.

मुंबईसारख्या शहरांतल्या चाळसंस्कृतीची ओळख मराठी वाचकांना पु.ल. देशपांडे यांनी फार पूर्वी करून दिली आहे. पण ही चाळसंस्कृती गिरगाव, दादर, पार्ले वगैरे नगरांतली आणि उपनगरांतली होती. या पलिकडची कामगारवस्तीतली एक चाळसंस्कृती आहे ती जयंत पवार यांच्या कथांतून आपल्यापुढे आली आहे. त्यापलिकडे जाऊन आज केवळ मुंबईसारख्या महानगरातच नाही तर उपनगरात आणि त्याच्याही पुढे अगदी पश्चिमेकडे नालासोपारा, विरारपर्यंत आणि मध्यपूर्वेकडे कसारा, कर्जतपर्यंत पसरलेली एक वेगळी चाळसंस्कृती जन्माला आली आहे. झोपडपट्टीत तर आज एक वेगळीच मिश्रधर्मीय, मिश्रजातीय, मिश्रप्रांतीय आणि मिश्रभाषिक लोकांची चाळसंस्कृती दिसते आहे. इथं हारून, शाहिदाबी आहे, सावंतकाका आहेत, इसाक, मंग्या, आधी कचरा वेचणारी आणि मग भीक मागू लागलेली रखमा आणि जमील आहेत.

'हारून फ्रेम वर्क', 'इसाक पक्का हिंदू होता', 'जावेद जिवंत






आहे'सारख्या कथांना बाबरी पाडल्यावर झालेल्या हिंदू-मुस्लीम दंग्याचा संदर्भ आहेच, त्याचबरोबर या घटनेनंतर वाढत गेलेली दरी आणि त्यामुळे पसरवल्या गेलेल्या विद्वेषामुळं कलुषित झालेल्या मनांचे संदर्भही आहेत. फाळणीच्या काळात आलेल्या 'शेजारी'सारख्या चित्रपटांतून ज्या प्रकारचे हिंदू-मुस्लीम संबंधांवर आधारलेलं नाट्य आणि त्यातून झिरपणारी माणुसकी आपल्याला दिसत आली त्याचप्रकारचं नाट्य येले त्यांच्या कथांमध्ये अत्यंत प्रभावीपणे उभं करतात. त्यांची निवेदनशैली प्रवाही असल्यानं हे नाट्य मनाच्या पडद्यावर आपोआप उभं राहात जातं. 'इसाक पक्का हिंदू होता' यासारख्या कथेतून धर्मजातीपलिकडची माणसं राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी पेटवलेल्या दंग्यामध्ये कशी होरपळतात आणि कडवट बनत जातात हे जितक्या उत्कटपणे येले मांडतात तेवढ्याच ताकदीनं ते हारून फ्रेमवर्क या कथेत एकमेकांसाठी कोणत्याही परिस्थितीत उभ्या राहू पाहणाऱ्या माणसांना परिस्थितीमुळे आलेली हतबलताही दाखवतात. आज लॉकडाऊनमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या वर्गावर कोणती परिस्थिती ओढावली असेल ह्याची कल्पना आपल्याला दोन दिवसांच्या कर्फ्यूमुळे हारूनच्या कुटुंबाची झालेली अवस्था पाहिल्यावर लक्षात येते.

जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हे किरण येले यांच्या अनेक कथांचं सूत्र आहे. या कथांतील पात्रं ही केवळ जिवंत राहण्यासाठी धडपड करणारी आहेत. देवळासमोर बसून भीक मागणारा 'झुंबर' या कथेतला धनकू असो की भाकर मिळवण्यासाठी 'तिसरा डुळा' या कथेतील म्हादूला शंकर भगवान बनवणारी मंगळी असो, पोटासाठी चार घास मिळवणं यापलिकडचं आयुष्य त्यांना माहीत नाही. 'जावेद जिवंत आहे' या कथेत पुरेसं दूध येत नसल्यानं रखमाच्या छातीवर पाणी टाकून, स्तनातून दूध आल्याचा भास निर्माण करून जावेदची भूक भागवण्याचा जमीलचा प्रयत्न असो, की तान्ह्या जावेदला चादरीत गुंडाळून लोकांसमोर ठेवून रखामाचं भीक मागून पोट भरणं असो, या जगातला प्रत्येक माणूस आपल्या छोट्या छोट्या गरजा आणि आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी धडपडताना दिसतो. केवळ माणसाच्याच चांगुलपणावर नाही तर शंकराच्या तिसरा डोळा उघडण्याच्या कथांवर गाढ विश्वास असणाऱ्या लोकांच्या या विश्वासाला तडे जाण्याचे प्रसंगही याच जगात अनुभवायला येतात हे सत्य येले त्यांच्या कथांतून अत्यंत नाट्यपूर्ण पद्धतीनं मांडतात. मिरवणूक काढणाऱ्या दगडूशेटला पाहण्याची आस असलेला धनकू शेवटी त्यानं न केलेल्या चुकीसाठी दगडूशेटकडूनच शिक्षा भोगतो. कर्फ्यूच्या काळात शेवटच्या क्षणापर्यंत जगण्याची धडपड करणारा हारून ज्यावेळी डाळतांदूळ आणण्यासाठी बाहेर पडतो तेव्हा कोणा हिंदूनं वाटेत आडवून मारू नये म्हणून त्याच्या दुकानातले फ्रेम केलेले विविध देवदेवतांचे फोटो घेऊन बाहेर पडतो. हे सारे हिंदू देव त्याची ढाल बनतील अशी एक आशा मनात असलेल्या हारूनला मात्र हिंस्त्र जनावरं झालेल्या लोकांच्या जगात कोणतेच देव किंवा त्याचा अल्ला वाचवू शकत नाही, हे धगधगीत वास्तव येले आपल्यासमोर उभं करतात.

मध्यमवर्गाला फारसं परिचित नसणारं हे जग तसं पाहिलं तर अनेक कथाकारांनी आपल्यापुढं आणलं आहे. अगदी जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक यांच्यापासून आजच्या जयंत पवार, समर खडस, शिल्पा कांबळे यांच्यापर्यंत अनेक कथाकारांनी ते आपल्यासमोर उभं केलं आहे. किरण येलेदेखील ते समर्थपणे उभं करतात. कथांत घडणाऱ्या घटनांना प्रवाही ठेवण्याचं, वाचकांवर पकड ठेवण्याचं कसब येले यांच्यात आहे. या घटनाक्रमात कधीतरी मधूनच या व्यवस्थेवर ते भाष्य करतात. 'झुंबर' या कथेत ते म्हणतात, 'मिरवणुकीची आणखी एक गंमत असते. मिरवणूक कुणी काढलीय, ती कोण चालवतोय, हे मिरवणूक पाहून कळत नाही. ती पुढे कोणत्या वाटेनं जाणार हे तर खूपदा मिरवणुकीतल्या लोकांनाही माहीत नसतं. कुणीतरी पडद्याआडच्या माणसानं ती आखणी केलेली असते. त्यासाठी माणसे आणि साधनं विकत घेतलेली असतात. आमंत्रणनिमंत्रण देऊन पोलिस, कार्यकर्ते, मित्रमंडळी बोलावलेली असतात, कामगार बोलावलेले असतात आणि मिरवणूक छान चाललेली असते. पाहताना असं वाटतं, की स्वतःच चाललीय आनंदात तल्लीन होऊन, एकदिलानं, एकमतानं ठरवल्यासारखी, आपसूक कुणीही न सांगता. पण खरं तर तसं नसतं. मिरवणूक, मग ती कसलीही असो, तिचा कर्ताकरविता कुणी वेगळाच असतो, आपल्या लोकशाहीसारखीच असते ती एका अर्थानं.'

अशी काही नेमकी भाष्यं येले आपल्या या कथांतून करताना दिसतात. एकूणच किरण येले यांच्या या संग्राहातील कथा थकलेल्या, पिचलेल्या, जगण्याशी समझोता करत आयुष्य ओढत जगणाऱ्या आणि या व्यवस्थेनं परिघाबाहेर फेकलेल्या पण जमेल तेव्हा वापर केल्या गेलेल्या माणसांच्या कथा आहेत. किरण येले अशा राजकीय, धार्मिक आणि सामाजिक व्यवस्थेनं परिभाषित केलेल्या माणसाच्या जगण्याला अत्यंत संवेदनशील मनानं भिडतात.

**– नीरजा**

भ्रमणध्वनी : +९१ ९९६९८१०८९६

nrajan20@gmail.com



हर्षदा सुंठणकर

# किरण येलेंच्या साहित्यातील स्त्री

**कि**रण येलेंना नुकताच यंदाचा महाराष्ट्र फाऊंडेशनचा साहित्यपुरस्कार जाहीर झाला. किरण येलेंबद्दल व्यक्ती म्हणून काहीच माहीत नसताना त्यांच्या कविता आणि काही कथा वाचून ही लेखिका आहे असं समजणारा वाचकवर्ग मी अनेकदा पाहिला आहे. एक तर किरण हे नाव स्त्रीचंही वाटू शकतं, पण त्याहीपेक्षा त्या कवितांची/कथांची शैली, त्यातले अनुभव, त्यात प्रकट होणाऱ्या स्त्री-जाणिवा यांमुळे वाचकांना तसं वाटतं. किरण येलेंचे 'चौथ्यांच्या कविता', 'बाईच्या कविता' हे कवितासंग्रह, 'मोराची बायको', 'तिसरा डुळा' हे कथासंग्रह, 'प्लॅटफॉर्म नंबर ९' हे नाटक ही पुस्तके प्रकाशित आहेत. याशिवाय त्यांनी एकांकिका, मालिका आणि चित्रपटासाठीही लेखन केलं आहे. या लेखात मी मुख्यत: त्यांच्या पुस्तकातल्या स्त्रियांबद्दल लिहिते आहे.

'चौथ्यांच्या कविता' हा कवितासंग्रह सध्या उपलब्ध नाही. 'तिसरा डुळा' आणि 'प्लॅटफॉर्म नंबर ९' ही सामाजिक धाटणीची पुस्तकं आहेत. या कथा स्त्रीवादी नाहीत, पण यात स्त्रिया आहेत. दंगलीत अडकलेल्या कुटुंबातली, कसंबसं मिळालेलं अन्न पोरांना पुरवू पाहणारी, सगळा संसार उद्ध्वस्त होताना पाहणारी, पोराला आणि नवऱ्याला डोळ्यांसमोर मरताना पाहणारी शहीदाबी; प्रेमविवाह करून मनापासून मुसलमान बनलेली पण सासरच्या नातेवाईकांकडून स्वीकारली न गेलेली इसाकची आई; सायकल चालवण्याची इच्छा असलेली सायरा; तिच्यासारखी दिसणारी वेश्या, भुकेमुळे फरपटली गेलेली रखमा; भटक्याविमुक्तांचं जगणं मांडणारी मंगळी; प्लॅटफॉर्मवरच्या मुलांना सुधारू पाहणारी पण स्वतःच परिस्थितीच्या कचाट्यात सापडलेली अदिती यातून या स्त्रिया पुढे येतात. शोषितांच्या जगण्यातली हतबलता दाखवतात.

'बाईच्या कविता' हा कवितासंग्रह डिसेंबर २०१० मध्ये प्रकाशित झाला. अलीकडेच त्या संग्रहाची चौथी आवृत्ती आली आहे. कवितासंग्रह खपत नाहीत अशी ओरड असणाऱ्या आजच्या काळात बाईच्या कवितांना मिळालेलं यश कौतुकास्पद आहे. येलेंच्या 'बाईच्या कवितां'मध्ये कधी आठ चल्लस, रिंगण, लगोरी खेळणाऱ्या अल्लड मुली येतात, तर कधी स्वयंपाक करणारी, देवासमोर दिवा लावणारी, रांगोळी घालणारी गृहिणी, कधी नोकरी करणारी स्वयंसिद्धा तर कधी वृद्धा, कधी त्यांना बाई ही माणूस वा घर सावरायचं की देशोधडीला लावायचं ते ठरवणाऱ्या मातीसारखी वाटते, तर कधी कवितेसारखी अनाकलनीय, गुंतागुंतीची, बहुआयामी, कुठल्याही व्याख्येत न बसणारी. स्त्रीचं तिच्या केसांशी असलेलं अतूट नातं, तिची सोशिकता, शील जपण्यासाठीची तिची धडपड, पाळीबद्दलची तिची मानसिकता, तिचा साजशृंगार, तिची साडी खरेदी, ट्रेन, ऑफिस, घर, लिफ्ट प्रत्येक ठिकाणी तिचं सावध असणं, तिची कलात्मक दृष्टी, तिचं व्यक्त होणं या सगळ्यांचा विचार कवीनं केला आहे. कवी तिच्या वयात येण्याच्या, पाळीच्या, गर्भारपणाच्या, बाळंतपणाच्या, मेनोपॉजच्या अशा जीवनातल्या विविध टप्प्यांवरच्या अवस्था, त्यावेळची मन:स्थिती, भावना, विचार एखाद्या बाईनं लिहाव्या इतक्या सहजपणे लिहितात. म्हणूनच कदाचित मनोगतात या कविता सुचतानाची अवस्था सांगताना कवी म्हणतात, ''फ्रान्झ काफ्काच्या 'मेटामोर्फेसीस' कथेत गेग्रोर स्झाम्झा जसा कीटकात बदलत होता तसाच मी बाईत बदलतोय की काय या भीतीनं मी पळत राहिलो बाईपासून,

तिच्या विचारांपासून, दृश्यांपासून, चित्रांपासून. पण ती हटवादीपणे पाठलाग करत राहिली. जिकडे तिकडे दिसत राहिली.'' यापूर्वीही अनेक लेखक, कवींनी स्त्रियांवर लिहिलं आहे. त्यात अनेकवेळा लेखक, कवींनी आपल्या नजरेतून चितारलेली बाई दाखवली आहे. कधी कल्पनाविश्वाद्वारे तिच्या अंतर्मनात शिरण्याचा प्रयत्नही केला आहे. परंतु अशा रीतीनं एक अख्खा कवितासंग्रह एखाद्या कवीनं स्त्रीवर लिहिण्याची ही पहिलीच वेळ असावी. जितक्या प्रभावीपणे या कवितांमध्ये कवी बाईच्या अंतर्मनात शिरून तिच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करतात तितक्याच ठामपणे एका कवितेत ते बाईला हेही स्पष्टपणे सांगतात

*एकदा तरी गाभाऱ्यातून*
*बाहेर पड*
*निखालस आदिम स्त्री हो*
*तिच्यासारखी सहज वाग*
*उतरव सगळी आभूषणे, अलंकार*
*माणूस हो;*
*माणसासारखी वाग.*

किरण येले आपल्या साहित्यामधून स्त्री-पुरुष नात्यासंबंधीसुद्धा बरंच सांगून जातात. पुरुषांकडून शील उसण्याचं स्त्रीचं भय वैश्विक आहे. म्हणूनच गाईनं अंगावरच्या माश्या उडवाव्यात तशी ती लिफ्ट बाहेर पडताना पुरुषांच्या तिच्या शरीरावरल्या नजरा उडवून मग बाहेर पडते. जन्ममरणाच्या सोबतीची शपथ घेतलेला नवरा नेमका बाळंतपणासारख्या बाईचा जणू पुनर्जन्मच होण्याच्या वेळेला खोलीबाहेर असतो याची तिला खंत वाटते. अहेव मरणाऱ्या बाईचा सन्मान जास्त होतो हे समाजातलं दुर्दैव तिनं स्वीकारलेलं आहे. ती स्वत:तलं अनिमस तत्त्व उजळत राहते पण पुरुषातलं अनिमा तत्त्व तिला नाही ओळखता येत. चरमसीमेवर स्त्रीच्या अर्धोन्मीलित पापण्यांआडचा तो गांधर्वप्रदेश कधीच बाहेर पडत नाही असे किरण येले म्हणतात याचाच अर्थ शारीरिक संबंधांबद्दल अजूनही स्त्री उघडपणे व्यक्त व्हायला बिचकते, अगदी नवऱ्यासमोरही. म्हणूनच कदाचित 'ती आणि ती'मधली सई नायिकेला पुरुषाला हव्या असलेल्या व्हॅनिटीबद्दल सांगते आणि 'मांदळकरबाई'मधल्या शालिनीला लक्षात येतं 'बाईनं कितीही नाही म्हटलं तरी तिच्यात असतंच सेक्स लपलेलं, पण दबलेलं किंवा झाकून टाकलेलं, संस्कार आणि संस्कृतीनं.'

येलेंच्या कथांमधली स्त्री विवाहबाह्य संबंधांबद्दल वेगवेगळ्या परिस्थितीनुसार वेगवेगळी प्रतिक्रिया देताना दिसते. 'साईन आउट'-मधली जोआना अमेरिकेतली आहे. नवऱ्याशी तुटलेलं नातं तिनं आता स्वीकारलं आहे. 'आम्ही आता या गोष्टीला सरावलोय,' हे ती अगदी सहजरीत्या सांगून जाते. आदित्यशी आत्यंतिक जवळीक असल्याचं ती दाखवत राहते. पण रिचर्ड बनलेल्या आदित्यला मात्र तिचं विश्वासघातकी रूप धक्का देऊन जातं. अमेरिकन संस्कृतीतल्या मोडकळीस आलेल्या कुटुंबव्यवस्था आणि मुक्त शारीरिक संबंधांना सहजपणे स्वीकारणाऱ्या स्त्रीचं ती प्रतिनिधित्व करते. 'मांदळकरबाई'मधली शालिनी असहाय्यपणे नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध स्वीकारते. आपल्याला ते कळले आहेत हेही ती नवऱ्यापर्यंत पोहोचू देत नाही. यात तिचा नाइलाज आहे. आतून खोल जखमा झालेल्या असताना वर सगळं नीट आहे दाखवणाऱ्या स्त्रियांचं ती प्रतिनिधित्व करते. 'ती आणि ती'मधल्या तिला हळूहळू उमगत जातं की कोणतंही नातं मनाविरुद्ध जगता येत नाही. खूप जोडपी फक्त संस्कृती आणि संस्कार म्हणून राहतात एकत्र पण प्रत्येकाच्या मनात, मग तो पुरुष असो की स्त्री, कधीतरी डोकावलेला असतोच परपुरुष वा परस्त्री. ती या सत्याचा स्वीकार करते आणि तिथे तिला दोन नव्या वाटा सापडतात. 'कोपऱ्यातलं टेबल'मधल्या सरोळकरच्या बायकोचे लग्नाआधीच एका पुरुषाशी संबंध असतात आणि लग्नानंतरसुद्धा ती सरोळकरशी एकनिष्ठ नाही राहू शकत. 'अमिबा आणि स्टीलचा ग्लास'मधली मैत्रीण मित्राशी आलेल्या शारीरिक संबंधांना कॅज्युअल रिलेशन मानते. त्याचवेळी गीता नावाची वेश्या मात्र 'शरीर माणसाला कंट्रोल करत असतं, मेंदू हा केवळ स्टीअरिंग व्हील. माणूस हा मुळात जनावरच. त्यामुळे त्याला भूक लागतेच मग ती प्रेमाची असेल वा शरीराची. फक्त आचारविचार, नैतिकता, संस्कार या नावाखाली लोक ती दाबून ठेवू बघतात.' हे सत्य सहज सांगून जाते. 'मोराची बायको' कथेत मुलीला तिच्या स्वप्नातला मोरपुरुष भेटतो पण त्यानंतर काही वर्षांनी तिच्या स्वप्नात घोडा येऊ लागतो. जगातली प्रत्येक गोष्ट अपूर्ण असते. ज्या दिवशी तिला पूर्णत्व लाभतं त्यादिवशी ती संपते आणि नव्यानं जन्म घेते. स्त्रीपुरुष नातंही शरीरातल्या आणि मनातल्या अपूर्णत्वावरच टिकून आहे हे त्यात अधोरेखित होत जातं. 'अवशेष'मधली रजनी पतीचे विवाहबाह्य संबंध ती स्वीकारते पण स्वतःही त्या वाटेवरून जाऊन बघते आणि शेवटी परतते. नवरा-बायकोच्या नात्याच्या आणि त्या अनुषंगानं खरं तर एकूणच स्त्रीपुरुष नात्याचा, शारीरिक आणि मानसिक तृप्तीचा, विवाहबाह्य संबंधाचा, नात्यातल्या विसंवादाचा, नात्याला गंज चढण्याचा, नात्याला घातलेल्या शिवणीचा, परपुरुषाविषयीच्या आकर्षणाचा, त्यामुळे आलेल्या अपराधी भावाचा, नात्यातल्या सॅच्युरेशनचा, नात्यातला गढूळ प्रवाह पार करून जाण्याचा आणि मग उरलेल्या अवशेषाचा रजनी विचार करत राहते आणि आपल्यालाही विचार करायला लावते.

येलेंच्या साहित्यामध्ये काही स्त्रिया थोड्याशा नकारात्मक छटांमध्ये येतात. जोआना, सई, सरोळकरची बायको वगैरे. येले याविषयी मत मांडताना म्हणतात, या स्त्रियांचंही आपण नकारात्मक किंवा खलनायिका प्रवृत्तीच्या असं वर्गीकरण नाही करू शकत. कथा त्यांच्या दृष्टिकोनातून लिहिल्या गेल्या नाहीत इतकंच! जोआनाचं नवऱ्याशी फारसं नातं राहिलेलं नाही. मुलं पुरेशी मोठी आहेत. त्यांना त्यांचं जग आहे. अमेरिकन संस्कृतीत वाढलेल्या जोआनासाठी विवाहबाह्य संबंध, सेक्सचॅट या गोष्टी कदाचित खूप बाऊ करण्यासारख्या नाहीत. तिच्या त्या वयात तिला आलेल्या एकटेपणावर तिच्या आजूबाजूच्या वातावरणात जो मार्ग सर्रासपणे अवलंबला जातो तोच ती अवलंबते आहे. सरोळकरच्या बायकोचं

लग्नाआधीच कोणावर तरी प्रेम आहे, पण घरच्यांनी तिचं लग्न सरोळकरशी लावून दिलं आहे. सरोळकर मुंबईचा असल्यानं हुशार, चुणचुणीत असेल अशी तिची अपेक्षा प्रत्यक्षात फोल ठरली आहे. तिच्या अपेक्षेसारखा नवरा किंवा सासर नाही मिळालं. विचारानं वागावं इतकं तिचं वयही नाही आणि समजही. त्यामुळे तिचं रिक्षावाल्याबरोबर पळून जाणं तिच्या त्या परिस्थितीत तिच्या दृष्टीनं चुकीचं नाही. 'ती आणि ती'मध्ये वरुण हे सईचं तिसरं अफेअर आहे. सई स्वतः ते स्पष्टपणे स्वीकारतेच पण इतरांपासूनही लपवत नाही. पुरुषांना काय हवं असतं हेही ती स्पष्टपणे नायिकेला सांगते. तिचे विचार स्पष्ट आहेत आणि त्यांची जबाबदारी ती घेते. शेवटी जगण्यातलं आदिम सत्य लक्षात आल्यावर नायिकेसाठीही सई खलनायिका नाही उरत.

याचा अर्थ येलेंना चुकीचं वागणाऱ्या, खलनायिका प्रवृत्तीच्या स्त्रिया कधी दिसल्याच नाहीत का? सगळ्या स्त्रिया चांगल्याच असतात का? दोष दरवेळी पुरुषाचाच असतो का? यावर येले म्हणतात, दोष बऱ्याचदा व्यक्तीचा नाही तर परिस्थितीचा असतो. प्रत्येक व्यक्तीत चांगले आणि वाईट असे दोन्ही गुण असतात. ते स्त्रियांमध्येही अर्थातच असतात. मलाही अशा अनेक स्त्रिया आजूबाजूला आढळल्या, पण अजून तरी त्यातून लिहावं असं काही सापडलं नाही. पुढे कधीतरी सापडेलही.

'ती आणि ती'मध्ये त्या 'ती'ची मानसिकता लेखकानं यशस्वीरीत्या उलगडून दाखवली आहेच, पण बागेत येणाऱ्या बायकांच्या माध्यमातून स्त्रियांच्या समूहाची मानसिकताही दाखवली आहे. त्या वर्तुळाकार बसलेल्या स्त्रिया एक मोठ्ठं वर्तुळ बनवत आहेतच, पण त्या मोठ्या वर्तुळाच्या आत प्रत्येकीचं स्वतःचं एक अदृश्य वर्तुळ आहे. त्यांना उत्सुकता आहे त्या सगळ्या गोष्टींची ज्या त्यांच्या मनात डोकावल्या आजवर पण उच्छृंखलपणाचा दोष नको म्हणून त्या बाहेर येऊ दिल्या नाहीत त्यांनी कधी. त्या सगळ्यांच्या बोलण्यात कधीतरी एक प्रश्न येतो, की काय जगलो आपण एवढी वर्षं?

एकंदरच येलेंच्या साहित्यातल्या स्त्रिया या सर्वसामान्य स्त्रीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. आजच्या अनेक लेखिकांच्या कथांमध्ये आढळतात तशा त्या बंडखोर नाहीत. त्यांच्या साहित्यातल्या बऱ्याच स्त्रिया मध्यमवर्गीय स्त्रीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. त्या घडलेल्या गोष्टी जशा आहेत तशा दाखवायचा प्रयत्न करतात. त्या त्याविरुद्ध आवाज उठवत नाहीत, तक्रार करत नाहीत, न्याय मागत नाहीत. त्या फक्त जगत राहतात. विचार करत राहतात. परीस्थितीनुसार निर्णय घेत राहतात किंवा समोर येईल ते नाइलाजाने स्वीकारतात. या तुम्हाला आम्हाला रोज आजूबाजूला दिसणाऱ्या बायका आहेत. या दैनंदिन कामं करत राहतात. हसणं, रडणं, खेळणं, आवरणं, प्रार्थना करणं, वाढणं, काहीतरी उकळणं, तळणं, शिजवणं, उकडणं, कापणं, चिरणं, किसणं, नोकरी करणं, रांगोळी काढणं आणि अशी न संपणारी मालिका चालूच राहते. पण रोजचं जिणं जगता जगता काहीच न सांगता त्या बरंच काही सांगून जातात.

शेवटी लेखक म्हणतात ते जास्त महत्त्वाचं आहे, 'नात्यांच्या अनेक पट्ट्या जोडून बनलेली फिरकी म्हणजे बाई. तुमचे पतंग उंच उडावेत म्हणून स्वतःभोवती अनेक काचदार दोरे गुंडाळून घेणारी... टोचणी लपवून नुसती भिरभिर फिरत राहणारी... तिला खुपणारी टोचणी कुणालाच जाणवत नाही.. सगळ्यांना दिसत राहतो तो फक्त उडणारा पतंग.. बाई आयुष्यभर घर सांभाळण्यासाठी आपल्या इच्छा दूर ठेवत राहते. अनेक कारणं देत राहते. स्वतःच्या मनाविरुद्ध वागत राहते, फक्त घर तुटू नये म्हणून.

येलेंनी बाईबद्दल एवढं लिहिलं, तिची इतकी रूपं दाखवली, तिच्या भावना, संवेदना, विचार, स्वभाव आपल्यासमोर आणले तरीही ते 'बाईच्या कविता'च्या मनोगतात लिहितात, की 'बाई किंवा कविता पूर्ण कळलीय असं म्हणणारी माणसं, एक तर फार भाबडी वाटतात किंवा खोटारडी' आणि म्हणूनच शेवटच्या कवितेत ते बाईला विनंती करतात,

*बये*
*सोड आता मला*
*खूप थकलो लिहिताना तुला*
*तरी तू सापडत नाहीस*
*दिसतेस पण हाती लागत नाहीस*
*येते सांगतेस पण येत नाहीस*
*आलीस तरी थांग देत नाहीस.*

*बये, महामाये,*
*मला कळलेय*
*तू हत्ती आहेस आंधळ्यांचा*
*तू व्यूह आहेस व्युत्पत्तीचा*
*तू ससा चंद्राचा*
*तू मृग कस्तुरीचा..*

**– हर्षदा सुंठणकर**
भ्रमणध्वनी : +९१ ७३४९३१२९४८
harshadas17@gmail.com

**ग्रंथाली**




## ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या

संकलन-संपादन
**अनुपमा निरंजन उजगरे**

**ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरील ओवींचा संग्रह**

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**



**राजीव श्रीखंडे**

# कमला हॅरिसच्या निमित्ताने...

अमेरिकेतल्या गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये अध्यक्षीय निवडणूक झाली. तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विक्षिप्त कारभाराने या निवडणुकीकडे सगळे जग बारीक लक्ष ठेवून होते. त्याच्या आधी फेब्रुवारी-मार्चमध्ये कोरोनाचे संकट सगळ्या जगासमोरच उभे होते, पण त्यानंतर मे महिन्यामध्ये अमेरिकेत एक घटना घडली. अमेरिकेत अशा घटना मधून-मधून घडत असतात, म्हणजे पोलिसी अत्याचाराच्या आणि त्यासुद्धा मुख्यत्वे कृष्णवर्णीय जनतेच्या संदर्भात. जॉर्ज फ्लॉईड या एका कृष्णवर्णीय पुरुषाला मिनीऑपॉलिस या मिनीसोटा राज्यामधल्या शहरात पोलिसांनी अटक करताना त्याच्या मानेवर गुडघा दाबून धरला आणि तोही इतका वेळ- म्हणजे जवळजवळ नऊ मिनिटे- की त्यात त्याचा प्राण गेला. त्याचा अपराध? एका स्टोअर क्लार्कच्या म्हणण्यानुसार जॉर्जने २० डॉलरची खोटी नोट दिली होती. या घटनेने पोलिसी अत्याचारांच्या घटनांची थोडीफार सवय असलेला हा देश एकाएकी ढवळून निघाला. जॉर्ज फ्लॉईडचे शेवटचे शब्द 'I can't breath' एका चळवळीचे परवलीचे शब्द बनले. BLM म्हणजे Black Lives Matter ही चळवळ देशभरात पसरली. दंगे, जाळपोळ अशा घटनाही घडल्या. प्रदीर्घ काळपर्यंत ही चळवळ चालली. अगदी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निवडणुकीपर्यंत, जी ३ नोव्हेंबरला होती.

कोविड-१९च्या प्रादुर्भावाने ग्रासलेल्या अमेरिकेचे समाजजीवन एका घटनेने ढवळून निघाले आणि अमेरिकेत असलेल्या वर्णद्वेषाचा मुद्दा या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला. त्यात अध्यक्षीय निवडणुकांत डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार जोसेफ बायडेन यांनी उपाध्यक्षासाठी उमेदवार म्हणून कमला हॅरिस यांचे नाव जाहीर केले. कमला हॅरिस यांचे वडील जमेकाहून येऊन अमेरिकेत स्थायिक झालेले, तर त्यांच्या आई भारतातल्या तामिळनाडू या राज्यातून अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेल्या. कमला हॅरिस पूर्णपणे कृष्णवर्णीय नसल्या तरी त्या काही गोऱ्या नाहीत. डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणुकीच्या प्रचारात याचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प यांनी त्यांच्या चार वर्षांच्या राज्यकारभारात त्यांचे गोऱ्या लोकांविषयी असलेले विशेष प्रेम लपवण्याचा बिलकूल प्रयत्न केला नव्हता, उलट ते अगदी उघडपणे त्याचा पाठपुरावा करत होते. कमला हॅरिस यांची उमेदवारी निश्चित झाल्यावर ट्रम्पनी त्यांच्यावर हल्ला चढवला. ती एक बाई आणि तीही गोरी नसलेली त्यामुळे ती कोणीतरी परकी आहे, वेगळी आहे, बाहेरची आहे हे दाखवण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न होता. अगदी ती निवडून आली तर ती सगळ्या अमेरिकनांच्या डोक्यावर नाचेल अशा अर्थांची विधाने त्यांनी केली. परंतु या निवडणुकीत जोसेफ बायडेन आणि कमला हॅरिस विजयी झाले. त्यांचे यश हे निर्विवाद होते आणि ज्याला अमेरिकेत Popular Vote म्हणतात, त्यात त्यांना त्यांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा, म्हणजे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उपाध्यक्ष माईक पेन्स यांच्यापेक्षा साधारणतः ७० लाख जास्त मते पडली. या निवडणुकांवर Black Lives Matter या चळवळीचे सावट होतेच. कमला हॅरिस ह्या अमेरिकेच्या इतिहासातील पहिल्या महिला उपाध्यक्ष बनल्या. त्यात त्या गौरवर्णीय नाहीत, ही आणखीन एक विशेष गोष्ट. त्यांच्या या निवडीने अमेरिकेन राजकारणाला आणि थोड्याफार प्रमाणात समाजजीवनाला देखील जरा कलाटणी मिळाली आहे असे वाटल्यावाचून राहत नाही. हे कितपत खरे

आहे ते काळच ठरवेल. परंतु या निमित्ताने अमेरिकन समाजव्यवस्थेत, राजकारणात स्त्रीचे स्थान आणि अमेरिकेतला सुप्त/प्रकट स्वरूपात असलेला वंशद्वेष हे दोन मुद्दे प्रामुख्याने पुढे आले. या दोन्हींचा विचार करता काही ठळक गोष्टी जाणवतात.

आजतागायत एकही स्त्री अमेरिकेची राष्ट्राध्यक्ष झालेली नाही हे तर सत्यच आहे. जगातील सर्वात जुनी लोकशाही असा अमेरिकेचा लौकिक. जगातला सर्वात संपन्न देश. पुढारलेला देश. तरीदेखील अशी परिस्थिती आपल्याला काही सांगते का? ज्यांना Third World देश म्हणतात अशा बऱ्याच देशांतही महिला पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष झालेल्या आहेत आणि त्याही बऱ्याच वर्षांपूर्वी. आपला भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश ही अगदी ठळक उदाहरणे. मध्यपूर्वेतल्या इस्रायललादेखील महिला पंतप्रधान लाभलेली आहे. युरोप, लॅटिन अमेरिकेतले बरेच देश यांनाही पंतप्रधान/राष्ट्राध्यक्ष म्हणून महिला लाभलेल्या आहेत. असे असताना अजूनही अमेरिकेच्या सर्वोच्चपदी महिला विराजमान होऊ शकलेली नाही, ही तशी एका अर्थाने अत्यंत आश्चर्यजनक बाब. अमेरिकेच्या इतिहासाचा थोडा अभ्यास केला तर पुढील गोष्टी ठळकपणे जाणवतात.

अमेरिकेला स्वातंत्र्य मिळाले ते १७७६ साली. म्हणजेच अमेरिकन लोकशाही २४४ वर्षे जुनी आहे. असे असूनदेखील अमेरिकन स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. स्त्रीहक्कांसाठी अमेरिकेत चळवळ सुरू झाली ती १८५० च्या सुमारास. तेव्हा National Women's Rights Conventionची स्थापना झाली. या चळवळीने जोर पकडला. अमेरिकन सुप्रीम कोर्टात यासाठी दावे दाखल करण्यात आले. परंतु त्यांना यश मिळाले नाही. १८७२मध्ये सुसान अँन्थनी ही स्त्री मत देण्यात यशस्वी झाली, मात्र त्यासाठी तिला अटक झाली आणि दोषी ठरवण्यात आले. त्यामुळे या चळवळीला एक नवीन ऊर्जा मिळाली. सुप्रीम कोर्टाने १८७५ ला महिलांना तो हक्क नाकारला. त्यानंतर ही चळवळ राज्याराज्यात पसरली. शेवटी कित्येक वर्षानंतर म्हणजे १९२० साली अमेरिकन राज्यघटनेत सुधारणा होऊन (एकोणिसावी घटनादुरुस्ती) स्त्रियांना मतदानाचा मूलभूत हक्क प्राप्त झाला. म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १४४ वर्षांनी अमेरिकेत स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला! कुठल्याही लोकशाहीत मतदान हा मूलभूत हक्क, पण त्यासाठीदेखील अमेरिकन महिलांना इतकी वर्षे थांबावे लागले. ही घटनादेखील अमेरिकेत समाजाविषयी आपल्याला काही सांगून जाते, त्यावेळेपासून आतापर्यंत यात बराच फरक पडलेला आहे हे खरे असले तरी अजून बराच पल्ला गाठायचा बाकी आहे. याची जाणीव होते ती विविध लेख, चर्चा यातूनच! २०१८ साली स्त्रियांच्या समान हक्कांविषयी देशाची क्रमवारी लावताना The World Economic Forum ने अमेरिकेला १४९ देशांच्या यादीत ५१वा क्रम दिला होता.



कमला हॅरिस

अमेरिकेतल्या राजकारणात स्त्रियांचे प्रमाण बघणेही उद्‌बोधक आहे. अमेरिकेतील काँग्रेसमध्ये (यात House of Representative आणि Senate ह्या दोहोंचा समावेश आहे) सद्य:स्थितीत ५३५ सभासदांपैकी १२६ महिला सभासद आहेत (२३.६%). सेनेटमध्ये हे प्रमाण २५% आहे, तर House of Representative मध्ये हे प्रमाण २३.२% आहे. या आकड्यांवरून हे सहज लक्षात येते की हे प्रमाण बऱ्यापैकी कमी आहे. या १२६ महिलांपैकी फक्त २२ या कृष्णवर्णीय (African-American, Asian- American) आहेत. म्हणजे हे प्रमाण आणखी खूप कमी आहे हे दिसते.

अमेरिकेतल्या उद्योगधंद्यावर नजर टाकली तर हाच प्रकार थोड्याफार फरकाने दिसतो. तेथे पूर्ण उपलब्ध असलेल्या कामगारवर्गाच्या जवळजवळ ४७% महिला असल्या तरी उच्च पदांवर त्यांचा सहभाग हा साधारणतः ४० टक्के असल्याचे दिसून येते (२०१९). त्यामध्ये गौरेतर स्त्रियांचे प्रमाण तर अत्यल्पच असलेलं लक्षात येते. Fortune ५०० या नियतकालिकाच्या माहितीप्रमाणे २०२० साली जगातल्या मोठ्या ५०० अमेरिकन कंपन्यांच्या सर्वोच्च पदी फक्त ७% महिला असल्याचे दिसून येते. बहुतांश उद्योगधंद्यांमध्ये महिलांना सापत्नभावाची वागणूक मिळते अशी तक्रार अमेरिकेत सतत ऐकू येते. समान कामासाठी स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते हेदेखील एक वास्तव आहे. महिलांना समान कामासाठी पुरुषांच्या ६०% च वेतन मिळते असा निष्कर्ष एका पाहणीतून आलेला आहे. कृष्णवर्णीय बायकांच्या बाबतीत हे चित्र आणखीच निराशाजनक आहे. अध्यापनक्षेत्रात हे प्रमाण बरे आणि आशादायक असले तरी त्यातही थोडा असमतोल जाणवतोच आणि गौरेतर स्त्रियांचे प्रमाण तर अत्यल्प आहे हेही प्रकाशात येते. अर्थात शिक्षणक्षेत्रात मात्र महिलांचे प्रमाण सतत वाढत असलेले दिसून येते आणि पुरुषांपेक्षा जास्त आहे. कृष्णवर्णीय महिलादेखील शिक्षणात चांगली प्रगती करू लागल्याचे चित्र आता पुढे येत आहे. तरीदेखील वेतनात बरीच असमानता आहे हाही निष्कर्ष अनेक पाहणीतून पुढे यतो.

अमेरिकन मनोरंजन उद्योग केवढा मोठा! हॉलिवूडचा जगभर असलेला दबदबा आपण सर्व जाणतोच. काही वर्षापूर्वी तेथे Me Too या चळवळीचा प्रारंभ झाला. ती जगाच्या बाकीच्या भागातही पसरली, अगदी आपल्या देशापर्यंत. महिलांचे कामाच्या जागी होणारे लैंगिक शोषण हा या चळवळीचा मुख्य मुद्दा होता. त्यामुळे अनेक प्रसिद्ध तारका पुढे आल्या आणि त्यांनी आपल्याला आलेले भयावह अनुभव जगापुढे मांडले. मोठे मोठे निर्माते-दिग्दर्शक यांच्यावर खटले भरले गेले आणि काहींना शिक्षाही झाली. यानिमित्ताने या झगमगत्या दुनियेचे हे एक वेगळेच, भयंकर

रूप जगासमोर आले आणि अमेरिकेसारख्या देशातही महिलांचे लैंगिक शोषण किती मोठ्या प्रमाणावर होते याचे विदारक सत्य जगासमोर प्रकट झालं.

हे खरेच आहे, की अमेरिकेत स्त्रियांना आपल्या हक्कांसाठी फार मोठा लढा द्यावा लागला आहे, कित्येक वर्षे, कधी दशकेदेखील (मतदानाचा हक्क). हा लढा अजूनही चालूच आहे. तो पुढे किती काळपर्यंत चालू याचा अंदाज बांधणं तसं अशक्यच आहे. अमेरिकेत वर्णद्वेष हे कटू असलं तरी सत्य आहे. त्याला फार मोठा इतिहासही आहे. अमेरिकेतले यादवी युद्ध हे मुख्यत्वे: आफ्रिकन गुलामांविषयी आणि त्यांच्या हक्काबद्दल होते हे आपण जाणतोच. अब्राहम लिंकन यांनी कृष्णवर्गीयांना त्यांचे हक्क मिळवून दिले असले तरी ते प्रत्यक्षात समाजात रुळलेले नाहीत हेच चित्र अजूनही दिसतं. कृष्णवर्गीय लोकांना वेगळी वागणूक वेगवेगळ्या स्तरावर दिली जाते हेही सत्यच आहे. अमेरिकेच्या काही राज्यांत, जी राज्ये बहुतांश दक्षिणेकडची आहेत, अमेरिकेच्या यादवी युद्धात ज्यांना Confederate राज्ये म्हटली गेली, त्यांचा झेंडा अजूनही मानाने फडकतो (यामध्ये BCM चळवळीनंतर जरा फरक पडतो आहे). अशा राज्यांत कित्येक कृष्णवर्णीय महिलांना मतदानाचा हक्क जाणीवपूर्वक नाकारला जातो ही वस्तुस्थिती आहे. डेमोक्रेटिक पक्षाच्या नेत्या स्टेसी अब्राहम यांनी जॉर्जिया या अशाच एका राज्यात कृष्णवर्णीय लोकांना, विशेषतः महिलांना मतदारांच्या यादीत स्वतःचे नाव घालण्यासाठी उद्युक्त केले. एकाप्रकारे त्यांनी ही मोठी चळवळच उभी केली आणि त्याचे यश असे की या अशा राज्यात ज्याला Deep Red राज्य म्हणतात आणि जेथे नेहमीच रिपब्लिकन पक्ष जिंकत आलेला आहे (जो गोरेपणाचं उघडपणे समर्थन करतो) तिथेही डेमोक्रेटिक पक्षाचे जो बायडेन निवडून आले. ज्या मतदारांचा आवाज वर्षानुवर्षे दाबला गेला होता त्याला वाचा फुटली आणि असा चमत्कार घडला. Republican पक्षावर ज्याला Gerrymandering म्हणतात त्याचाही आरोप केला गेला आहे. Gerrymandering म्हणजे मतदारसंघाच्या भौगोलिक प्रदेशात असा बदल करायचा की त्यामुळे गोऱ्या जनतेचा मतदानातला टक्का म्हणजेच प्रभाव वाढेल. काही मतदारसंघांत, परत बव्हंशी काही दक्षिणेच्या राज्यांत हे घडलेले आहे. पोलीस अत्याचारात कृष्णवर्णीय लोकच बहुतेककरून भरडली जातात हे तर सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे.

अमेरिकेत अंधाधुंद, बेछूट गोळीबार आणि तोही सार्वजनिक स्थळी काही विशिष्ट कारणाशिवाय हे अमेरिकेन समाजजीवनाचे आणखी एक भयंकर वास्तव. अशा गोळीबारात मृत्यू पावणाऱ्यांची संख्या २०१९ मध्ये चाळीस हजारांच्या वर होती. अगदी लहानग्यांच्या शाळाही यातून सुटलेल्या नाहीत. अनेक लहान मुलेही या हिंसाचारात बळी पडलेली आहेत. NR (National Rifle Association) यासारख्या संस्था ज्या या सगळ्या मानसिकतेला प्रोत्साहन देतात त्यांनाही बऱ्याच राजकारण्यांचा उघडउघड पाठिंबा असेलला दिसतो. ३५ कोटींच्या देशात ३९ कोटी बंदुका आहेत आणि अमेरिकन राज्यघटनेच्या 2nd Amendment ने अमेरिकन जनतेला अशा स्वरक्षणाचा अधिकार दिला असल्याने तो त्यांचा मूलभूत अधिकारच आहे, असे मानणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. इतक्या वर्षांत याबद्दल फारशी प्रगती झालेली नाही. बंदुका अजूनही सहज मिळू शकतात. कधी कधी असे वाटते की अमेरिकन मानसिकता अजून Wild West मधून बाहेरच आलेली नाही की काय? इतक्या भयंकर घटना वारंवार घडत असूनदेखील त्याबद्दल काही ठोस कारवाई इतकी वर्षे झाली तरी न करणे ही कुठली मानसिकता आहे हे कळण्यापलिकडले आहे.

गोरेपणाचे अजूनही वर्चस्व आहे आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या मागच्या निवडणुकीतील यशाने हेच सत्य अधोरेखित केलेले आहे. यावेळी डोनाल्ड ट्रम्प हरले तरी ४७ टक्के मतदारांनी त्यांना यावेळेही मत दिले होते हे सत्य नाकारून चालणार नाही.

या सर्व परिस्थितीत कमला हॅरिस या उपाध्यक्ष होणं हे विशेष बाब खरीच, पण त्याने अमेरिकेचे राजकारण, समाजकारण एकदम बदलून जाईल असे वाटणे हे फारच भाबडेपणाचे होईल. आधी म्हटल्याप्रमाणे स्त्रियांचा समानहक्काचा लढा चालूच आहे आणि कृष्णवर्णीय महिलांचा लढा तर आणखी अनेक अडचणींनी भरलेला आहे.

नवीन राष्ट्रध्यक्ष जो बायडेन यांनी आपल्या सरकारमध्ये बऱ्याच मोठमोठ्या पदांवर महिलांची नेमणूक केलेली दिसते आणि त्यातल्या बऱ्याच महिला या गोऱ्या नाहीत हीही एक ठळक बाब आहे. ही एक आशादायक गोष्ट आहे. आजच्या घडीला अमेरिकेचे वर्णन बरेच जाणकार 'दुभंगलेला देश' असेच करतात. कमला हॅरिसच्या निमित्ताने अमेरिकेतील महिलांना मिळणारी वागणूक, विशेषतः गौरेतर महिलांना आणि त्या अनुषंगाने अमेरिकेच्या अंतरंगात भिनलेला वर्णद्वेष हे दोन्ही मुद्दे प्रकाशात आले आहेत. ६ जानेवारी २०२१ रोजी अमेरिकन कॉंग्रेस भरली असताना त्यांच्या वास्तूवर म्हणजे कॅपिटॉल हिलवर जो हल्ला झाला त्यामुळे अमेरिकन लोकशाहीदेखील किती तणावाखाली आहे याचा प्रत्यय आला. निवडणूकप्रक्रियेमध्ये काहीही वावगे नसताना केवळ नुसत्या प्रचारामुळे बऱ्याच गोऱ्या लोकांना अजूनही असे वाटते आहे की ही निवडणूक जो बायडेन गफला करून जिंकले आहेत.

अमेरिकेन राज्यघटना न्याय, सुरक्षा, सामाजिक शांतता, स्वातंत्र्य, संरक्षण आणि नागरिकांचं कल्याण करण्यासाठी कटिबद्ध आहे. प्रत्यक्षात हे स्वप्न अपूर्ण आहे. कमला हॅरिस या उपाध्यक्ष झाल्या हे एक छोटेसे पुढचे पाऊल आहे. परंतु राज्यघटनेने दिलेले सर्व हक्क सर्व नागरिकांना मिळावेत म्हणून अमेरिकन देश आणि समाजाला पुढे खूप खडतर संघर्ष करावा लागणार आहे असेच चित्र दिसते. त्यांना आपण यश चिंतूया!

**– राजीव श्रीखंडे**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०१७४६२
rshrikhande@yahoo.com



अपर्णा पाटील

# प्रेरणादायी



माया अँजलो

‘‘**स**र्व स्त्रियांमध्ये आपल्या नशिबावर मात करण्याची भावना असणे आवश्यक आहे.’’

माया अँजलो यांनी जगातल्या महिलांना उद्देशून अशा अनेक प्रेरणादायी गोष्टी सांगून ठेवल्या आहेत. माया अँजलो हे अफाट व्यक्तिमत्त्व होतं. त्या ८४ वर्षांचं आयुष्य जगल्या. हे आयुष्य त्यांना एखाद्या सर्वसामान्य स्त्रीसारखंही जगता आलं असतं, पण प्रत्यक्षात तसं घडलं नाही.

नर्तिका... ट्राम कंडक्टर... नाइट क्लब डान्सर... गाड्या दुरुस्तीच्या दुकानातील पेंटर, हॉटेलमध्ये कूक, शरीरविक्रय व्यवसायातील मालकीणबाई... लेस्बियन जोडप्यांसाठी काम करणारी स्त्री... गायिका... पत्रकार... संपादक.... बारा बेस्टसेलर पुस्तकाच्या लेखिका, नाटक-मालिका-पटकथा लेखिका, अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्मात्या, प्राध्यापिका, अशी कामगिरी करताना त्यांनी सात आत्मकथा, तीन निबंधमाला, अनेक कवितासंग्रह आणि पाककृतींची पुस्तकंही लिहिली. हे करताना त्यांनी सामाजिक भानही जपलं. त्यामुळेच राजकीय कार्यकर्त्या आणि मानवाधिकार चळवळीच्या पुरस्कर्त्या म्हणून त्यांचं स्थान अमेरिकेच्या इतिहासात महत्त्वाचं आहे. त्यांच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीमुळे त्यांना पन्नासहून अधिक मानद पदव्या मिळाल्या. कित्येक प्रतिष्ठित पुरस्कार त्यांच्या वाट्याला आले. विशेष म्हणजे जगभरातील बहुतांश देशांमध्ये प्रवास करताना त्या तिथल्या भाषा शिकल्या. तिथे विविध पदांवर नोकऱ्याही केल्या. हा संक्षिप्त वैयक्तिक तपशील वाचूनच त्यांच्या असामान्य प्रवासाचा अंदाज करता येतो.

हे सगळं होतं त्यांच्या कारकिर्दीविषयी, पण त्यांच्या आयुष्यातही अतिशय अविश्वसनीय घटना घडल्या.

माया अँजलो यांना आपण आई होणार असं समजलं, तेव्हा त्या फक्त सोळा वर्षांच्या होत्या. कोणत्याही किशोरवयीन, अविवाहित मुलीच्या आयुष्यात उद्‌भवू शकतो, तसा तो प्रसंग होता. मायासारख्या मुलींसमोर अशावेळी दोनच पर्याय असतात, एक तर बाळाचा जो कोणी पिता आहे, त्याच्याशी लग्न करणं, नाहीतर बाळाचा त्याग करणं. माया यांच्या आयुष्यात सुदैवानं हे दोन्ही पर्याय सुचवणारं कोणी नव्हतं. आई होण्याच्या वाटेवर असलेल्या मायाच्या आयुष्यात विलक्षण अशी आई होती. तिनं बाळाला जन्म देण्यासाठी मायाला पाठिंबा दिला. या पाठिंब्याचं वेगळंच कारण होतं.

मायाच्या आईची आई म्हणजे आजी, मेरी ली ही गुलाम म्हणून राबत होती. मेरी ज्या गौरवर्णी मालकाकडे राबत होती, त्यानंच तिला गर्भवती केलं होतं. त्याचं नाव होतं जॉन साविन. साविननं तिच्या बाळाचं पितृत्व नाकारलं, इतकंच नाही तर तिच्या बाळाचा बाप दुसराच कोणीतरी आहे, असं तिच्याकडून लिहवून घेतलं. ते प्रकरण न्यायालयात गेलं होतं. साविन तिच्या बाळाचा पिता आहे आणि त्यानं दुसऱ्याचं नाव तिच्याकडून जबरदस्तीनं लिहवून घेतल्याचं सिद्धही झालं. पण साविन निर्दोष सुटला आणि मेरीला मिसुरीच्या एका गरीब कुटुंबात धाडलं गेलं. तिच्या पोटी जन्माला आली ती व्हिवियन. त्याच व्हिवियनची मुलगी होती माया.

माया आणि तिच्या आईच्या नात्याची अशी शोकांत कहाणी तिथेच संपणारी नव्हती. मायाचे वडील बेली जॉन्सन सीनिअर नौदलात होते. मायाचा जन्म ४ एप्रिल, १९२८ रोजी सेंट लुईस, मिसुरी इथे झाला. त्यांचं पाळण्यातलं नाव मार्गारेट जॉन्सन. माया तीन वर्षांच्या असताना आईवडिलांचा घटस्फोट झाला. पाच वर्षं आजोळी राहिल्यानंतर त्या आणि त्यांचा भाऊ आईकडे परतले.

आठ वर्षांच्या मायावर आईचा प्रियकर फ्रीमन यानं बलात्कार केला. तिनं ती गोष्ट भावाला, बेली ज्यु. याला सांगितली आणि त्यानं सगळ्यांना. त्यानंतर फ्रीमनला अटक झाली मात्र तो एका दिवसात जामिनावर सुटला. त्यानंतर चारच दिवसांत मायाच्या कुटुंबातील एका व्यक्तीनं त्यास ठार मारलं. आपल्यावर अत्याचार केलेल्या व्यक्तीचं नाव सांगितल्यामुळेच हे सगळं घडलं, असं माया यांना वाटलं. त्याच, अपराधभावामुळे त्या कोषात गेल्या. पाच वर्षं त्या भाऊ सोडून कोणाशी बोलल्याच नाही.



**बराक ओबामा आणि माया अँजलो**

त्या पाच वर्षांच्या मौनानं माया यांचं संपूर्ण आयुष्यच बदललं. भोवतालचं जग त्या जाणून घेऊ लागल्या. माणसाची वृत्ती, वर्तन समजून घेण्याचा प्रयत्न करायला लागल्या. माया त्यांच्या आयुष्यात शिक्षिका बर्था फ्लॉवर्स आल्या. त्यांच्या आग्रहामुळे माया पुस्तकं वाचू लागल्या. शेक्सपीयर, एडगर पो अशा साहित्यिकांच्या लिखाणानं भारावल्या. त्यांनी त्यांचं साहित्य नुसतं वाचलं नाही तर सगळं पाठही करून ठेवलं होतं.

जगातल्या कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्याच्या वाट्याला आलं नसेल, इतकं विलक्षण आयुष्य त्या जगल्या. नुसत्या जगल्या नाहीत तर इतरांना प्रभावित करू शकल्या म्हणूनच एकविसाव्या शतकातील सगळ्यात प्रभावशाली म्हणून माया अँजलो यांचं नाव प्रामुख्यानं घेतलं जातं. त्याची बीजं त्या मौनकाळात रुजली होती.

त्यांच्या आईनं १९४० या वर्षी लग्न केलेल्या दुसऱ्या घरात ही दोन्ही मुलं परतली. त्या नव्या घरात त्यांना आईबरोबर पटवून घेणं कठीण जात होतं. मग माया वडिलांकडे गेल्या तरीही तिथे प्रेमाचा लवलेशही नव्हता. त्यामुळे त्यांना घराबाहेर पडणंच अधिक बरं असं वाटलं. बेघर मुलं राहतात, अशा भंगारगाड्यांसाठी असलेल्या जागेत त्या राहायला लागल्या.

पोटापाण्यासाठी काम पाहणं गरजेचं होतं. ही गरजच त्यांच्या नावावर एक वेगळाच लौकिक नोंदवणारी ठरली. तिथे ट्राम कंडक्टर म्हणून त्यांनी काम सुरू केलं. कृष्णवर्णीय समाजातील त्या पहिल्या ट्राम कंडक्टर होत्या. हे काम त्यांच्या निर्वाहाचं साधन होतं. त्यांचं खरं प्रेम होतं ते नृत्य आणि संगीतावर. त्यासाठी त्यांनी 'कॅलिफोर्निया लेबर स्कूल'मध्ये प्रवेश घेतला. तिथे, त्यांना डान्स अँड ड्रामा या विषयात शिष्यवृत्ती मिळाली. अर्थात शैक्षणिक आयुष्याबरोबरच त्यांना पैशांसाठी आणि मुलांसाठी नोकरी करण्याची गरज होती.

कृष्णवर्णीयांसाठी उपलब्ध असलेल्या संधी आणि कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेता, त्यांना अपेक्षित संधी मिळण्यासाठी बरीच वाट पाहावी लागली. कधी कधी त्यांनी हॉटेलमध्ये कूक म्हणूनही काम केलं. हा संघर्ष छोट्या क्लबपासून स्ट्रीप क्लबमध्ये कोणत्याही ठिकाणी काम करण्यापर्यंत सुरूच होता. १९५०च्या सुरुवातीला सॅन फ्रान्सिस्को शहरात नर्तिका आणि गायिका म्हणून त्या लोकप्रिय होऊ लागल्या.

माया यांनी १९५१मध्ये तोश एंजेलिस या खलाशी म्हणून अमेरिकेत आलेल्या ग्रीक इलेक्ट्रिशियनशी लग्न केलं. त्याला संगीतकार म्हणून नाव कमावायचं होतं. लग्नानंतर नृत्य, संगीताचं पुढील शिक्षण घेण्यासाठी ते न्यू यॉर्कला पोचले.

त्यांचं धडपडत सुरू असलेलं पाच वर्षांचं वैवाहिक आयुष्य नात्यातल्या दुराव्यानं संपलं. मग सॅन फ्रान्सिस्को शहरात व्यावसायिक नर्तिका म्हणून काम करणं माया यांना भाग पडलं. यापैकी एक नाइट क्लब होता 'पर्पल अनियन.' तिथल्या व्यवस्थापकानं त्यांचं खरं नाव वापरता येणार नाही, असं सांगून टाकलं. कदाचित समाजात नाइट क्लबविषयी असणाऱ्या समजामुळे तसं सुचवलं असावं. मग त्यांनी नाव बदलून माया अँजलो असं ठेवलं. त्यांचा भाऊ बेली त्यांना माया या नावानं त्यांना हाक मारायचा. तर अँजेलो हा त्यांच्या अँजेलिस आडनावाचा अपभ्रंश होता. त्यावेळी कृष्णवर्णीयांचं पारंपरिक नृत्य असलेलं नृत्य सादर करायच्या.

एका ऑपेराच्या चमूसह अँजेलो युरोपला गेल्या. तब्बल बावीस देशांना त्यांनी भेट दिली. त्या प्रत्येक देशाची भाषा शिकण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कॅलिप्सो आणि ऑपेराच्या या अनुभवामुळे त्यांनी पहिला अल्बम 'मिस कॅलिप्सो' रेकॉर्ड केला. त्याला पुरेसं यश मिळालं नाही तरी त्यातील गाणी लिहिल्यानं त्यांची साहित्यिक वर्तुळात हळूहळू चर्चा व्हायला लागली.

माया यांची कादंबरीकार जॉन ऑलिव्हर किलेन्स यांच्याशी भेट झाली. त्यांनी न्यू यॉर्कला स्थायिक होऊन लिखाणावर लक्ष देण्याचा सल्ला दिला. तो मान्य करत त्या न्यू यॉर्कला पोचल्या. तिथे जाऊन त्या हार्लेम रायटर्स गिल्डमध्ये सामील झाल्या. तेव्हा त्या अफ्रिकन-अमेरिकन नामवंत, वलयांकित साहित्यिकांना भेटत गेल्या. याच साहित्यिक वर्तुळामुळे त्यांची भेट मानवी हक्क नेते मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर यांच्याशी झाली.

अमेरिकेतील कृष्णवर्णीयांच्या चळवळींमुळे समाजात उलथापालथ होत असताना माया आपल्या आयुष्याच्या जमाखर्चात अडकलेल्या होत्या. माया अँजलो नृत्य आणि संगीतामुळे रंगमंचाशी

जोडल्या गेल्या. याच नाटकामुळे त्या घाना दौऱ्यावर गेल्या. तिथे त्यांना दक्षिण आफ्रिकेचे स्वातंत्र्यसैनिक वसुमझी मेक भेटले. माया आणि मेक यांनी लग्न केलं नाही. मात्र त्यांच्याबरोबर माया कैरोला गेल्या. या  काळात त्यांचा प्रवास पत्रकार ते संपादक असा घडला.  मेक आणि त्यांच्या नात्यातला दुरावा त्यांना पुन्हा घानाला जाण्यासाठी भाग पाडणारा होता. या सर्व घडामोडींत त्यांचा मुलगा अपघातात गंभीर जखमी झाला. त्याची काळजी घेत घेत, त्या काम करत राहिल्या. घाना विद्यापीठात प्रशासक झाल्या. त्यावेळी त्या आफ्रिकन–अमेरिकन संघटनांमध्येही सक्रिय होत्या. तेथील वर्तमानपत्रांसाठी लिखाण, रेडिओ, नाट्यसंस्थेसाठी त्यांनी विपुल लेखन आणि जबाबदारीची बरीच कामंही केली.

घानामध्येच त्यांचा परिचय कृष्णवर्णीयांच्या अधिकारासाठी लढणाऱ्या माल्कम एक्स यांच्याशी झाला. १९६४मध्ये अमेरिकेत परतल्यावर वर्णद्वेषविरोधी अमेरिकी लढ्याच्या चळवळीचं काम सुरू केले. मात्र माल्कम एक्स यांच्या हत्येनंतर माया यांचा चळवळीतील सहभाग थांबला. मग त्या हवाईला भावासोबत राहू लागल्या. संगीतावर पुन्हा एकदा लक्ष द्यायचं ठरवलं. काही दिवसांत पुन्हा लॉस एंजल्सला आलेल्या माया यांनी लिखाणाला प्रारंभ केला. एका कंपनीत त्या मार्केटिंग रिसर्चर म्हणून नोकरी करत असताना अमेरिकेतलं सामाजिक, राजकीय वातावरण ढवळून निघाल्याचं पाहत होत्या. श्वेत–अश्वेतांच्या दंगलींमुळे त्यांचं संवेदशील मन आणखी व्यथित झालं. त्याचं प्रतिबिंब त्यांच्या कविता, लिखाणामध्ये दिसत होतं. त्यांची प्रत्येक कविता प्रेरणादायी ठरली. स्त्रीवादी, वंशभेदाच्या चळवळीचं गीत बनली.  त्यामुळेच मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर यांनी १९६८मध्ये त्यांच्याकडे कृष्णवर्णीयांच्या मोर्च्याच्या आयोजनाची जबाबदारी दिली. त्यांनी ती मान्य केली. हा मोर्चा काही कारणानं पुढे ढकलला आणि त्याचदम्यान मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर यांची हत्या झाली. माया यांच्यासारख्या कार्यकर्तीसाठी हे खूपच धक्कादायक होतं.

या धक्क्यातून सावरण्यासाठी लिखाण हाच आधार होता. कोणताही अनुभव गाठीशी नसताना त्यांनी दहा भागांच्या डॉक्युमेंटरीची निर्मिती करायचं ठरवलं. त्याचं लिखाण, निर्मिती या सगळ्याचा भार उचचला. त्या डॉक्युमेंटरी मालिकेचं नाव होतं, 'ब्लॅक, ब्ल्यूज, ब्लॅक.' ब्ल्यूज संगीत आणि अमेरिकेतील कृष्णवर्णीयांचा वारसा याचा अतिशय वेधक मागोवा घेण्याचं काम त्यांनी केलं.


अनेक उलथापालथी घडत असताना माया यांच्या आयुष्याला एक क्रांतिकारी वळण लागलं ते १९६८मध्ये. मित्रमैत्रिणी, हितचिंतकांच्या आग्रहाखातर त्यांनी आपली आत्मकथा निवेदनात्मक कादंबरीच्या रूपात लिहिली. 'आय नो व्हाय द केज्ड बर्ड सिंग्ज' ही त्यांची पहिली आत्मकथा, प्रचंड लोकप्रिय ठरली.

लैंगिक अत्याचार–वर्णभेद आणि आईवडिलांचा घटस्फोट, त्यातून घडलेल्या आयुष्याचं चित्रण त्यात केलं. कृष्णवर्णीय म्हणून जगताना आलेली दुःख, द्वेष, भेदाभेद, उपेक्षितांच जगणं सगळंच सहजपणे लिहित्या झाल्या. काही–काही वर्षांच्या अंतरानं त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्याविषयी त्यांनी आत्मकथा लिहिली. या आत्मकथेतून त्यांचं संघर्षमय, गुंतागुंतीच्या नातेसंबंधाचं आयुष्य उलगडत गेलं. त्यांच्या आयुष्यातील घटनांनी त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली पण स्त्रीवादी मूल्यं कायम राहिली. त्यांच्या लिखाणात वैयक्तिक दुःखच अधिक असल्याची, हिंसा आणि लैंगिकता असल्याची टीका केली गेली. इतकंच नाही तर पहिल्या आत्मकथेवर अश्लिलतेच्या आक्षेपाखाली बंदीही आणली गेली. मात्र आयुष्य जगताना आणि ते लेखणीतून उतरवताना स्त्री म्हणून असणं त्यांनी अधिक ठळकपणे मांडलं होतं. त्यामुळेच त्या जगभरातील महिलांचं प्रेरणास्थान ठरल्यात.


**– अपर्णा पाटील**
भ्रमणध्वनी :  ८९८३८२०२०२
aparna.patil1@gmail.com

ग्रंथाली


**प्रसिद्ध झालेले कवितासंग्रह**



**कबीराच्या कविता**
शर्मिला प्रभुणे
**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



**रति–विलास**
मंजिरी पाटील
**मूल्य १०० रु.  सवलतीत ६० रु.**



**उन्हानं बांधलं सावलीचं घर**
भाग्यश्री केसकर
**मूल्य १५० रु.  सवलतीत ९० रु.**



**प्रतिभा सराफ**

# अजूनही खूप काही...

''**भा**रतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. रोहिणी गोडबोले यांना फ्रान्स सरकारच्या 'ऑर्डर नॅशनल दी मेरिट' या सर्वोच्च पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. त्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू येथे कार्यरत आहेत. त्यांना मिळालेला सन्मान देशासाठी अभिमानाची बाब आहे.''

एके दिवशी सकाळी अशा बातम्या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर झळकल्या आणि मन अनेक वर्षं मागे माझ्या कॉलेजविश्वात जाऊन पोचले. मी मुंबई विद्यापीठामध्ये भौतिकशास्त्रात एम.एससी. करत होते तेव्हा आम्हाला 'क्वांटम मेकॅनिक्स' (Quantum Mechanics) हा विषय शिकवायला डॉ. रोहिणी गोडबोले नावाच्या प्रोफेसर होत्या, याची सुखद आठवण झाली आणि मन प्रफुल्लित झाले. या लेखासाठी त्यांच्याशी बोलताना मनस्वी आनंद झाला.

डॉ. गोडबोले लिनियर कोलायडरच्या इंटरनॅशनल डिटेक्टर अॅडव्हायझरी ग्रुपमध्ये (आयडीएजी) २००७ ते २०१२ या कालावधीत सहभागी झाल्या होत्या. इंटरनॅशनल डिटेक्टर अॅडव्हायझरी ग्रुप आयएलसी डिटेक्टरचे संशोधन, संशोधन संचालनालयाचा विकास यावर आणि डिटेक्टर डिझाईन गटांवर लक्ष ठेवतो. बंगळुरू येथील भारतीय विज्ञान अकादमीच्या विज्ञानक्षेत्रातील स्त्रियांच्या पुढाकाराबद्दल काम करणाऱ्या सदस्यगटाच्या त्या संस्थापक अध्यक्षा होत्या व सध्या त्या त्याच्या सदस्य आहेत.

'हिग्ज बोलॉन्स' यासारख्या अतिसूक्ष्म कणाविषयी तात्त्विक संशोधन करणाऱ्या जगातील संशोधकांमध्ये त्यांचा समावेश आहे.

'सायन्स करिअर फॉर इंडियन विमेन' या विषयावरील भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमीचा अहवाल 'ट्रेण्ड सायंटिफिक विमेन पॉवर : व्हॉट फ्रॅक्शन आर वुई लूजिंग अँड व्हाय? (Trained Scientific Women Power : what fraction are we losing and why?) अशा प्रकारचा सर्व्हे करून घेण्यात आणि तो प्रकाशित करण्यात त्यांचा सहभाग होता.

त्या 'लीलावतीज डॉटर्स' या १०० निवडक भारतीय संशोधिकांवरील पुस्तकाच्या संपादिका आणि सहलेखिका आहेत.

'द गर्ल्स गाइड टू ए लाइफ इन सायन्स' या पुस्तकाच्या सहसंपादिका आहेत.

फ्रान्सचा 'नॅशनल ऑर्डर दी मेरीट' सन्मान, फ्रान्स आणि भारत यांच्यातील संयुक्त संशोधन प्रकल्प; तसेच, मूलभूत विज्ञान संशोधनात महिलांचे प्रमाण वाढावे, यासाठी केलेल्या कामगिरीबद्दल २०२१ सालचा पुरस्कार त्यांना मिळाला. तसेच भारत सरकारकडून पद्मश्री हा पुरस्कार (२०१९) मिळाला. त्यांना मिळालेल्या पुरस्कारांची यादी खूपच मोठी आहे!

मी शाळा-कॉलेजमध्ये असलेले अनेक शिक्षक पाहिले होते. या पार्श्वभूमीवर रोहिणी गोडबोले अतिशय वेगळ्या आहेत, हे पहिल्या लेक्चरमध्ये लक्षात आले. कोणत्याही प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन तिथून सुरुवात करून ते त्या प्रश्नांची उकल करायच्या; तेही न कंटाळता आणि चिडता! त्यामुळे माझ्यासहित सगळ्याच विद्यार्थ्यांचा गलका त्यांच्या आजूबाजूला असायचा. त्यांना कोणताही प्रश्न विचारण्याची आम्हाला कधी भीती वाटली नाही. पोस्ट ग्रॅज्युएशन करत असताना असेही कुठेतरी वाटून गेले की जर आपण एखाद्या कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून लागलो तर त्यांच्यासारखे आपल्याला



शिकवता आले पाहिजे! (आता इतके वर्षे शिकवत आहे परंतु 'तसे' जमत नाही, हे मात्र मला कबूल करावेसे वाटते.)

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात योगायोग जुळून येतातच! एकदा 'इंटरनॅशनल युनियन ऑफ प्युअर अँड अप्लाइड फिजिक्स' या विज्ञानाच्या जागतिक परिषदेमध्ये डॉ. रोहिणी गोडबोले यांनी भाषण दिले. त्यानंतरच्या चर्चासत्रात काही महिलांनी येऊन त्यांना सांगितले, की तुम्ही जे काही बोललात, ते आम्हाला आमच्या जगण्याशी निगडित करता आले!

हे त्यांचे मत ऐकून मॅडमच्या एक गोष्ट लक्षात आली की मादाम क्युरी किंवा रोझलिंड फ्रँकलीन यांच्याविषयी आपण जे ऐकलेले असते तेव्हा त्यांचे जग आपल्यापेक्षा वेगळे आहे आणि ह्या मार्गावर वाटचाल करणे हे काही येऱ्यागबाळ्याचे काम नाही असे वाटून त्यांच्याकडून स्फूर्ती मिळूनही आपण तो मार्ग चोखाळण्याचा विचार करत नाही. परंतु आपल्यासारख्या जगात राहणाऱ्या शास्त्रज्ञांबद्दल काही ऐकले अथवा वाचले तर एक म्हणजे त्या गोष्टी जास्त जवळच्या वाटतात आणि त्यांनी मिळवलेले यश नोबेल पारितोषिकाइतके मोठे नसले तरी त्यांचा प्रवास आपल्या आवाक्यातला वाटतो. शास्त्राच्या प्रगतीमध्ये काहीतरी वेगळे आणि महत्त्वाचे काम त्यांनी केलेले असते आणि त्या अगदी आपल्या शेजारच्या घरात राहत आहेत, इतक्या जवळच्या वाटू शकतात. त्यांना हे जमले तर आपणही हे स्वप्न पाहू शकतो असे प्रोत्साहन मिळते. अशा महिलांचा परिचय सर्वसामान्य माणसांसमोर यावा असे त्यामुळे वाटून गेले. शिवाय कोणत्याही शाळेत आपण गेलो आणि विद्यार्थ्यांना दोन शास्त्रज्ञांची नावे विचारली तर त्यांना सामान्यपणे सांगता येणार नाहीत आणि सांगितलीच तरी त्यात कोणत्याही 'महिला शास्त्रज्ञा'चे नाव नक्कीच नसते, ही गोष्ट लक्षात आली. म्हणूनच एकंदरीतच सर्व माणसांसमोर सायन्स क्षेत्रातील महिला 'रोल मॉडेल' आणण्याची त्यांना गरज वाटली.

'Physics is my first love' असं मानणाऱ्या डॉ. रोहिणी गोडबोले यांना 'महिला शास्त्रज्ञां'साठी खूप काही काम करावेसे वाटते. त्यासंदर्भात त्यांनी पुढे सांगितले की–

महिला शास्त्रज्ञांसमोर तर अनेक प्रश्न आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांना मदत करणे, त्यांच्या क्षेत्रात महत्त्वाचे टप्पे ओलांडण्यासाठी सल्ल्याची, सहकार्याची, कुठल्याही प्रकारच्या आधाराची जरूर असेल तर ती कशी मिळू शकेल याचा विचार करणे हे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर जोमाने पुढे जाण्यासाठी त्यांच्यापुढे काही 'आदर्श' ठेवण्याची गरज आहे. त्यातून त्यांना उमेद तर मिळतेच, शिवाय त्यांनी ठरवलेले ध्येय साध्य करता येते, याविषयीचा आत्मविश्वासही वाढतो. आपण जे करत आहोत ते कोणीतरी आधी करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्यांना ते जमलेले आहे, हे दाखवून दिले की त्यांना स्फूर्ती मिळते!

येथे डॉ. रोहिणी गोडबोले यांनी एक उत्तम उदाहरण दिले. रशियन चेस चँपियन गॅरी कास्पारोव्ह आपल्याला माहीत असतो, परंतु आपण विश्वनाथ आनंद यांचे नाव ऐकतो तेव्हा आपल्याला ते नाव अधिक जवळचे वाटते आणि बुद्धिबळामध्ये प्रावीण्य मिळवू पाहणाऱ्यांची संख्या वाढते. कारण गॅरी कास्पारोव्हपेक्षा विश्वनाथ आनंद आपला, जवळचा वाटतो आणि जास्त सहजतेने आपला 'आदर्श' होतो.

आपल्या घडणीबद्दल त्या सांगतात, प्रामाणिकपणे सांगायचे तर शास्त्राच्या क्षेत्रात माझ्यासमोर कोणतेही 'आदर्श' नव्हते. माझ्या घरात अतिशय हुशार आणि उच्चशिक्षित नातेवाईक होते. त्यांनी भाषा, इतिहास, पॉलिटिक्स या विषयांमध्ये बी.ए., एम.ए. असे शिक्षण घेतलेले होते. त्यांच्यात काही वकील, डॉक्टरही होते. परंतु 'प्युअर सायन्स' घेतलेले कोणीही नव्हते. त्यामुळे या विषयाची माहिती मला जितकी हवी तितकी घरच्या माणसांकडून मिळू शकली नाही.

परंतु मी शाळेत शिकत होते तेव्हा सातवीत असताना 'मेरिट स्कॉलरशिप परीक्षा' देण्याच्या निमित्ताने शाळेतल्या शिक्षिकेच्या पतीकडून मला 'शास्त्र' या विषयाचे अधिक ज्ञान मिळाले. त्यामुळे शास्त्र या विषयाची आवड त्यांच्या शिकवण्यातून खऱ्या अर्थाने निर्माण झाली. पुढे 'संशोधन' या क्षेत्राकडे वळण्याची आवड 'नॅशनल टॅलेंट सर्च'मुळे झाली. तसे 'गणित', 'विज्ञान' किंवा 'संस्कृत' या विषयामध्ये डॉक्टरेट मिळवण्याचे मी ठरवले होते!

शालेय पातळीवरील 'विज्ञानाचा प्रसार आणि प्रचार' या शिक्षणाच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर डॉ. गोडबोले म्हणाल्या,

Whether Exam is gendered...?

Whether Teaching is gendered...?

या हेतूने शिक्षणाकडे मला पाहायचे आहे.

येथे मला मुद्दाम सांगायला आवडेल की लिंगविरहित 'एक शास्त्रज्ञ' म्हणून स्त्री संशोधकांना सन्मान मिळावा यासाठी

डॉ. गोडबोले आग्रही आहेत!

त्या पुढे म्हणाल्या, आमच्या घरात 'उत्तर रामचरित्र'मधल्या या श्लोकाचा अर्थ काय?' अशा चर्चा चालायच्या. कळत्या वयात ऐकलेल्या 'कुमारसभंव', 'मेघदूत', 'उत्तर रामचरित्र' यातील काही द्विपदी आणि नोंदी आजही लक्षात आहेत. मात्र 'प्युअर सायन्स' आपल्या आपणच कळत गेलं.

'माझी आई आणि माझे वडील हेच माझे रोल मॉडेल होते' हे सांगायला मला अभिमान वाटतो. ते शास्त्रज्ञ नव्हते परंतु आयुष्यामध्ये चांगले कसे, काय करता येईल आणि जो मार्ग निवडला आहे त्या मार्गावर कसे चालत राहता येईल, हे त्यांनीच आम्हा मुलींना उत्तमरीत्या शिकवले. जे शिक्षण घरातच मिळाले त्याचा आजही नक्कीच उपयोग होतो आहे!

गोडबोलेमॅडम यांच्या आईचा विषय निघाला म्हणून त्यांच्याविषयी अधिकची माहिती देते. त्यांच्या आई उत्तम दर्जाच्या कविता लिहायच्या. बहिणीही कविता लिहितात आणि हे सांगताना रोहिणी गोडबोले म्हणाल्या, की तरुण वयात त्याही कविता लिहायच्या! अलीकडेच त्यांनी त्यांच्या आईच्या आठवणींचे एक पुस्तक प्रसिद्ध केले. यासंदर्भात त्यांना एक आठवण झाली ती अशी, की एका वर्षी त्या पहिली ते अकरावी या शाळेतल्या सर्व तुकड्या, सर्व वर्गांत मिळून पहिल्या आल्या. ही गोष्ट त्यांनी आईला सांगितली तेव्हा आई थोडीशी नाखुश दिसली आणि म्हणाली, की तू मुलगा असतीस तर! मग डॉ. रोहिणीताई म्हणाल्या की त्याने काय फरक पडतो? आणि त्यांच्या आईला हे वाटले की खरेच काय फरक पडतो? या प्रसंगावर त्यांच्या आईने लिहिलेली ही कविता-

आज माझ्या परीक्षेचे फळ तुझ्या हाती आले
आणि तुझ्या डोळ्यांतून पूर अश्रूंचे लोटले
'नाव लावणारा' पुत्र, नाही होणे गं हातात
'नाव काढणारी' कन्या, आई होईन मी निश्चित!

मुलगा असो की मुलगी, त्याने कोणाचे नाव 'लावले आहे' यापेक्षा कशाप्रकारे आपले नाव 'काढले आहे' हे जास्त महत्त्वाचे आहे, ही गोष्ट आईने किती सहजपणे कवितेच्या चार ओळींमधून सांगितली, असे त्या आपल्या आईविषयी सांगताना मलाही त्या वर्गात किती आत्मीयतेने शिकवायच्या ते आठवले. 'क्वांटम मेकॅनिक्स'सारखा रुक्ष आणि समजायला कठीण विषय शिकवताना, विज्ञान विषयाची गोडी लागावी यासाठीही त्या प्रयत्नशील असायच्या! आता यूट्यूबवर त्यांची कितीतरी भाषणे ऐकता येतात. सायन्स संशोधनातल्या इतक्या कठीण गोष्टी त्या अशा काही उत्साहाने आणि रोजच्या जीवनातील समर्पक उदाहरणे देऊन सांगतात की ते व्याख्यान संपूच नये असे वाटते!

रोहिणी गोडबोले यांची आई अतिशय कष्टाने उच्चशिक्षित झाली. आईसारखी काही माणसे असतात आणि अप्रत्यक्ष शिकवतात. म्हणूनच डॉ. गोडबोले यांनी संशोधन करणाऱ्यांना अशी स्फूर्ती देण्याचे काम 'लीलावतीज डॉटर' या पुस्तकातून डॉ. राम स्वामी यांच्या सहयोगाने केले. या पुस्तकामुळे ज्या सर्व स्त्रियांवर हे लिहिले आहे, त्यांना त्यांच्या कष्टाचे फळ मिळाल्यासारखे वाटले; हा दुहेरी आनंद गोडबोलेमॅडम यांना मिळाला.

मी जेव्हा मुंबई विद्यापीठात एम.एस.सी.ला शिकत होते तेव्हा आम्हाला शिकवत असलेल्या किंवा गेस्ट लेक्चरर म्हणून येणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांबद्दलच्या आठवणींना उजाळा देण्याविषयी गोडबोलेमॅडम यांना सांगितले.

त्या मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये प्रोफेसर होत्या तेव्हा डॉ. रंगवाला हे 'फिजिक्स'चे हेड ऑफ द डिपार्टमेंट होते. त्यांच्यामुळेच त्यांना कॉलेजमध्ये शिकवण्याचे काम करताना, कधी टी.आय.एफ. आर. संस्थेत जाणे असो किंवा देशापरदेशात भाषण करायला जाणे, कॉन्फरन्सला जाणे असो, सहज शक्य झाले. रंगवालासरांनी प्रशासकीय पातळीवर नैतिक साहाय्य केलेच, शिवाय भरभरून पाठिंबाही दिला. केवळ त्यांच्यामुळेच संशोधनाचे काम करण्यासाठी त्यांना यथायोग्य वाव मिळाला, याचे संपूर्ण क्रेडिट त्यांनी सरांना दिले. रंगवालासर हे आदर्श आणि बुद्धिमान शिक्षक आहेतच, तसेच उत्तम माणूस आहेत, हे सांगताना 'मी नशीबवान आहे की मला काळजीवाहू ज्येष्ठ सहकारी लाभले.' हे मात्र गोडबोलेमॅडम यांनी आवर्जून सांगितले.

अत्यंत हुशार आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व असणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांसारख्या शास्त्रज्ञांबरोबर बोलण्याचा आणि काही समित्यांवर बरोबरीने काम करण्याचा योग त्यांना आला होता.

डॉ. रोहिणी गोडबोले यांच्या एका भाषणात मी त्यांना 'पंचमहाभूते' याविषयी बोलताना ऐकले होते. त्यावर अधिक प्रकाश टाकावा अशी त्यांना विनंती केली तेव्हा त्यांनी सांगितले, की अगदी सुरुवातीच्या काळापासून मानवाला एक प्रश्न पडायचा की, नेमके 'काय मूलभूत आहे?' भारतामध्ये आपण 'पंचमहाभूते' म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश समाविष्ट आहेत, याने विश्वाची निर्मिती झाली आहे असे मानायचो तर ग्रीकमध्ये पृथ्वी, तेज, वायू, आकाश या चार घटकाने विश्व निर्माण झालेले आहे, असे मानले जायचे. हा साधारण दोन हजार वर्षांनंतर बौद्धिक-वैचारिक प्रवास थांबलेला आहे आणि आता 'कण भौतिकी'ने (पार्टिकल फिजिक्स) असे सिद्ध झाले आहे की हे मूलभूत कणांचे जग 'क्वार्क्स', 'लेप्टॉनस' आणि त्यांच्यामधील अपकर्षण अथवा आकर्षण याला जबाबदार असलेले गेज बोसान्स यांनी बनलेले आहे. त्यासाठी जे गणिती सिद्धांत मांडले गेले ते बरोबर आहेत, याचा शेवटचा पुरावा म्हणजे L H C ला सापडलेला हिग्ग्स बोसॉन (Higgs Boson). तो ह्या गटातील शेवटचा मूलकण. विश्वातील मूलकण कोणते या प्रश्नाचे शेवटचे उत्तर सध्या तरी या मूलकणांच्या समूहात आहे .

खरे तर जग बदलणारे शास्त्रज्ञ असतात! तरीही ते कोणाचे 'आदर्श' असत नाहीत किंवा ज्या प्रमाणात मिळायला हवे त्या प्रमाणात त्यांना सेलिब्रिटी स्टेटस मिळत नाही याविषयी मी

गोडबोलेमॅडमना विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या, 'शास्त्रज्ञांना सेलिब्रिटी स्टेटसची काही गरज नाही, पण आपल्या सर्वांना शास्त्राच्या आपल्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या स्थानाची जाणीव हवी. सर्वसामान्य माणसांचे जाऊ द्या, परंतु उच्चशिक्षित, शास्त्राचे शिक्षण घेतलेली किती माणसे एखाद्या प्रश्नाचा अभ्यास करून व्हॉट्सअ‍ॅपवर स्टेटमेंट टाकतात? किंवा ज्या काही गोष्टी व्हॉट्सअ‍ॅपवर येतात. त्यापुढे पाठवण्याआधी हे बरोबर असेल की नाही, शक्य आहे की नाही, या प्रश्नाचा किती जण विचार करतात? किती उच्चशिक्षित (इंजिनीयर, डॉक्टर) वैगरे शास्त्राची बांधिलकी जपतात हा प्रश्न आहेच. त्यामुळे लोकांना शास्त्रज्ञांची माहिती असावी की नसावी यापेक्षा लोकांना 'शास्त्रीय दृष्टिकोन' असायला हवा, असे मात्र मनापासून वाटते.'

या मुलाखतीदरम्यान काही महत्त्वाचे मुद्दे डॉ. गोडबोले यांनी मांडले-

'मानवता आणि शास्त्र' हे दोनही विद्यार्थ्यांना शिकवणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे एखाद्या आय.ए.एस. ऑफिसरला शासनाच्या एखाद्या शास्त्रीय धोरणाबद्दल निर्णय घेताना बरोबर निर्णय घ्यायला मदत करेल असे ज्ञान असेल आणि शास्त्रज्ञांना आपली सामाजिक बांधिलकी काय आहे ह्याची जास्त चांगली कल्पना येईल.

शास्त्रीय दृष्टिकोन हा प्रत्येकामध्ये यायला हवा. विज्ञानाची कोणतीही डिग्री (डॉक्टर, इंजिनीयर अशी) असलेल्या माणसांमध्ये तो असतोच, असे नाही. तो कसा तयार होईल आणि तो कसा जोपासता येईल, हे शैक्षणिक क्षेत्राचे काम आहे. 'कोविड'च्या निमित्ताने हेच जास्त मोठ्या प्रमाणावर प्रत्ययास आले. शास्त्रज्ञांची जबाबदारी किंवा कर्तव्य आहे की थोडे समाजाभिमुख होऊन समाजाला समजावून देणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जनमानसात 'शास्त्रीय दृष्टिकोन' रुजवणे!

जीवनात आनंदही खरोखरी महत्त्वाचा आहे, याच विचाराने, रोहिणी गोडबोले यांना, आपल्या व्यग्र जीवनात खरेच मोकळा वेळ मिळतो का? किंवा मिळाला तर त्या नेमका त्याचा उपयोग कसा करतात? त्यांचे आनंद कोणते? याची उत्सुकता मला होती. याबद्दल मी थोडे घाबरतच विचारले, पण त्या मात्र या प्रश्नांवर खूप भरभरून मोकळेपणाने बोलल्या.

'मी टीव्ही पाहते.' असे मनापासून हसून सांगितले. त्यांना प्रवास आवडतो. त्यामुळे सर्व निसर्ग आणि डिटेक्टिव्ह मालिका पाहायला आवडतात असे सांगितले. डिटेक्टिव्ह शोमध्ये आपली उत्सुकता ताणली जाते. आपणही पुढे काय असेल, अशा तऱ्हेने विचार करतो, तर कधी गंमत अशी असते की डोके गहाण ठेवूनही आपण ते पाहू शकतो. 'आघाता क्रिस्ती' यांच्या कादंबरीवर आधारित मालिका त्या पाहतात. प्रसिद्ध लेखक 'जॉन लकार' यांच्या कादंबऱ्या झपाटल्यासारखा त्यांनी वाचल्या आहेत. या कादंबऱ्यांवर चित्रित झालेल्या मालिका वा सिनेमे त्या आवडीने पाहतात. एकंदरीत टीव्ही वा तत्सम ऑनलाइन कार्यक्रम कामात बदल आणि आनंदाचा भाग म्हणून त्या पाहतात.

डॉ. रोहिणी गोडबोले यांना साहित्याची कितपत आवड आहे याचीही मला उत्सुकता होती.

'I am almost an Omnivorous!' म्हणत त्या पुस्तकांच्या दुनियेत दंग झाल्या. माझ्याशी बोलता बोलता भारावून जात त्यांच्या पुस्तकाच्या कपाटांसमोर जाऊन उभ्या राहिल्या आणि बोलू लागल्या, की चांगले जुने साहित्य भरभरून वाचले आहे, पण अलीकडच्या काळातील साहित्य फारसे वाचनात आले नाही. लहानपणी 'शिरवाडकरांच्या कविता', 'नटसम्राट'सारखी नाटके, ह.ना. आपटे यांच्या 'मी', 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबऱ्या लहानपणी वाचल्याचे त्यांच्या लक्षात आहे. कॉलेजमध्ये असताना भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य वाचले होते आणि अलीकडच्या काळात नुकतीच नेमाड्यांची सगळी पुस्तके आणून वाचली, काही अर्थातच परत वाचली. पु.लं.ची पुस्तके, ग.दि.मा. यांच्या कविता, व्यंकटेश माडगूळकरांची पुस्तके असे सांगण्यासारखे खूप आहे. बाबूजींनी गायलेली, ग.दि.मा. यांनी लिहिलेली गाणी ऐकली की बालपण आठवते, असे म्हणाल्या. संदीप खरे आणि सलील कुलकर्णी यांच्या 'नामंजूर'नेही दिल खुश होतो. बेस्ट सेलर पुस्तकेही त्या वाचतात. क्रिमिनल, डिटेक्टिव कथा आवडतात हे आवर्जून सांगितले. 'ग्रीशाम', 'हॅरी पॉटर', 'इसॅक ॲसिमोव्ह', 'विल्यम डारलिम्पल' आणि इटालियन ऑथरची इंग्रजी भाषांतरित 'डॉन कॅमिलो सिरीज', जी थोडी विनोदी आहे. अर्थातच याशिवाय काही क्लासिक म्हणजे, 'टॉलस्टॉय', डोस्टोव्हस्की झोला, ऑस्कर वाईल्ड , अलेक्सान्देर सोलझेन्यत्स्यन अशा अनेक लेखकांच्या पुस्तकांचे उल्लेख त्यांनी केले. बोलता-बोलता गोडबोलेमॅडम म्हणाल्या की त्यांना जर्मन भाषा अवगत आहे आणि या भाषेतील 'हरमन हेस, बरटॉल्ट ब्रेच्ट' इत्यादी लेखकही वाचले आहे. एकंदरीत त्यांनी अफाट आणि अवांतर पुस्तकवाचन केले आहे. त्यांच्या वाचनाचा एक विस्तृत पट त्यांनी उभा केला! आणि त्यांना अनेक विज्ञानविषयक पुस्तके लिहायची आहेत, असा गौप्यस्फोटही केला.

डॉ. गोडबोले यांना मी शेवटचा प्रश्न असा विचारला, की आतापर्यंत तुम्हाला कोणीही विचारला नाही असा प्रश्न, ज्याविषयी तुम्हाला काही सांगावेसे वाटते?

या प्रश्नावर मॅडम फक्त खळखळून हसल्या. कोणतेही उत्तर देणे टाळले. मला असे वाटते की दिवसातले चोवीस तास ज्यांना अपुरे पडतात आणि रोजच विद्यार्थ्यांकडून, संशोधकांकडून, मीडियाकडून अनेक प्रश्नांची त्यांच्यावर इतकी सरबत्ती होते की असा कोणताही प्रश्न त्यांना विचारायचा कोणी बाकी ठेवलेला नाही! तरीही त्यांच्याकडे खूप काही सांगण्यासारखे आहे, हे मात्र निश्चितच!

**- प्रतिभा सराफ**

भ्रमणध्वनी : +९१ ९८९२५३२७९५

pratibha.saraph@gmail.com



**प्रशांत पवार**

# ‘लौंडे’ को मिली पद्मश्री...

**व**याच्या बाराव्या वर्षापासून ते आजतायागत तोंडाला पावडर आणि ओठांना लिपस्टिक लावून 'नाच' करणाऱ्या रामचंदर मांझी यांची अनेक वर्षांपासूनची तपश्चर्या अखेर यावेळी फळाला आली. २०१८ साली त्यांना पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला. अश्लील, बीभत्स अशी निर्भर्त्सना करत ज्या व्यवस्थेनं सांस्कृतिक परिघाच्या आजूबाजूलाही फिरकू दिलं नाही, त्या ‘लौंडा नाच’ या लोककला प्रकाराची आणि या कलेस मानाचा सन्मान मिळवून देणाऱ्या रामचंदर माझी यांची ही चित्तवेधक कहाणी...

-----------

आईये, आईये... अब आप के सामने आ रही है अपने जमाने की

शिरीदेवी!

ना ना

तो, अमिताभ बच्चन!

अरे ना रे माधे

वो तो अपने रामचंदर मांझी है रे...

प्रचंड टाळ्या आणि शिट्यांच्या कडकडाटात घागरा-चोळी, कानात झुमके, गळ्यात नेकलेस, माथ्यावर बिंदी आणि ओठांना लालभडक लिपस्टिक अशा पेहेरावात स्टेजवर तब्बल ९३ वर्षांचा ‘लौंडा’ रामचंदर मांझी यांची एन्ट्री होते. आपल्या खास भोजपुरी शैलीत रामचंदर गाऊ लागतात, ढोलकीच्या ठेक्यावर कंबरेला लटके देत नृत्य करू लागतात. गाण्याचे बोल असतात...



घर में रहे दूध पांच सेर, केहू जोरन दिहल एक धार.

का पंचाईत होखत बा, घीव साफे भईल हमार...

याचा अर्थ, माझ्या घरी जर पाच शेर दूध असेल आणि जर का कुणी त्यात विरजण घातलं, तर यात पंचायतीचा काय संबंध? त्यातून तयार होणारे तूप हे सरळ सरळ माझेच असणार आहे.

जिचा नवरा कामाचं निमित्त सांगून घरदार सोडून पळून गेलाय, तिथे जाऊन त्यानं दुसरं संधान बांधलं आहे आणि अशा परिस्थितीत त्याची पत्नी इतर कोणाकडून गरोदर राहिली तर... इतकाच कुतूहल चाळवणारा या गाण्याचा अर्थ नाहीये, तर मी कुणाशी संबंध ठेवावेत हा फक्त माझा प्रश्न असून माझ्या गर्भावर पूर्णपणे माझाच हक्क आहे, त्यात पंचायतीला नाक खुपसायचं काहीएक कारण काय, असा थेट सवाल एका स्त्रीनं व्यवस्थेला विचारला आहे! आणि हा सवाल केव्हा विचारलाय, जेव्हा ‘द सेकंड सेक्स’ (१९४९) हे सिमोन द बोव्हारचं क्रांतिकारक मानलं जाणारं पुस्तकही प्रकाशित झालेलं नव्हतं अशा काळात.

स्त्रीचा वेष धारण करून रामचंदर मांझी हे जे गाणं सादर करतात, ते गाणं लिहिलेलं असतं, त्यांचे गुरू भिखारी ठाकूर यांनी आणि मांझी ज्या पद्धतीनं हे गाणं आणि नृत्य सादर करतात त्या सादरीकरणाला सबंध बिहारमध्ये ओळखलं जातं ‘नाच’ या नावानं. ‘नाच’ म्हणजे, केवळ नृत्य नव्हे, तर स्त्रियांसारखी वेशभूषा करून गाणं, नृत्य आणि पौराणिक कथांचे सादरीकरण अशा एकत्रित लोककलेच्या फॉर्मला ‘नाच’ म्हटलं जातं. वयाच्या बाराव्या वर्षापासून आजतायागत तोंडाला पावडर आणि लिपस्टिक लावून ‘नाच’ करणाऱ्या रामचंदर मांझी यांची अनेक वर्षांपासूनची तपश्चर्या अखेर यावेळी फळाला आली, जेव्हा दोन वर्षांपूर्वी त्यांना प्रतिष्ठेचा संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला... हा सन्मान फक्त

**भिखारी ठाकूर आणि रामचंदर मांझी**

बिहारच्या छपरा इथे नाभिक समाजात जन्मलेले भिखारी ठाकूर रोजगाराच्या शोधात इतर बिहारी-युपी तरुणांप्रमाणेच कोलकाताला आणि त्यानंतर पुरी इथे स्थलांतरित होतात काय... तिथली लोकसंस्कृती, तिथल्या लोककला पाहून भारावून जातात काय, बिहारमधल्या सांस्कृतिक दारिद्र्याबद्दल आसवं गाळतात काय, आणि पुन्हा बिहारला परतून पुरुषांनीच स्त्रियांच्या भूमिका साकारणारे स्वत:चं एक सांस्कृतिक विश्व जन्माला घालतात काय... दलितांचं, वंचितांचं जीणं एका वेगळ्याच कलेच्या माध्यमातून समाजासमोर प्रस्तुत करतात काय, सारंचं थक्क करणारं. 'बिदेसिया' (परमुलुखात गेलेल्या कर्त्या पुरुषाची आळवणी करताना स्त्रीमनाचं दु:ख, वेदना हुरहूर आदी भावनांचं दर्शन घडवणारा कलाप्रकार) ही भिकारी ठाकूर यांची, १९१७ मध्ये नृत्य-नाट्य असलेली एक अजरामर कलाकृती. उत्तरेकडे असा एकही कलावंत नसेल, ज्याने रंगमंचावर 'बिदेसिया' केलं नसेल... 'बिदेसिया'च्या आजवर किती आवृत्त्या निघाल्या हेदेखील कोणी ठामपणे सांगू शकत नाही.

'बिदेसिया'चा एक अनोखा किस्सा रामचंदर मांझी सांगतात. भिखारी ठाकूर यांचं 'नाच पथक' प्रचंड लोकप्रिय झालं होतं, आणि देशभरात अनेक ठिकाणी त्याचे प्रयोग व्हायचे. असाच एक प्रयोग कोलकाताला पार पडला आणि दुसऱ्याच दिवशी पोलिस येऊन धडकले. भिखारी ठाकूर यांच्याविरुद्ध कोलकाताच्या काही मिल मालकांनी पोलिसतक्रार केली होती की, 'बिदेसिया' या नृत्यनाटिकेमुळे आमच्या कंपन्यांना टाळं लावण्याची वेळ आली आहे, कारण हे नाटक बघून आमच्या मिलचे कामगार घरच्या ओढीनं न सांगताच थेट त्यांच्या गावी निघून जातात. अशाप्रकारच्या तक्रारीमुळे पोलीसही बुचकळ्यात पडले होते. पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानं मग फर्मान सोडलं की बघूया तरी 'बिदेसिया' काय आहे. पोलिस स्थानकातच मग स्टेज उभारण्यात आलं, आणि 'बिदेसिया'चा प्रयोग पार पडला. प्रयोग संपला, तेव्हा तो पोलिस अधिकारी मोठमोठ्याने रडू लागला आणि भिखारी ठाकूर यांना म्हणाला, उद्याच मी माझ्या गावी, माझ्या कुटुंबाकडे निघून जाणार आहे...

'बिदेसिया'पाठोपाठ भिखारी ठाकूर यांच्या प्रतिभेतून आणखी काही कलाकृती साकारल्या गेल्या. स्त्रियांच्या अधिकारांवर आधारित 'बरधिचोर', बालविवाह आणि भ्रूणहत्येविरोधात 'बेटी बचवा' आणि वृद्धाश्रमावर आधारलेलं '**बूढशाला का बेयान**'... आणि परखड सामाजिक भाष्य करणाऱ्या या कलाकृतींचा काळ होता विसाव्या शतकातला...

अब देखल जाय कि गाय वास्ते गौशाला खुल गइल

रामचंदर मांझीचा नाही तर तो ज्यांनी 'नाच' जन्माला घातला, ते त्यांचे गुरू ज्यांना 'बिहारचे शेक्सपीयर' म्हणून ओळखलं जातं, त्या भिखारी ठाकूर यांचा आहे! अश्लील, बीभत्स अशी निर्भत्सना करत दलितांच्या, उपेक्षितांच्या, शोषितांच्या या 'नाच' नावाच्या लोककलेला 'लौंडा नाच' असं हिणवत ज्या व्यवस्थेनं सांस्कृतिक परिघाच्या आजूबाजूलाही फिरकू दिलं नाही त्या 'लौंडा नाच'चा हा सन्मान आहे...

दलित समाजाचे रामचंदर मांझी वयाच्या अकराव्या वर्षी भिखारी ठाकूर यांच्या पथकात सहभागी झाले होते. ''माझं सगळं आयुष्य मी भिखारी ठाकूर आणि 'नाच'ला समर्पित केलं होतं. इतकं की माझ्या लग्नाच्या दिवशीही मी कार्यक्रम सादर करून आलो होतो आणि लग्नाच्या दुसऱ्या दिवशीही 'नाच' करायला गेलो होतो. सुरैय्या, मधुबाला, साधना या जुन्या नट्यांसोबत मी 'नाच' केलाय. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी, जयप्रकाश नारायण, जगजीवन राम, नितीश कुमार, शरद यादव, रामविलास पासवान यांच्यासमोर माझे कार्यक्रम झाले असले तरी, राजकीय नेत्यांमध्ये लालुप्रसाद यादव यांनी मात्र माझ्यावर खूप प्रेम केलं. जेव्हाही लालुप्रसाद मला भेटत, तेव्हा ते नेहमी हेच म्हणायचे, की 'रामचंदरजी, आप जबतक जियें, भिखारी ठाकूर को जिंदा रखें.' इतकं करूनही माझ्या कुटुंबानं मात्र आजपर्यंत माझा कार्यक्रम पाहिलेला नाही! याचं कारण आमच्या या कलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन.'

आपल्या सबंध आयुष्याचा विस्तारपट उलगडून सांगताना रामचंदर मांझी यांच्या बोलण्यातून त्यांचे गुरू भिखारी ठाकूरबद्दल प्रचंड आदर व्यक्त होत असतो. आणि का नाही होणार, ज्या भिखारी ठाकूर यांना भोजपुरीचे शेक्सपीयर आणि तुलसीदास म्हणून संबोधलं जातं, ज्या महापंडित राहुल सांकृत्यायननं त्यांचा 'अनगढ हिरा' म्हणून गौरव केला आहे त्या लोककवी भिखारी ठाकूर यांच्यामुळेच तर आज भोजपुरीचं सांस्कृतिक स्थान उभं राहिलं आहे. प्रख्यात कवी केदारनाथ सिंह म्हणतात... 'ठनकता था गेंहुअन, तो नाच के किसी अंधेरे कोने से, धीरे धीरे उठती थी, एक लंबी और अकेली भिखारी ठाकूर की आवाज.'

गरीब वास्ते धर्मशाला खुल गइल,
गंवार वास्ते पाठशाला खुल गइल.
बड़ा अच्छा भइल. अब बूढ़ खातिर बूढ़शाला खुल जाइत,
बहुत अच्छा रहल ह;
काहे कि बूढ़ के बड़ा तकलीफ बीतत बा..
बूढ़ के खइला के फिकिर ना रहे.

गायींसाठी गोशाळा सुरू झाल्या, गरिबांसाठी धर्मशाळा... निरक्षरांसाठी शाळा सुरू झाल्या आता वृद्धांसाठी वृद्धाश्रम सुरू झाले तर किती बरं होईल... असा विचार भिखारी ठाकूर यांनी त्यावेळी मांडला होता. रोजगारासाठी, पैसे कमावण्यासाठी गावातले तरुण आता इतर राज्यात कायमचेच स्थलांतरित झाल्यामुळे, गावात फक्त हालअपेष्टांचा सामना करत वृद्ध आईवडीलच मागे राहिले आहेत ही सल त्यांना त्रास देत होती.

भिखारी ठाकूर यांच्याइतकं प्रखर सामाजिक भाष्य करणाऱ्या कलाकृती असतानाही त्यांच्या कलेला कधीही अभिजात दर्जा दिला गेला नाही. भिखारी ठाकूर यांचा वारसा पुढे चालवणाऱ्या रामचंदर मांझी यांच्यासारख्या अनेक कलाकारांना कायम दुर्लक्षित केलं गेलं. एकेकाळी जवळपास दीडशे ते दोनशे 'नाच पथक' एका मोठ्या वर्गसमूहाचं मनोरंजन करत असताना, त्यांच्या सामाजिक जाणिवांना जागृत करत असतानाही ही कला कायम बहिष्कृतच राहिली. आताआतापर्यंत या रामचंदर मांझीना कोणीही ओळखत नव्हतं. 'नाच'ची परंपरा जपणारे, ऑर्केस्ट्राकरण झालेला 'लौंडा नाच' आजही पारंपरिक पद्धतीनंच सादर करणारे रामचंदर मांझी यांना संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळावा, यासाठी त्यांचे अनेक शिष्य गेल्या काही वर्षांपासून अथक प्रयत्न करीत होते. भिखारी ठाकूरसोबत ज्या कलाकारांनी काम केलंय त्यापैकी आता फक्त रामचंदर मांझी हेच हयात आहेत, त्यामुळे अशा कलाकाराचं दस्ताऐवजीकरण व्हावं, त्यांच्या या कलेचं जतन-संवर्धन व्हावं, असं खरं तर कुणालाच वाटू नये? असे कुणाला वाटणारही नाही, कारण जिथे रामचंदरच्या गुरूना म्हणजे भिखारी ठाकूर यांनाच इथल्या समाजव्यवस्थेनं लाथाडलं तिथे रामचंदरची काय कथा? या सगळ्याचं मूळ हे जातीच्या उतरंडीत आहे. श्लील-अश्लीलतेत आहे. अभिजात-अभिरुचीहीन या तुलनेत आहे. सांस्कृतिक पर्यावरणरक्षकांमध्ये आहे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'लौंडा' या शब्दामध्ये आहे!

भारतीय जातिव्यवस्थेनं सांस्कृतिक क्षेत्राला दिलेल्या वळणांकडे पाहिलं असता, कलाक्षेत्रातलं जातवास्तव अधिक ठळकपणे दिसतं. भारतातल्या उच्च समजल्या जाणाऱ्या जातींनी ज्या दुय्यम दर्जाच्या कला आहेत, त्या समाजातल्या खालच्या जातींमध्ये वाटून आपल्या सांस्कृतिक आचरणात जातवर्चस्वाची झूल शाबूत राहील, याची सतत दक्षता घेतली आहे. भारतात कुठेही गेलो तरी लोककला प्रवाहित करणारे कलावंत, हे खालच्या जातीतलेच दिसतात. पण, लोककला जर आजच्या आधुनिक कलांच्या उद्गात्या असतील, तर भारतीय लोककलांची सतत उपेक्षा का होत राहिली?

बिहारचा 'लौंडा नाच' याच सांस्कृतिक राजकारणात जखडला गेलाय. 'मुन्नी बदनाम हुई' या गाण्यानंतर उत्तरेकडे 'लौंडा बदनाम हुआ, नसिबन तेरे लिए' या ताराबानो फैजाबादीच्या भोजपुरी गाण्यानं लोकप्रियतेचा कळस गाठला. गाण्याचे हेच शब्द नेमके 'लौंडा नाच'ला तंतोतंत लागू पडतात. 'लौंडा' या शब्दाचा सरळसरळ अर्थ म्हणजे मुलगा. बिहार, उत्तरप्रदेशसारख्या राज्यात जी मुलं बायकांप्रमाणे वेशभूषा करून नाच-गाणी करतात, त्यांना 'लौंडा' म्हणूनच ओळखलं जातं, आणि त्या नृत्याच्या प्रकाराला 'लौंडा नाच' म्हणून. आता एकदा का 'लौंडा' म्हटलं, की त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणार हे निश्चितच आणि झालंही नेमकं तसंच. त्यात खतपाणी घालण्याचं काम अगदी प्रकाश झा (हमरी चढ़ल बा जवनिया गवना ले जा राजा जी – चित्रपट 'दामुल') आणि अनुराग कश्यप (गँग्स ऑफ वासेपुर) या फिल्म इंडस्ट्रीच्या लोकांपासून लालूप्रसाद यादव, मुलायम सिंह यादव या राजकीय दिग्गजांनीदेखील केलं. लालूप्रसाद यादवांचं 'लौंडा नाच'वरचे प्रेम जगजाहीर आहे. त्यांच्या अनेक राजकीय रॅलीची आणि सभांची सुरुवात 'लौंडा नाच'नेच होत असे. इतका मोठा लोकाश्रय आणि राजाश्रय मिळूनही, असं नेमकं काय झालं, की लोककलावंत म्हणून सुरूवात करणाऱ्या या कलाकारांचा प्रवास 'लौंडा' या अश्लील आणि बदनामीकारक शब्दापर्यंत येऊन थांबला.



'तहलका' या मासिकात 'लौंडा नाच'वर एक रिपोर्ट प्रसिद्ध झाला होता. ज्येष्ठ नाटककार आणि लोककला अभ्यासक हसन इमाम या संदर्भात म्हणतात, की 'लौंडा नाच' असा कुठलाही फॉर्म लोककलेमध्ये कधीच नव्हता. इतिहासातही तसे दाखले मिळत नाहीत. एकोणिसाव्या शतकांपासून आजही भारताच्या गावागावांमध्ये जी नाटकं होतात, रामलीला, रामायण, महाभारताचे प्रसंग नाच-गाण्यातून सादर केले जातात, त्यात अनेक तरुणांनी स्त्रीपात्र रंगवलं आहे, त्या सगळ्यांना आपण 'लौंडा' म्हणतो का? मनोहर श्याम जोशी, बालगंधर्व, इतकंच नव्हे तर हबीब तनवीर, रतन थिय्याम यांच्या नाटकातही पुरुषांनी स्त्रियांच्या भूमिका साकारल्या आहेत... बिरजू महाराज किंवा इतर अनेक दिग्गज कथकनर्तक जे महिला नर्तकींप्रमाणे नृत्य सादर करतात त्यांनाही आपण 'लौंडा' म्हणणार का?

पूर्वी राजदरबारात नर्तकी नाचायच्या. पण, राजे-महाराजांचं युग संपलं आणि तवायफ, कोठेवाली, बायजींचं युग सुरू झालं. सामंती वर्चस्ववादी पुरुषी मानसिकतेनं पैशांच्या-बळाच्या जोरावर त्यांना आपल्या ताब्यात ठेवलं. इतर समाजातील महिलांना तर धर्मशास्त्रानं नाच-गाणं सादर करण्याची परवानगीच नाकारली होती. त्यामुळे एक खूप मोठा उपेक्षित, शोषित वर्ग नृत्यासारख्या मनोरंजनापासून वंचित राहिला होता. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी, त्यावर मात करण्यासाठी एका वेगळ्या शैलीचा जन्म झाला... पुरुषांनीच स्त्रिया बनून नाच-गाणं करण्याचा. अल्पावधीतच कलेचा हा फॉर्म इतका लोकप्रिय झाला, की त्यातून नाच-गाण्याची अनेक पथकं तयार झाली, नाच-गाण्यांचा आनंद लुटण्याची मक्तेदारी ज्या सावकार-जमीनदारांकडे होती त्याला फक्त या कलेनं आव्हानच नाही दिलं, तर स्वत:चे नायक जन्माला घातले. संस्कृतीच्या ठेकेदारांना, सांस्कृतिक पर्यावरणरक्षकांना अर्थातच हे मान्य होणारं नव्हतं आणि मग या कलेला सामाजिक मान्यता मिळू नये म्हणून सुरू झालं सांस्कृतिक राजकारण. या कलेला हिणवण्यासाठी, त्यावर अश्लिलतेचा शिक्का मारण्यासाठी 'लौंडा नाच' हा शब्द खास तयार करण्यात आला आणि मग काय...? शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या या लोककलेला इतक्या वर्षांनंतर म्हणजे २०१८ मध्ये संगीत नाटक अकादमीनं पुरस्कृत करून सामाजिक मान्यता देण्याचा प्रयत्न झाला यातच सगळं काही आलं!

या इतक्या प्रदीर्घ कालावधीत 'लौंडा नाच'चे अनेक दिग्गज कलावंत काळाच्या उदरात गडप होऊन गेले. त्यातलाच एक होता रसूल... इंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात रसूलदेखील सहभागी झाला होता, परंतु तो 'नाच'मधून समाजप्रबोधन करायचा... हजारोंच्या गर्दीला रसूलच्या 'नाच'मधून प्रेरणा मिळायची. कोण ओळखतं या रसूलला आणि या रसूलला आपण फक्त 'लौंडा' म्हणून खड्यासारखं बाजूला फेकून देणार. चाई ओझा हा असाच एक लोकप्रिय कलाकार, परंतु फक्त फरक इतकाच चाई ओझा हा दलित समाजापैकी नसून ब्राह्मण जातीचा होता. वयाच्या बाराव्या वर्षापासूनच चाई ओझाला या 'नाच' कलेबद्दल आकर्षण वाटू लागलं. पुढे पुढे तर त्यानं त्याकाळी दलित वस्तीत जाऊन आणि दलित कलावंतांना सोबत घेऊन स्वत:चं नाचपथक तयार केलं. चाई ओझाचे राज्याराज्यात कार्यक्रम होऊ लागले, मात्र इतकी लोकप्रियता असतानाही, त्याला समाजातून, गावातून बहिष्कृत करण्यात आलं. शेवटपर्यंत त्याला समाजानं स्वीकारलं नाही. आजही त्या भागात त्याचं नाव घेतलं, की 'कौन? वो लौंडा चाई ओझा?' असं म्हणूनच हिणवलं जातं.

काळ बदलला...

एकेकाळी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचं काम करणारी, ही कला आता खरोखरच अश्लील संवाद, अचकट-विचकट हावभाव अशा स्वरूपात सादर केली जाते. पूर्णपणे ऑर्केस्ट्राकरण झालेल्या या जमान्यात पारंपरिक कलावंत भरडले जात आहेत. आणि म्हणूनच पारंपरिक नाच करणाऱ्या अनेक कलावंतांनी त्याकडे पाठ फिरवायला सुरूवात केली आहे. २००० नंतर इथली अनेक नाचपथकं बंद पडली. आता आसाम, बांगलादेश, नेपाळमधून मुली येतात. रामचंदर मांझी म्हणतात, आजकल के युवा गहराई से बहुत कम सोचते है... इसी कारण उन्हें, सस्ता मनोरंजन पसन्द है... भिखारी ठाकूर के नाटक आपको सोचने पर मज़बूर करते हैं...

मात्र काहीही झालं तरी भिखारी ठाकूर यांची परंपरा जिवंत ठेवायचीच, या निष्ठेनं जैनेंद्रकुमार दोस्तसारखे तरुण आजही प्रयत्नशील आहेत. जैनेंद्र हा बिहारचाच तरुण जेएनयूमध्ये 'लौंडा नाच' आणि 'बिदेसिया'वर पीएच.डी. करतोय. त्यासाठी त्यानं भिखारी ठाकूर रेपेट्री (Repertory) प्रशिक्षण आणि संशोधन केंद्र सुरू केलंय. भिखारी ठाकूरसोबत काम केलेल्या पाच कलावंतांवर जैनेद्रनं 'नाच भिखारी नाच' ही डॉक्युमेंट्री तयार केली आहे.

'लौंडा नाच'अशी सतत हेटाळणी होत असल्यामुळे आपल्या अखेरच्या काळात भिखारी ठाकूर म्हणतात...

'अबहीं नाम भईल बा थोरा, जब यह छूट जाई तन मोरा
तेकरा बाद पचास बरिसा, तेकरा बाद बीस दस तीसा
तेकरा बाद नाम हो जईहन, पंडित कवि सज्जन जस गईहन'

आता कुठे जरासं नाव झालं आहे... जेव्हा हे शरीर मोकळं होईल, तेव्हा कदाचित पन्नास वर्षांनंतर किंवा दहा-वीस वर्षांनंतर नामांकित झालेलो असेन... पंडित, कवी आणि सज्जन मंडळी माझ्या यशाचे गोडवे गात असतील...

असं खरंच होतंय का?

(सौजन्य - दिव्य मराठी रसिक, २०१८)

**– प्रशांत पवार**
भ्रमणध्वनी : +९१ ९९३०८०३३२८
shivaprash@gmail.com



**विनायक कुळकर्णी**

# 'ओमोज् नॅचरल्स' कोविडची इष्टापत्ती

**'ओ**मोज्'..... आपल्या आयुष्याबद्दल वाटणारे प्रेम, कौटुंबिक जिव्हाळा, सहानुभूती, सृजनशीलता, औदार्य, विश्वसनीयता आणि निष्ठा! 'ओमोज्' एक शब्द किती अर्थपूर्ण आणि उत्तुंग विचार दर्शवणारा! एकाचवेळी अनेक भावना सामावून घेत आपले नियमित आयुष्य जगण्याचा मार्ग रेखाटणारा हा शब्द उच्चारताना होणारा साक्षात ॐचा ध्वनी आध्यात्मिक सांगडसुद्धा घालून देतो. 'ओमोज्' या शब्दात एवढे सामर्थ्य दडलेले आहे तर या शब्दाची निवड स्वत:च्या कंपनीचा नोंदणीकृत ट्रेडमार्क म्हणजेच व्यापारी मुद्रा म्हणून स्वीकारणाऱ्या उद्योजिकेच्या सामर्थ्याची आणि जिद्दीची कल्पना येते सौ. शिल्पा प्रशांत सातपुते .....ही या 'ओमोज्'ची कर्तीकरविती!

'ओमोज्'ची जन्मकथा जाणून घेण्याआधी रसायनक्षेत्रात आवड कशी निर्माण झाली हे सांगताना शिल्पा सातपुते सांगतात, १९९४ मध्ये मी रसायनशास्त्रातील बी.एससी. पदवी घेतल्यावर एका ॲनालिटिकल लॅबमध्ये प्रशिक्षणार्थी केमिस्ट म्हणून काम करीत होते. तेव्हाच अन्न आणि औषध प्रशासन मान्यताप्राप्त FAD approved केमिस्ट होण्याचे मी निश्चित केले आणि माझे स्वप्न १९९९मध्ये साकार झाले. रसायने आणि प्रयोगशाळा साहित्य क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवत असतानाच वैयक्तिक निगा आणि सौंदर्यप्रसाधनांच्या प्रयोगशाळेतील तपासण्यांचा अधिकाधिक अनुभव मिळत गेला. एकीकडे या क्षेत्रात नव्याने येणाऱ्या केमिस्टना मी प्रशिक्षण देतानाच दुसरीकडे कस्टमकडून येणाऱ्या परदेशी कंपन्यांची ब्लीच, केसांसाठीचे रंग, लिपस्टिक यांच्या विश्लेषणात्मक चाचण्या करण्याचा अनुभव मला मिळू लागला. एवढेच नव्हे तर खडू, शाई, फिनाईल यांसारख्या ग्राहकोपयोगी उत्पादनांसह विविध प्रकारची औषधे आणि रसायनांच्या चाचण्यांचा अनुभव माझ्या गाठीशी आला. या औषधांच्या किंवा वैद्यकीय क्षेत्रात उपयुक्त असणाऱ्या रसायनांच्या चाचण्या निर्देशित मापदंड Parameters बघून त्या त्या स्वरूपात Formats कायद्याने करणे बंधनकारक असते. औषधाची परिणामकारकता कधी आणि किती वेळात सुरू होणार या सर्वांची वेळेसह नोंद घेत घेतलेल्या चाचणीचा अनुभव खूप शिकवत असतो.

स्वत:च्या व्यवसाय किंवा उद्योग सुरू करावा असे कधी वाटू लागले, त्याची सुरुवात कशी झाली, या प्रश्नावर त्या म्हणाल्या–

२००४ नंतर मुलासाठी अर्धवेळ नोकरी तसेच कंत्राटी स्वरूपात रसायनांच्या चाचण्या करून अहवाल देण्याचा निर्णय घेतला. यामुळे घर आणि मुलाला सांभाळून हे करणे मला सोयीचे ठरत होते. माझ्या मनात इच्छा असूनही मुलगा लहान असल्याने संशोधन आणि उत्पादन विकास क्षेत्रात कार्य करता येत नव्हते. पुढे, नातेवाईकाच्या लग्नाच्या वेळी २००९ मध्ये मला हर्बल फेसपॅक बनवण्याची एक संधी मिळाली. त्यातून हळदीच्या कार्यक्रमासाठी मी फक्त हळदीऐवजी हर्बल पावडर, ईसेन्शियल तेल आणि हळद यांचे ब्लेण्ड हातानेच करून तयार चेहऱ्याबरोबरच संपूर्ण शरीरासाठी संपूर्ण हर्बल असलेला बॉडी-फेस स्क्रब घरगुती स्वरुपात निर्माण करू लागले. एकीकडे माझी रसायनांच्या चाचण्या घेण्याचे काम कंत्राटी स्वरूपात सुरू होतेच तर दुसरीकडे हर्बल उत्पादने वाढविण्यासाठी प्रयोगशील होते. २०१९ मध्ये सल्फेटविरहित शाम्पू तयार केला. फेस वॉश, हँडवॉश, बॉडी जेल, बॉडी लोशन अशी उत्पादनांची

मालिका सुरू केली. आता मोठी उडी घेण्यासाठी मानसिक तयारी झालेली असतानाच २०२० ची सुरुवात कोरोनाच्या साथीने झाली. माझ्या डोक्यात अचानक कल्पना आली की सॅनिटायझरची गरज मोठ्या प्रमाणावर लागणार तेव्हा आपणच या संधीचा व्यावसायिक लाभ का उठवू नये. माझे पती प्रशांत आणि मी दोघांनी नियोजनपूर्वक सरफेस क्लिनरचे उत्पादन घेऊन अनेक गृहनिर्माण संस्था आणि व्यापारी संस्थांना दिले. अर्थात इथे प्रशांत यांचा मार्केटिंगमधील दांडगा अनुभव आणि कौशल्य उपयोगात आले. प्रशांत स्पेशालिटी केमिकल्सचे उत्पादन करणाऱ्या प्रथितयश कंपनीत मार्केटिंगमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. २०२० च्या मार्च-एप्रिल महिन्यात माझी कंत्राटी कामे कोविडमुळे अचानक बंद पडली होती. परंतु बाजारपेठेत सरफेस क्लिनरची आणि हँडवॉशची गरज क्षणाक्षणाला वाढत गेली आणि....माझा व्यवसाय उभा होत गेला.

हे सांगताना शिल्पा यांना व्यवसायाची यशस्वी मुहूर्तमेढ रोवल्याचा आनंद चेहऱ्यावर दिसत होता.

तुमच्या उत्पादनांची अशी काय वैशिष्ट्ये आहेत की त्यामुळे आज तुमची ओमोज् ही व्यापारी मुद्रा घराघरात पोहोचली जात आहे, या प्रश्नावर बोलताना शिल्पा सांगतात की, माझ्या प्रत्येक उत्पादनात हानिकारक रसायने कशी टाळता येतील याचा विचार मी प्रथम करते. केसांचा शाम्पू बनवतानासुद्धा केसांना आणि टाळूला हानिकारक ठरणारा सल्फेट हा रासायनिक घटक पूर्णत: वगळून केलेला प्रयोग आज यशस्वी ठरला आहे. केसांच्या मुळांना मजबूत करतानाच केसांची गळती थांबते आणि केस मुलायम बनतात. तसेच कांद्याचे तेल चांगले कंडिशनर म्हणून काम करतानाच केसातील कोंडा दूर करून एकीकडे केसगळती थांबवते तर दुसरीकडे उवांना प्रतिबंध करते. मसाज जेल बनवितानासुद्धा संत्र आणि पपईचा वापर करून त्वचेला आवश्यक असणारी अ आणि क जीवनसत्त्वे या जेलमधून आपसूकच मिळतील असा विचार केला आहे. तर फेसपॅक बनवताना चंदन आणि लव्हेंडर यांचा उपयोग केला आहे. यात चंदन निर्जंतुक म्हणून काम करते, परिणामी चेहऱ्याची त्वचा तारुण्यापीटिका, फोड, व्रण यापासून सुरक्षित ठरते. लव्हेंडरचा बुरशीनाशक गुणधर्म त्वचा कोमल ठेवण्यास मदत करतो. बदाम आणि मधापासून बनवलेले बॉडी लोशन त्वचेला पोषक असतेच, शिवाय त्वचा अधिक काळ मुलायम ठेवण्यासाठी उपयुक्त ठरते. प्रथिनयुक्त नरिशिंग क्रीम त्वचेचा उजळपणा वाढवते. त्यासाठी बदाम आणि दुधाचा वापर केला जातो. फेसवॉश बनवताना नीम आणि तुळशीचा जाणीवपूर्वक वापर केला आहे. फेस स्क्रब बनवताना अक्रोडच्या तेलाचा वापर केला आहे. मृत त्वचा बाजूला काढून त्वचेला उजळपणा मिळायला उपयुक्त ठरते. ॲलोवेरा जेल पण खास त्वचेसाठी बनवले आहे. यामुळे त्वचेतील तेलाचे प्रमाण संतुलित राहून त्वचा उजळते. आंघोळीसाठी खास नैसर्गिक द्रवरूपी क्रीम आणले आहे, की त्यामुळे संपूर्ण शरीराला स्वच्छ करून ताजेतवाने वाटेल.

भविष्यातील उद्योगवाढीसंबंधात बोलताना शिल्पा उत्साहाने सांगतात की, 'वैयक्तिक निगाक्षेत्रात आणलेली डझनभर उत्पादनांची



**शिल्पा प्रशांत सातपुते**

मालिका भविष्यात वाढवण्याचा मानस आहे. संपूर्ण महाराष्ट्रासह उत्तरेकडे डेहराडूनपर्यंत पोचलेली ओमोज् नॅचरल्सची उत्पादने जेव्हा दक्षिण भारतात स्थिरावतील तेव्हा मनाला समाधान लाभेल. कारण दक्षिणेकडे घराघरात हर्बल उत्पादने पिढ्यान्‌पिढ्या वापरली जातात. त्यांच्या पसंतीला आमची उत्पादने उतरतील तेव्हा होणारा आनंद वेगळाच असेल. त्यासाठी डीलर आणि वितरक नेमण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना किंवा नव्याने स्वत:चा व्यवसाय सुरू करणाऱ्या स्त्रियांना तुमचे अनुभवाचे बोल काय असतील, या प्रश्नावर शिल्पा त्वरित उत्तरल्या, की या उद्योगवाढीचे श्रेय कोरोनाला दिले पाहिजे. कोरोनाने माझी कामे हिरावून घेतली नसती, तर कदाचित मी या क्षेत्राकडे घरगुती किंवा पार्ट-टाईम उद्योग म्हणू बघितला असता. एखादी आपत्तीजन्य परिस्थिती निर्माण होते तेव्हा शांतपणे विचार करून पावले टाकली तर मार्ग सापडतो आणि आपत्तीचे रूपांतर इष्टापत्तीमध्ये करता येते. सॅनिटायझरची तसेच सरफेस क्लीनर आणि हँडवॉशची वाढती मागणी लक्षात घेऊन त्यावरच लक्ष केंद्रित केले आणि व्यवसायात यश मिळालेच, शिवाय व्यक्तिगत निगेच्या आमच्या इतर उत्पादनांना त्यामुळे सहज बाजारपेठ मिळू शकली. आज ज्या स्त्रियांना घरबसल्या किंवा अर्धवेळ काम करून काही उत्पन्न मिळवायचे असेल अशांना आमची उत्पादने विक्रीसाठी देऊन कमावण्याची संधी देत आहोतच. त्यासाठी आवश्यक असणारे उत्पादनांचे ज्ञान आणि शास्त्रीय माहिती आम्ही देतोच. सणासुदीला किंवा वाढदिवस-लग्नासारख्या समारंभासाठी तसेच व्यावसायिक आस्थापनांच्या भेटीसाठी आमच्या उत्पादनाची आम्ही तयार केलेली ओमोज् नॅचरल्सची आकर्षक गिफ्ट पॅकेजेस ग्राहकांना खूप आवडली आहेत. मुंबईत तर यावर्षी दिवाळीला आमच्या गिफ्ट पॅकेजना चांगलाच प्रतिसाद मिळाला होता.

ओमोझ नॅचरल्स वेबसाईट : www.omoznaturals.com
सौ. शिल्पा प्रशांत सातपुते, भ्रमणध्वनी ८८५०२७८५२५
इमेल : omoznaturals@gmail.com

**- विनायक कुळकर्णी**
भ्रमणध्वनी : +९१ ९८९२१५२९२८
vvskul@yahoo.com




नीलिमा कढे

# माझा नृत्य-चित्रमय कलाप्रवास

**मा**झा कलाप्रवास आठवताना एक भान आतून पक्कं जागं आहे की मी काही कोणी महान कलाकार नव्हे की माझा कलाप्रवास कोणी जाणून घ्यावा. नृत्य-चित्र दोन्ही कलांनी असे थोर कलावंत पाहिले, स्वतःमध्ये सामावून घेतले की कलानिर्मिती हाच ज्यांचा श्वास आणि ध्यास होता. प्रतिभेचं देणं लाभलेल्या अशा कलाकारांनी कलाप्रवाहाला नवं वळण दिलं. त्यांचे अनुभव जाणून घेणं खरोखर आपल्या सर्वांसाठी प्रेरणा देणार असतं. मग मी का बरं मांडते आहे हा आलेख? तर गतकाळातले काही क्षण गोठवणारे फोटोग्राफ मित्रमंडळींसोबत पाहावेत, त्यातला आनंद घ्यावा एवढाच साधा उद्देश आहे या लेखाचा!

माझा जन्म झाला एका मध्यमवर्गीय, संपन्न, सुसंस्कारित कुटुंबामध्ये. आई-वडिल दोघंही कलासक्त आणि भरपूर वाचन करणारे. आई शाळेत शिक्षिका आणि वडील डॉक्टर. आई लेखन-कविता करणारी तर वडिल शास्त्रीय संगीताचे प्रेमी. सतार वाजवणारे. आई खूप हौशी. चैत्रगौरीचं हळदकुंकू आणि स्वरचित कथाकथनाची ढाल स्पर्धेत जिंकताना सारखाच उत्साह! आल्यागेल्याचं अगत्य! आई ठाण्यातील साहित्यिक मडळींमध्ये तर वडिल संगीतप्रेमी मंडळामध्ये सक्रिय. अशा आमच्या कलासक्त कुटुंबामध्ये सामजिक कामाचा एक धागा सहज गुंफला गेला. पुण्याच्या विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहामध्ये आयोजित एका निवासी शिबिरात ताई सहभागी झाली आणि अगदी भारावून गेली. हे होतं मुलींसाठी व्यक्तिमत्त्वविकास शिबिर. संचालिका निर्मला पुरंदरे यांनी प्रस्ताव मांडला तुम्ही अशी शिबिरं ठाण्यात घ्या आणि आईनं होकार दिला. पुढे सलग आठ वर्षे प्रत्येकी दोन अशी सोळा शिबिरं आमच्या घरात शब्दश: घुमली. 'केवळ लग्न होईपर्यंत शिक्षण' अशी मुलींची मानसिकता असण्याचा तो काळ. त्या काळात त्यांचं आत्मभान अणि समाजभान जागं करण्यासाठी अनेक उपक्रमांनी भरगच्च असे ते दहा दिवस असत. मुलींनी स्वत:च्या आयुष्याचे निर्णय स्वत: घ्यावे याची जागृती देण्याचा हा प्रयत्न होता. शिबिरासाठी जागा बुक करण्यापासून जाहिराती देणं, अर्ज मागवणं, वक्ते ठरवणं, देणग्या गोळा करणं, त्याच्या पावत्या, हिशोब ते शिबिर अहवाल अणि आभारपत्रं अशा सर्व कामांत मदत करता करता घरीच आयोजनाचे धडे मिळत गेले. वेगवेगळ्या क्षेत्रांत उंची गाठलेल्या अनेक व्यक्ती जवळून पाहता आल्या आणि 'आयुष्याला अर्थ देणं म्हणजे काय' याचं दर्शनही नकळत घडत गेलं.

शाळेत असतानाच चित्रकलेची आवड लागल्यानं पुढे जे.जे. स्कूलला जायचं ठरवलंच होतं. फाईन आर्ट पेंटिंगच्या तिसऱ्या वर्षात सौंदर्यशास्त्र विषय होता. सोप्या, रसाळ पद्धतीनं मिलिंद मालशेसर शिकवत. विष्णुधर्मोत्तर पुराणातील एका संवादाच्या अनुषंगानं त्यांनी सांगितलं, 'तुम्ही चित्रकार, पण फक्त चित्र काढून थांबू नका. संगीत-नृत्य शिक, नाटक करा. निदान आस्वाद तरी घ्या. कारण एका ललित कलेतील अनुभव दुसऱ्या ललित निर्मितीला पूरक ठरतो, त्यांनीच सुचवलेला भरतनाट्यम्चा एक नृत्यप्रयोग पाहायला गेले. नर्तकीनं केलेली मानेची एक नाजूक हालचाल इतकी भावली की ती घरी आल्यावर करून पाहिली आणि नृत्य शिकण्याची ऊर्मी आली. एका शुभघडीला भरतनाट्यम् नृत्यांगना सुचेता भिडे-चापेकर यांचं शिष्यत्व लाभलं. मग एकीकडे जे.जे.स्कूलमधला कॅनव्हासवरचा रंगरेषा तर सुचेताताईंकडे अवकाशात मुक्त फिरणाऱ्या, स्वतःच्याच



**Journey within**



शरीरातून उमटणाऱ्या रेषा-आकारांचा खेळ, असा दुहेरी आनंदमय प्रवास सुरू झाला. त्यातच ठाण्यात आर्ट स्कूल सुरू करण्याचा एक नवाचं धागा मिसळू लागला जे.जे. स्कूलमधलं शिक्षण संपवून बाहेर पडले. दृश्यकला क्षेत्रात ठाण्यात काही उपक्रम करावेत म्हणून चित्रकार, शिल्पकार, फोटोग्राफरना एकत्र करून एक ग्रुप तयार केला 'ठाणे आर्ट सोसायटी'. पोर्ट्रेट -लँडस्केप प्रात्यक्षिकं, टेबलटॉप फोटोग्राफी, स्लाईड शो असा महिन्यातून एकदा उपक्रम करत होतो. त्यातच गडकरी रंगायतनच्या मधल्या मजल्यावर एक चित्रप्रदर्शन भरवलं. अभिप्रायवहीत काही अभिप्राय असे आले, की ठाण्यात अशी चित्रं शिकवणारं कॉलेज नाही का? आमच्या मुलांना शिकायचं आहे. आमच्याकडे चित्रकला शिकवण्याचं ट्रेनिंग होतंच. मग माझ्या आईनं सुचवलं तुम्हीच सुरू करा की ठाण्यात आर्ट स्कूल. त्यावेळची बावीस वर्षांची मी आणि मैत्रिणी सीता-अरुणा, आम्ही अगदीच शाळकरी दिसायचो. कोण विश्वास ठेवणार आमच्यावर? आर्ट स्कूल सुरू करण्यासाठी शासनमान्यता मिळवण्यासाठी अर्ज आणायला गेले तेव्हा कलासंचालकांनी सांगितले, या प्रकल्पाला पाठिंबा देणाऱ्या ठाण्यातील वीस व्यक्तींच्या सह्या आण आणि तुमचा ग्रुप मला रजिस्टर करावा लागेल.

पुढे वर्षभर जमवाजमव करत राहिलो. आईच्या कामाला ओळखणाऱ्या अनेकांना भेटले. ठाण्यातले डॉक्टर, आर्किटेक्ट, इंजिनीयर, पत्रकार वेगवेगळ्या लोकांनी कौतुकाने सह्या दिल्या. त्यांनी कदाचित 'आमच्या बालिश उत्साहावर कशाला विरजण घाला' असाही विचार केला असेल! शिबिरातील मुलींना कायद्याचे ज्ञान देण्यासाठी येणारे डी.एस. बोरवणकर आमचे स्नेही. त्यांनी नव्यानं बांधलेल्या इमारतीत एक वर्ग मिळण्याची सोय झाली. ठाण्यातील अनेक सामजिक प्रकल्पांना बळ देणारे आर्किटेक्ट देवळे यांनी डिपॉझिट ठेवण्यासाठी पन्नास हजार रुपयांची सोय केली. तत्कालीन कलासंचलक बाबूराव सडवेलकर यांनी जागेची, फर्निचरची, संस्थेची पाहणी केली आणि १९८६ मध्ये ठाणे स्कूलला हिरवा कंदील दिला, तेव्हा मी संस्थापिका-प्राचार्य फक्त चोवीस वर्षांची होते. ठाण्यासारख्या मध्यवर्ती शहरात आर्ट स्कूलची गरज अधोरेखित करणाऱ्या संख्येनं अर्ज आले. केवळ तीस जागांसाठी दीडशे अर्ज आले. तरिही कुठल्याही अनुदानाशिवाय सस्थेचं अस्तित्व टिकवणं खूप आव्हानात्मक होतं. कारण अजूनही समाजात कलेचं स्थान दुर्लक्षित आहे. खूप मार्कवाली म्हणजेच 'हुशार' मूलं प्रवेश घेण्याची जी ठरावीक क्षेत्रं निवडतात, त्यात कलाशिक्षण कुठे आहे? शाळकरी मुलं आणि पालकांपर्यंत पोचता यावं म्हणून माती / ओरिगामी /पेपर पल्प वस्तू कार्यशाळा घेतल्या. जिथे मुलं अणि पालकांनी एकत्र काम केलं. कलेच्या क्षेत्रात करिअर घडवायलाही बौद्धिक क्षमताच लागते हे पोचवायचं होतं. ठाणे स्कूलमधला फाऊंडेशनचा वर्ग चालवताना केवळ शासकीय अभ्यासक्रम आणि परीक्षा राबवणं एवढाच मर्यादित हेतू ठेवला नाही. ठाण्यात एक कलाचळवळ व्हावी अणि फाऊंडेशनच्या मुलांना या क्षेत्रात किती संधी आहेत हे समजावं म्हणून सातत्यानं कलावंतांचे कार्यक्रम आयोजित केले. मॅगेझिन कव्हर आर्टिस्ट, ट्रॉफी/फ्लोट डिझायनिंग कलावंत, व्यंगचित्रकार, कथचित्रकार असे व्यावसायिक आणि फाइन अर्टिस्ट यांना काम करताना पाहायला मिळे, संवाद साधता येई. हे कार्यक्रम इतर रसिकांसाठी खुले असत. संस्थेचा शैक्षणिक दर्जा उत्तम राहावा म्हणून मी अणि सहशिक्षिका मैत्रीण सीता आम्हीही स्वत:ला या काळात घडवत होतो. कलाशिक्षणातील विचारवंतांशी चर्चा करत होतो. हळूहळू 'ठाण्यात कोणी दोन मुली मेहनतीनं आर्ट स्कूल चालवत आहेत' असा संदेश पसरताना जाणवू लागला.

संस्थेचा शैक्षणिक दर्जा उत्कृष्ट राहावा यासाठी आम्हीही स्वतःला घडवत होतो याकाळात. अनेक अनुभवी शिक्षणतज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेण्यासाठी मी आणि सहशिक्षिका सीता सातत्याने जात होतो. यातून कलाअध्यापन किती सृजनशील आणि अनेक मितीय आहे ते जाणवत गेलं .

ठाणे स्कूल ऑफ आर्ट सुरू होत असतानाच एकीकडे मी भरतनाट्यम् नर्तिका होण्याच्या मार्गावर होते. वनितासमाजमधला पाच



**Rhythmic Energy**

वर्षांचा बेसिक कोर्स करून झाला, पण सुचेताताईंकडे शिकणं हेच इतकं आनंददायी होतं की ते सोडवत नव्हतं. मग वनितासमाजमधला क्लास संपला की माझं वेगळं ट्रेनिंग ताई घेत असत. दादरला त्यांचं माहेरचं घर रिकामं असे. तिथे क्लास झाला की त्यांच्याबरोबर राहत असे. सकाळी उठून दादर स्टेशन मग त्या पुण्याला आणि मी आर्टस्कूलला ठाण्याला. खूप भारावलेल्या त्या दिवसांनी नृत्यप्रेमानं मनात कायमचं घर केलं. त्यांच्याच मार्गदर्शनात १९८६ मध्ये गडकरी रंगायतन इथे पहिला रंगमंच प्रवेश सादर केला. अरंगेत्रम म्हणजे नृत्यशिक्षणाची परिपूर्ती असा बऱ्याचदा गैरसमज दिसतो. ती तर सुरुवात होती. तिथपासून सातत्याने नृत्यप्रयोग सादर केले. सुरसिंगार संसदनं 'सिंगारमणी' किताब देऊन माझ्या नृत्यसादरीकरणाची दखल घेतली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे, निखिल बॅनर्जी स्मृतिसमारोह – कलकत्ता, राम मराठे स्मृतिसमारोह, गानवर्धन पुणे, श्रीरंग सभा – तळेगाव अशा अनेक संगीतसभांमधून नृत्य मांडता आले. पुढे 'नृत्य' विषय घेऊन पुणे विद्यापीठातून एम.ए.केलं. त्या निमित्तानं नृत्य आणि इतर ललितकलांचं विशेषतः प्राचीन चित्र-शिल्पकलांचं नातं या अभ्यासशाखेशी ओळख झाली आणि त्यात रसही वाटू लागला. जिथे शिकले त्याच 'ललितकेंद्रा'मध्ये गेली ३० वर्षं या विषयाचं अध्यापनही करत आहे. चित्रकलेत सप्तरंग तर संगीताचे सप्तस्वर. मंद्र-मध्य-तार सप्तकाची चढती श्रेणी तशी चित्रात उजळपणापासून गदडपणाकडे प्रवास करणाऱ्या रंगच्छटांची श्रेणी. नर्तिकेचा शरीरातून निघणाऱ्या सुरा-तालावर अंतरिक्षामध्ये लवलवणाऱ्या चपळ रेषा तर शिल्पामध्ये गोठवून स्थिर केलेले, तरी आताच हलतील की काय असा चलतेचा भास देणारे आकृतिबंध, जलद हालचाली करतानाच क्षणभर थांबणारी शिल्पमय नर्तकी! सगळ्या ललितकलांध्ये अशी सहज गुंफण तर जाणवतेच, शिवाय विशेषतः प्राचीन-मध्ययुगीन चित्रं-शिल्पं-नृत्यं तर एकाच माळेत गुंफल्यासारखी भासतात आणि गुंफणारा धागा आहे आध्यात्मिक बैठकीचा. कारण नृत्य म्हणजे शोडषोपचार पूजेतील एक भाग. एखाद्या डाळिंबाची साल सोलल्यावर अनेक रसपूर्ण दाण्यांची ओळ दिसावी तसे अनेक रसपूर्ण पैलू या अभ्यासात जाणवू लागले. अनेक सभांमध्ये ते सप्रयोग मांडण्याची संधी मिळाली. पंडिता रोहिणी भाटे, प्रभाकर पेंढारकर – यशवंत पाठक यांसारखे कलावंत, लेखक, सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांच्यासारख्या व्यक्तींकडून अभिप्राय मिळाले, ते पारितोषिकासारखे वाटले. केंद्रसरकारची ह्युमन रिसोर्स डिपार्टमेंटची संशोधन शिष्यवृत्तीही मिळाली.

एकीकडे 'ठाणे स्कूल ऑफ आर्ट'चे हळूहळू पण स्थिर विकसन सुरू राहिले. फाऊंडेशन कोर्सच्या जोडीला ए.टी.डी., इंटिरियर डेकोरेशन, फाईन आर्ट पेटिंग, पदव्युत्तर पदविका प्रशिक्षण असे अभ्यासक्रम सुरू झाले. जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये सिनियर असणारी मैत्रीण माणिक शिंगे संस्थेला मिळाली आणि विद्यार्थ्यांप्रती तळमळ असणारी एक उत्स्फूर्त शिक्षिका अनुभवण्याचं भाग्य स्कूलला लाभलं. जसजसे वर्ग वाढत गेले तसे मनापासून अध्यापन करतानाच स्वतःतील कलावंत जपणारे चांगले शिक्षक मिळाले म्हणून शैक्षणिक दर्जा जपता आला. स्वतःची जमीन मिळवता नाही आली तरी भाड्याच्या इमारतीमध्ये दोन मजले बांधकाम करून देणारे विश्वस्त मिळाले. संस्थेवर प्रेम करणारे विध्यार्थी लाभले. 'We need you' संस्थेचा 'शिक्षणव्रती' आणि 'कायद्याने वागा लोकचळवळी'चा 'सावित्री' पुरस्कार या संस्थेच्या सुहृदांच्या वतीनं स्वीकारला. हा सगळा गोतावळा सांभाळताना ३४ वर्षं कशी संपली ते कळलंही नाही.

मधल्या काळात नव्या पिढीपर्यंत भरतनाट्यम पोचावे म्हणून नृत्यवर्ग घेतले. त्या विद्यार्थिनींना रंगमंचावर पाहण्याचं समाधानही मिळालं. नृत्य आणि चित्रकला रसिकांपर्यंत पोचावी यासाठी 'आस्वाद' व्याख्याने दिली. स्तंभलेखन, मासिकांसाठी लेखन केले.

वयाच्या पंचेचाळिशीनंतर आपल्यातील चित्रकाराला अधिक वेळ द्यायचा कारण रंगमंचसादरीकरणासाठी लागणारी ऊर्जा किती राहील, असा विचार केला होता. तसं गेली दहा वर्षं सातत्यानं चित्रनिर्मिती आणि प्रदर्शनं सुरू आहेत. नृत्यसादरीकरणातील आखीवरेखीव निर्मिती अनुभवली होती. आता कॅनव्हासवर मला मुक्तविहार करावासा वाटला. मुक्कामापेक्षा प्रवासातील मजा घ्यायची होती. मनातला अमूर्त आशय अमूर्ततच दृश्य व्हावा ही इच्छा होती. त्या प्रयत्नांतून 'जर्नी विदिन' आणि 'रिदमिक एनर्जी' या चित्रमालिका झाल्या. जहांगीर आर्ट गॅलरी, गुंफा आर्ट गॅलरी-अहमदाबाद, प्रीतमलाल दुआ आर्ट गॅलरी, उज्जैन अशा वेगवेगळ्या ठिकाणच्या चित्ररसिकांना अनुभवता आलं. हा कलाप्रवास चित्राच्या, नृत्याच्या माध्यमातून सुरू राहावा आणि त्यातील सौंदर्याचे तरलतम पदर अनुभवता यावेत अशी इच्छा आहे.

**– नीलिमा कढे**

भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०५४५७१

neelimabk@rediffmail.com

# नव्या वाटा, नवी आव्हाने

## राधिका कुंटे



**श्रद्धा आणि अभिजित**

*एक मध्यमवर्गीय मुंबईकर युवती. राजस्थानातील उद्योजकांचे घर तिचे सासर होते. अनपेक्षित ठिकाणी, अपरिचित व्यवसायात सहभागी होते, तिथे स्थिरस्थावर होते न होते तोच उद्योगविस्तारासाठी थेट युगांडा या आफ्रिकी देशात नव्याने सारे उभारायला ती सज्ज होते. नव्या वाटा, नवी वळणे आणि नवी आव्हाने स्वीकारण्याची जिद्द, माहेर-सासरच्यांच्या पाठिंब्याने आणि अभिजितच्या साथीने आयुष्याला आकार देणारी ही युवती या आहे श्रद्धा अंबुरे.*

**म्ह**टले तर श्रद्धा अंबुरे यांच्या लग्नाची गोष्ट एखाद्या चित्रपटातल्या कथानकासारखी. त्या कॉमर्स पदवीधर. वेलिंगकर इन्स्टिट्यूटमधून त्यांनी एचआरची पदविका घेतली. त्यांचे माहेर बोरीवलीतील मध्यमवर्गीय. लग्न झाले राजस्थानमधील उद्योजकांच्या घरात. श्रद्धा सांगतात, की ''तुमचा विश्वास बसणार नाही; पण आमचे ठरवून लग्न झाले आहे. माझे लग्न लवकरात लवकर व्हावे, अशी माझ्या आईची इच्छा होती. एका वधू-वर सूचक मंडळात अभिजितची पत्रिका घेऊन त्याची मामी आली होती तर माझी आई माझ्या चुलतभावंडाची पत्रिका घेऊन गेली होती. तिथे दोघींची ओळख होऊन, 'कळवा', असे बोलणे झाले. 'राजस्थान' म्हटल्यावर आईच्या दृष्टीने विषय संपला होता. तिने सांगितलेली माहिती ऐकल्यावर तेव्हा क्षणभर वाटले होते की 'कसे असेल हे उद्योजक कुटुंब टिपिकल श्रीमंती मानसिकतेचे की मनाच्या श्रीमंतीचे?' काही दिवस वाट पाहून अभिजित यांच्या मामा-मामींच्या इमारतीत आईची मैत्रीण राहते, त्यांच्याकडे मामींनी आईचा नंबर मागितला. आईच्या मैत्रिणीने नंबर न देता त्यांचा निरोप आम्हाला दिला. मग आम्ही पत्रिका पाठवली. ती जुळली. तरीही आईला वाटत होते राजस्थान नको. दरम्यान नातलग किंवा परिचितांकडून हेच स्थळ पुन्हा पुन्हा सुचवले जात होते. त्यांच्या घरून दोन-तीन वेळा फोन येऊन गेला होता. अभिजितचे मामा-मामी मला भेटून गेले. त्यांनी त्याच सुमारास साप्ताहिक 'लोकप्रभा'मध्ये अभिजितचे बाबा- प्रकाश अंबुरे यांच्यावर आलेला लेख आम्हाला वाचायला दिला. तो वाचल्यावर मला पुन्हा क्षणभर वाटले, 'मी या कुटुंबात सामावेन का?' त्यानंतर अभिजितचे बाबा भेटून गेले. त्यांच्याशी बोलल्यावर माझ्या मनात क्षणभर डोकावणारी साशंकता हळूहळू निवळू लागली. दरम्यान माझे आई-बाबा अभिजितच्या मामांच्या घरी जाऊन आले. एरवी मी बघायचा कार्यक्रम असला की खूप खरेदी वगैरे करून जणू 'वसुली' करायचे. मामांच्या घरून परतल्यावर मात्र बाबा स्वतःहून म्हणाले, 'तुला हवी तेवढी खरेदी कर!' एरवी कुणाची फारशी स्तुती न करणारे माझे बाबा बराच वेळ अभिजितबद्दल आत्मीयतेने बोलत राहिले. त्यानंतर अभिजित सहकुटुंब आमच्याकडे आले. तेव्हाही एक किस्सा घडला. अभिजित खिडकीजवळ आणि त्याचा भाऊ अनिकेत मधोमध असे बसला होते. ओळखी झाल्या. माझ्या आत्याचे यजमान थोडे उशिरा आले आणि अनिकेतजवळ बसून त्याची चौकशी करायला लागले. सगळे त्यांचा गैरसमज दूर करू बघत होते, पण ते कुणाचे ऐकायला तयार नव्हते. शेवटी अभिजितच्या बाबांनी दोन्ही मुलांना बसायची जागा बदलायला सांगितली तेव्हा कुठे आमच्या काकांना त्यांचा गैरसमज लक्षात आला. अभिजितला भेटल्यावर मनाचे आकाश अगदी मोकळे झाले. संयुक्त कुटुंबात राहायची माझी इच्छा पूर्ण होणार होती.''

श्रद्धा लग्न व्हायच्या आधी माहेरच्या माणसांसोबत पहिल्यांदा राजस्थानात ब्यावर इथे गेल्या तेव्हा त्यांना सुरुवातीला वाटले, की या कोणत्या गावात आपण जात आहोत पण खुद्द ब्यावरचा

परिसर पूर्वीच्या पुण्याची आठवण करून देणारा होता. लग्नानंतर ब्यावरला आल्यावर त्यांना उमजले की अंबुरे यांच्या घरातले जीवनमान, व्यवहाराची पद्धत श्रद्धा यांच्या माहेरसारखीच होती. पैसा आहे म्हणून उगीच उधळायची वृत्ती नव्हती. त्या सांगतात, ''आमच्या पगारात आमच्या सगळ्या गरजा व्यवस्थित भागतात. इथले आयुष्य हे क्वालिटी ऑफ लाईफ आहे. ते मला फार आवडते. आमच्या घरात थोडी मिश्र संस्कृती आहे. मला मांसाहाराची आवड होती. ब्यावरला तसे रेस्तरॉंही नाही. इथे घरात पंचवीस-तीस वर्षे अंडेही खाल्ले गेले नव्हते. सुरुवातीला काही दिवस अभिजितचे आई-बाबा आधी मांसाहार करत, पण इथला कल लक्षात घेऊन आणि स्थिरावायच्या दृष्टीने त्यांनी तो सोडलाच. मीही मांसाहार सोडण्याचा जरासा परिणाम माझ्या तब्येतीवर झाला. परंतु लवकरच इथल्या सेंद्रिय भाज्या, फळे आणि दूध-दुभत्यामुळे माझी तब्येत पूर्वपदावर आली. ब्यावरला सणवार छान पद्धतीने साजरे केले जातात. दिवाळीत एक दिवस मार्केटमधल्या लहान-मोठ्या दुकानांमध्ये पणत्यांची सजावट केली जाते. रात्रभर फिरून ही प्रकाशाची रोशणाई पाहिली जाते.''

ब्यावरमध्ये मुली मुलांपेक्षा जास्त शिकलेल्या असतात, पण त्या नोकरी करत नाहीत, घर सांभाळतात. त्यांना अजूनही काही प्रमाणात पूर्वीच्या काही परंपरा पाळाव्या लागतात, असे श्रद्धा यांचे निरीक्षण आहे. त्यांनी त्यांचे ऑफिस जॉईन केले तेव्हा तिथे एकच मुलगी काम करत होती. नोकरीत करत होत्या ते एचआरशी संबंधित काम श्रद्धांनी पुढे करावे असे सासरे प्रकाश अंबुरे यांच्या मनात होते. तर त्यांच्या सासूबाई- छाया अंबुरे यांची श्रद्धा यांनी घरही सांभाळावे, अशी इच्छा होती. श्रद्धा सांगतात, की ''त्या काळात काही क्षण असे होते की कोणाच्या अपेक्षांची पूर्ती करावी, काय करावे असा प्रश्न पडला होता. त्यांच्या परीने दोघांच्याही अपेक्षा अगदीच रास्त होत्या. पण माझी मात्र मानसिक ओढाताण होत होती. मी शांतपणे विचार केला. अभिजितशी बोलले. मग मी बाबांना सांगितले, की 'तुम्ही मला सहा महिने द्या. मी आधी घर सांभाळायचा प्रयत्न करेन. ते आधी शिकून घेते. या काळात मी गरज असेल तेव्हा ऑफिसमध्ये येईन. काम करेन, पण ठरावीक कामात मला गुंतता येणार नाही.' तसे काम केलेही. मात्र कामात पूर्ण झोकून दिलेले नसल्याने नम्रपणे या सहा महिन्यांतल्या पगाराला 'नाही' म्हटले.'' ऑफिसमध्ये त्या गेल्या आणि रुजू झाल्या इतक्या सहज गोष्टी झाल्या नाहीत. तर के. एम. शर्मा या ज्येष्ठ आणि अनुभवी कर्मचाऱ्यांनी श्रद्धा यांची मुलाखत घेतली आणि मग त्या रुजू झाल्या. एरवी नोकरीत आपण आपल्या शिक्षणाशी संबंधित काम करतो, पण उद्योगातली प्रत्येक गोष्ट थोडीफार का होईना माहिती असणे गरजेचे आहे. मग ती कोणती चर्चा असो, मीटिंग असो किंवा अन्य कामकाज असो, श्रद्धा यांना त्या त्या कामकाजाची हळूहळू माहिती होत होती. सासऱ्यांनी त्यांना अनेक गोष्टी समजावून सांगितल्या. त्या म्हणतात, की ''आमच्या बाबांच्या 'आरवली ते अरवली' या पुस्तकाच्या निर्मितीच्या प्रक्रियेत मला सक्रिय सहभागी होता आले, याचे समाधान आहे. ऑफिसशी संबंधित एखादा निर्णय असेल तर तो अगदी एकट्यानेच न घेता आई आणि मुलांशी बोलून घ्यायची या घरची पद्धत आहे. त्यानुसार माझेही मत विचारात घेतले जाते. 'ही माझी सून', असा माझा परिचय बाबा अनेकांशी करून द्यायचे. वडील आपल्या मुलीचा ज्या अभिमानाने परिचय करून देतील, तीच भावना बाबांच्या बोलण्यात असते. ते कुणाची तारीफ करत नाहीत. 'तारीफ केल्याने माणसे हरभऱ्याच्या झाडावर चढतात, त्यामुळे ती डोळ्यांत असलेली जास्त बरी' असे बाबांना वाटते.''

ब्यावरमध्ये डाका ही कंपनी रॅमिंग मास बनवते. धातू वितळवणाऱ्या मोठमोठ्या फर्नेसमध्ये उष्णता नियंत्रणासाठी दोन भांड्यांच्या मध्ये उष्णतारोधक म्हणून जी वाळू किंवा क्वार्ट्झची अतिशय बारीक भुकटी वापरली जाते, त्याला रॅमिंग मास म्हणतात. त्याचे उत्पादन करणारी डाका ही एक जगन्मान्य कंपनी आहे. त्यासाठी अंबुरे यांनी राजस्थानात क्वार्ट्झच्या खाणीही विकत घेतल्या होत्या. अशा कंपनीत अनुभव महत्त्वाचा मानला जातो. इथे काम करणारा स्वतः स्वतःचा बॉस असतो, प्रत्येकाला त्याचे निर्णय घ्यायला मुभा आहे. इथे रोज संध्याकाळी सगळे भेटून गप्पा रंगतात. युगांडातील एका क्लायंटने कंपनीला तिथे यायला सुचवले. त्यावर विचारविनिमय होऊन हिलेल ज्युडा, प्रकाश अंबुरे, अभिजित, शिवप्रसाद गुप्ता असे कंपनीतील ज्येष्ठ पहिल्या फेरीत तिकडे गेले. पुढच्या फेरीत सुधीर शेट्टीही गेले. नंतर २०१८ पासून जवळपास वर्षभर त्यांची जा-ये सुरू होती. पुढे जागा मिळून सेटअप झाला आणि श्रद्धा युगांडामधील जिंजा इथे गेल्या. श्रद्धा सांगतात, की ''मी मुंबई सोडून ब्यावरला आले, त्यानंतर ब्यावर सोडून कुठेही जायची माझी तयारी होती. एक नवीन उद्योग उभा राहताना बघायला मिळतो आहे, हे माझ्यासाठी महत्त्वाचे होते. अभिजितकडून तिथल्या निसर्गाची, माणसांची वर्णने ऐकली होती. जम बसला की ब्यावरला परत यायचे, मात्र जम नेमका किती वर्षांत बसेल ते माहीत नाही; यासाठी मीही तयार होते. समजा, मी किंवा अभिजित नोकरी करत असतो आणि बदली झाली असती परदेशात तर आम्ही गेलोच असतो, असा विचार केला. शिवाय मनात नव्या गोष्टी एक्स्प्लोर करण्याची, नवी आव्हाने स्वीकारायची तयारी होतीच. मला आमच्या उत्पादनाबद्दल- रॅमिंग मासबद्दल - फार माहिती नव्हती. ती माहिती प्रत्यक्ष बघून मला इथे मिळाली. बाबांच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात मनोगत व्यक्त करताना 'तुमच्या मुलांसारखेच मीही तुमचे नाव मोठे करायचा प्रयत्न करेन. माझ्या दृष्टीने ही एक संधी होती आत्मपरीक्षणाची, स्वतःच्या क्षमता जोखायची आणि स्वतःला सिद्ध करायची,' असे मी म्हटले होते.''

युगांडाला 'पर्ल ऑफ आफ्रिका' असे म्हटले जाते. तिथे सुजलाम सुफलाम भूभागातल्या उपजाऊ जमिनीवर रसाळ फळे-फुले, भाज्या आणि कंदमुळे पिकतात. त्यांना भरपूर पाणीपुरवठा होतो. औद्योगिक क्रांती आणि तांत्रिक प्रगतीच युगांडातील जनतेला दारिद्र्य आणि मागासलेपणातून बाहेर काढेल असे तिथले राष्ट्राध्यक्ष

लेफ्टनंट जनरल योवेरी कगुटा मुसेवेनी यांना वाटते. तिकडे जाईपर्यंत श्रद्धा यांना खूप एक्साइटमेंट वाटत होती. तिकडे गेल्यावर मुख्य प्रश्न आला भाषेचा. तिथल्या कृष्णवर्णीयांना स्थानिक भाषेखेरीज दुसऱ्या भाषेचा फारसा गंध नव्हता. इंग्रजी सगळ्यांना येतेच असे नाही. मग हातवाऱ्यांनी काम चालवून न्यायचे. तेही त्यांना खरेच कळेल का ते माहीत नाही. तिथे गरिबी इतकी की काम केले नाही तर रोजची चूल पेटायचा प्रश्न निर्माण होतो. चोरीचे प्रमाण खूप आहे. गरिबीमुळे असेल; पण अगदी कपडेही चोरीला जातात. जिंजामध्ये श्रद्धा राहत असलेल्या इमारतीत भारतीयांची त्यातही मुख्यत्वे गुजरातींची संख्या अधिक आहे. शेजाऱ्यांनी इथे चोरी होते, अशी पूर्वकल्पना आम्हाला दिली होती. शिवाय काही दहशत बसेल अशा घटना कानावर आल्या होत्या. सुदैवाने त्यांना याबाबतीत फारसे वाईट अनुभव आले नाहीत. श्रद्धा सांगतात, की ''आमचे घर आम्ही दोन दिवसांत लावले. अगदी मोजकीच भांडी आम्ही तिथे विकत घेतली होती आणि बाकीचे सामान कंटेनरने येणार होते. त्याला यायला उशीर झाल्याने ते सामान दोन महिन्यांनी मिळाले. इथल्या स्थानिकांसाठी परदेशी माणसे (गोरी) म्हणजे दे आर लाईक गॉड. तर भारतीय लोकांची ओळख आरडाओरडा करणारे, मॅनर्स नसणारे, अशी होती. आम्ही तसे अजिबातच वागत नसल्याने त्यांना आम्ही भारतीय आहोत, यावर विश्वास ठेवणे कठीण गेले. तिथे भारतीयांना 'मुइंदी' म्हणतात. तिथल्या मंडईत आपल्या ओळखीच्या भाज्या मिळतात. एकदा मला कढीपत्ता हवा होता. 'डू यू हॅव करीलीव्ह?' अशी विचारणा करत मी त्या मोठ्या मंडईभर फिरले. फोटो दाखवूनही नकार मिळत राहिला. जवळपास शेवटच्या गाळ्याशी येऊन पुन्हा विचारणा केल्यावर फोटो पाहून तो उद्गारला - 'यू वॉण्ट कढीपत्ता!' फक्त होकारार्थी मान हलवण्याखेरीज माझ्या हातात काहीच नव्हते. बऱ्याच वस्तूंची गुजराती नावे इथल्या व्यापाऱ्यांच्या ओळखीची झाली आहेत. जसे - आले- आदू, नशिबाने मला थोडे गुजराती येत असल्याने त्याचा फायदा झाला.''

''जिंजाला उन्हाचा चटका लागतो, पण झाडांच्या सावलीचा गारवाही मिळतो. कंपनीच्या आवारात सात-आठ फणसाची, ५ आंब्याची झाडे आहेत. आम्ही तिथे २५ झाडे लावली. आमचे क्लायंट आमचे पार्टनर झाले. त्यांची फॅक्टरी आमच्या जागेपासून जवळ होती. त्यांनी त्यांच्या जागेतील झाडे कापून टाकली होती. कारण पुढे केले होते- स्थानिक फळे चोरतील, कामे करणार नाहीत वगैरे. आम्ही ठरवले झाडे कापायची नाहीत. अगदीच बांधकामात अडथळा आल्याने तीनच झाडे कापली. कामगारांना आंबा सोडून आवारातील इतर फळे ब्रेकटाईममध्ये खाऊ शकता, अशी परवानगी दिली होती. मीच सगळ्यांना आंबे वाटायचे. तिथे मक्याचे पीठ, बीन्स, टोमॅटो, कांदा यांचा आहारात मुख्यत्वे वापर




**अभिजित आणि श्रद्धा युगांडातील कर्मचाऱ्यांसोबत**

होतो. कामगारांना एक वेळचे जेवण द्यावे लागते. स्थानिकांशी बोलणे, ही एक कसरतच असायची. एरवी अभिजित खूप शांत स्वभावाचा आहे आणि मी थोडी रागीट असून स्पष्टवक्ती आहे. मात्र स्थानिकांवर तो खूप चिडायचा, कारण त्यांना समजावताना ते कधीच समजले नसेल तर ते सांगत नसत. फक्त ओके म्हणत, काहीही कळले नसेल तरीही... मग अर्थात काम नीट होत नसे. त्यांना समजावण्यात खूप वेळ जातो. त्यांना एका वेळी एकच काम जमते. समजा, घरकामाला येणारीला ठरावीक तीच ती कामे करायची असतील तरी ती तिला रोज समजावावी लागतात.''

मशिनरीचा सेटअप करायला राजस्थानहून पाच जण आले होते. त्यांना इंग्रजी येत नव्हते आणि स्थानिकांना इंग्रजीचा गंध नव्हता. कर्मचाऱ्यांसाठी स्वयंपाक करायला येणाऱ्या शेफला आपल्या पद्धतीचा स्वयंपाक शिकवताना श्रद्धा यांच्या नाकी नऊ आले. त्याच्यानंतरच्या शेफला सुदैवाने त्यांनी शिकवलेले सगळे पदार्थ व्यवस्थित करता येतात. तिथे शक्यतो भाज्या घरपोच मिळत नाहीत. अनेकांचा शेफच भाज्या आणतो. श्रद्धा स्वतःच भाज्या आणून देत. एकदा भाजीवाल्याला भाज्या फॅक्टरीत पोचवण्याचा खर्च दिला तर देशील का, असे त्यांनी विचारले. तो तयार झाला आणि त्याने ती सेवा आता सगळ्यांसाठी सुरू केली आहे. त्या कल्पनेबद्दल त्याने श्रद्धा यांचे मनापासून आभार मानले. ऑफिस सुरू व्हायच्या सुरुवातीच्या काळात कामाला दोन पाळ्यांमध्ये दोन जणी साफसफाई आणि भांडी घासण्याचे काम करत. एकीचे नाव आहे डोरकस (Dorcus). ती तेवीस वर्षांची आहे. इंग्रजी छान बोलते. एरवी जुजबी इंग्रजी येणाऱ्यांशी बोलताना फक्त क्रियापदे वापरावी लागतात. सलग वाक्य किंवा वर्णन त्यांना कळत नाही. त्यामुळे मधल्या काळात आमची इंग्रजी भाषा बिघडायला लागली होती. डोरकस शनिवार-रविवार आमच्याकडे घरीही कामाला यायची. तिच्याशी बोलताना कळले की तिने मॅनेजमेंटमध्ये पदवी आणि पदविका घेतली आहे. इतके शिकूनही आम्हाला चांगली



**युगांडा येथे प्लान्टची उभारणी**

नोकरी मिळत नाही, असे तिने सांगितले. तिचे माहेर मध्यमवर्गातले. तिची आई कपड्यांचा बिझनेस करायची, त्यामुळे डोरकसचे शिक्षण कंपालामध्ये झाले. तिच्या गरीब लिव्ह इन जोडीदाराकडेही ट्रान्सपोर्टेशनची पदवी होती. तिची सर्टिफिटेकट पाहिल्यावर श्रद्धा यांनी अभिजित यांच्या संमतीने डोरकसला दोन महिने प्रशिक्षण द्यायचे ठरवले. तिला अगदी स्वच्छतेचे धडे देण्यापासून सुरूवात केली. तिचे काम झाल्यावर ही तासभराची शिकवणी चाले. श्रद्धा यांनी तिला हेही बजावले की 'मी प्रयत्न करेन; पण तुला नाही जमले तर तू हे काम मिळालेच असे गृहीत धरून चालू नकोस. इतरांसोबत तुझीही मुलाखत होईल आणि मग निवड केली जाईल. समजा, तुझी निवड झाली नाही तरी तू दुसरे काम शोधू शकतेस. माझ्या अपेक्षांवर खरी उतरलीस तर एक मोठ्ठं गिफ्ट देईन.' डोरकसला सर्वतोपरी स्वच्छतेचे धडे दिले. तिच्या दैनंदिन गोष्टी आखून दिल्या. इंग्रजी संभाषण आणि संगणक शिकवला. एचआर शिकायच्या आधी श्रद्धा यांनी एअर होस्टेसची पदविका घेतली होती. ग्राऊंड स्टाफ म्हणून काम केले होते. तो अनुभव गाठीशी असल्याने कस्टमर केअरच्या अनुषंगाने अधिक प्रशिक्षण दिले. डोरकसची मुलाखत अभिजित आणि अन्य दोघांनी घेतली. तिची निवड झाली. श्रद्धा यांनी डोरकसला कबूल केल्यानुसार ऑफिस वेअर ड्रेसेस आणि शूज घेऊन दिले. आता डोरकस स्टोअर कीपर आणि श्रद्धा यांची असिस्टंट आहे. तिला डायरी लिहायची सवय लावली आहे. कामांची नोंद त्या डायरीत केली पाहिजे. तुझी प्रगती ती डायरी ठरवेल, असे श्रद्धा यांनी तिला सांगितले आहे. डोरकसचा पगार दुप्पट झाला आहे. बाळंत होईपर्यंत ती काम करत होती. बाळंत झाल्याच्या संध्याकाळी तिने श्रद्धा यांना फोन करून उद्यापासून कामाला येते, असे सांगितले. त्यांनी डोरकसला पंधरा दिवसांची रजा घ्यायला सांगितली. पगार मिळणार होताच. दरम्यान श्रद्धा भारतात परतणार असल्याचे डोरकसला माहीत होते. श्रद्धा सांगतात, की ''सार्वजनिक वाहतूक सोयीची नसल्याने परवडत नसतानाही डोरकस केवळ मला भेटायला आली. मुसळधार पावसाची तमा न बाळगता तान्ह्या बाळाला ब्लँकेटमध्ये लपेटून, बाईकवरून पंधरा मिनिटांचे अंतर कापून मला भेटायला, बाळ दाखवायला आली. मला भरून आले मी निःशब्द झाले होते तिला आणि आमच्या ड्रायव्हरना वाटले की, मी पुन्हा जिंजाला येणार नाही. म्हणून त्यांनी मला पत्र लिहिले होते. अगदी रडतरडत त्यांनी मला निरोप दिला. अवघ्या दहा महिन्यांत ऋणानुबंधांच्या गाठी निर्माण झाल्या होत्या.''

जिंजा हे पर्यटकांचे शहर आहे. नाईल नदीचा उगम तिथून होतो. ठिकठिकाणी हिरवळ आहे. सोशल लाईफ जवळपास नाही. वस्तू निर्यात होऊन येत असल्याने महाग मिळते. युगांडा अद्याप विकसनशील देश असून उद्योगवाढीस खूप संधी आहे. आधी आमच्या उद्योगाचा जम बसल्यावर अभिजित यातून बाहेर पडणार, असा विचार होता. दरम्यान दुसरी संधी आल्यास तिचाही विचार केला जाईल. श्रद्धा सांगतात, ''मला जागेतला बदल आणि सुविधा असल्याने-नसल्याने फार फरक पडत नाही. मात्र जिंजामधल्या दिवाळीत हा फरक ठळकपणे जाणवला. घरी आल्यावर संध्याकाळी घर खायला उठले होते. मग मी निगुतीने फराळ केला. अभिजितच्या आवडीचे पदार्थ केले. कंदील-रांगोळी, दिव्यांची सजावट करूनही फार फरक पडला नाही, कारण सगळे जिवलग हाकेच्या पलीकडे होते आमची 'डेल्टा रिफ्रॅक्टरीज लिमिटेड' सुरू होऊन जवळपास वर्षं होत आहे. मला वाटते, युगांडामध्ये रॅमिंग मास तयार करणारे आम्ही पहिलेच असू. जिंजामध्ये मी कार्यालयाशी निगडित सगळी कामे करते. कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनमध्ये आमच्या कंपनीचा तोटा नाही तर फायदा झाला. भारतातून होणारी निर्यात लॉकडाऊनमध्ये बंद झाली. त्यामुळे आम्हाला ऑर्डर मिळायला लागल्या. तिथे फारशा केस नव्हत्या. पुढे विमानसेवा सुरू झाल्यावर थोड्या केस वाढल्या. अनिकेतच्या लग्नासाठी आम्ही राजस्थानला परतलो तेव्हा कोरोनाच्या ५० केस होत्या. आता ब्यावर आणि जिंजामधली परिस्थिती बघून सर्वानुमते पुढचा निर्णय घेऊ.'' युगांडातही मालकीच्या खाणी असलेल्या या कुटुंबासह नव्या वाटा, नवी वळणे आणि नवी आव्हाने स्वीकारत, नव्या क्षितिजाचे निर्माण करू इच्छिणाऱ्या श्रद्धा, अभिजित आणि अंबुरे कुटुंबीयांना अनेक शुभेच्छा.

**- राधिका कुंटे**
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com



कॅप्टन नीलम इंगळे-लोबो

# कोंडून ठेवलेल्या धनास मोकळे करा...

**ख**जिन्याचा भांडार असलेला सूर्यमालेतील ग्रह म्हणजे पृथ्वी. सृष्टीने या वसुंधरेला हिरव्या वृक्ष-वनस्पतींचा आणि निळ्या सागरी संपत्तीचा अप्रतिम शालू नेसवला आहे. त्यावर जैवविविधतेचा आणि परीसंस्थेचा विस्मयकारी कशिदा काढला आहे. या सृष्टीची गुंफण अगदी काटेकोर आणि अचूक आहे. मानवाची तिच्याबरोबर युगानुयुगे देवाणघेवाण चालत आलेली असली तरी निसर्गातील बऱ्याच गोष्टी अद्याप अनाकलनीय राहिलेल्या आहेत. मात्र काही गोष्टींचे आकलन आपण करू शकलो आहोत. याचे मुख्य कारण म्हणजे ज्या अचूक भाषेत निसर्ग आपल्याशी संवाद साधतो ती अगदी काटेकोर आणि तंतोतंत भाषा म्हणजे 'गणितशास्त्र' हे आपल्या बुद्धीने ओळखले आहे. चराचरातील बहुतांश गोष्टी अभिजात गणितशास्त्राच्या कोणत्या ना कोणत्या शाखेमार्फत अभिव्यक्त केल्या जाऊ शकतात. तास, तारखा, आपल्या हृदयाचे ठोके, एकंदर जीवनकाळातील जैविक घटना यासारख्या ऐहिक गोष्टी आपण आकड्यांच्या साहाय्याने समजू शकतो. अगदी समाजशास्त्रातील स्त्री-पुरुष समानतेविषयी आपण बोलतो तेव्हा 'समानता' हीसुद्धा गणिताचीच संकल्पना.

प्राचीन काळात पृथ्वीवर लांब पल्ल्याचा प्रवास जलवाहतुकीद्वारे केला जात असे. इंधन, वेळ यासारख्या गोष्टींची परिगणना करण्यासाठी नौकायनशास्त्र या अभ्यासाची निर्मिती झाली. हवाई वाहतूकसुद्धा याच नौकायन शास्त्राच्या पायावर रचली गेली आहे. आम्ही वैमानिक या अभ्यासास 'एअर नेव्हिगेशन' असे संबोधतो आणि हा विषय ध्रुव, अक्षांश, रेखांश, विषुववृत्त, महावृत्त इत्यादी संकल्पनांचे निरूपण करतो. भूगोल हे शास्त्र असून भू-शास्त्र त्याची एक शाखा आहे. भू-वैज्ञानिकांनी नकाशातंत्राचा अभ्यासदेखील गणिताच्या आधारावरच विशद केला आणि अशा प्रकारे विश्वाला ३६० अंशांमध्ये विभागून अक्षांश व रेखांश ही संकल्पना मांडली गेली.

लोकरीच्या गोल गोळ्यास आपण पृथ्वी मानले आणि त्याच्या मधोमध स्वेटर विणायची सुई खोचली तर त्या सुईला ध्रुव म्हणता येईल. सुई खोवलेला वरचा भाग झाला उत्तर ध्रुव आणि खालचा भाग झाला दक्षिण ध्रुव. या गोलाभोवती मधोमध आखलेले आडवे वर्तुळ म्हणजे विषुववृत्त (Equator). पृथ्वीवरच्या एखाद्या ठिकाणाच्या पूर्व-पश्चिम अंशात्मक अंतराला रेखांश (Longitude) असे म्हणतात आणि त्या भूपृष्ठावर उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव यांना जोडणाऱ्या उभ्या रेषा असतात. पृथ्वीवरील एखाद्या ठिकाणाच्या विषुववृत्तापासून उत्तर अथवा दक्षिणेकडील




**कॅ. आकांक्षा सोनवणे, कॅ. जोया अगरवाल, कॅ. तन्मय पापागारी आणि कॅ. शिवानी मन्हस**

अंशात्मक अंतराला अक्षांश (Latitude) असे म्हणतात. विषुववृत्तापासून उत्तर ध्रुव ९० अंशांवर आहे. हे अक्षांश पृथ्वीवरील ध्रुवाभोवतीची आडवी वर्तुळे असतात. पृथ्वीवर अनेक वर्तुळे आखता येतात. त्यापैकी सर्वात मोठ्या घेराचे वर्तुळ जे पृथ्वीचे दोन समान भाग करते ते म्हणजे महावृत्त (Great Circle). जर एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत जाणारा मार्ग एखाद्या महावृत्ताशी तंतोतंत जुळला तर त्या दोन स्थानांमधील अंतर हे सर्वात कमी अंतर ठरते. आणि म्हणूनच आम्ही असे महावर्तुळी मार्ग (Great circle route) इंधन आणि वेळ वाचवण्यासाठी निवडतो.



भारताच्या पहिल्या कमर्शियल 'पोलर फ्लाइट'ची टीम

अमेरिकेत आपला भारतीय गोतावळा अतिशय मोठ्या संख्येने वास्तव्य करत आहे आणि म्हणूनच या देन्ही देशांमध्ये हवाई वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असते. भारत आणि अमेरिकेत अर्ध्या जगाचं अंतर आहे. भारत हा देश पृथ्वीच्या प्रवेशद्वाराशी आहे तर अमेरिका पृथ्वीच्या परसदारी.

भारतातून अमेरिकेला जाणारे बहुतांश मार्ग हे भारताच्या पश्चिम दिशेने, पृथ्वीच्या आडव्या भागातून नॉर्थ अटलांटिक समुद्र पार करून किंवा पूर्व दिशेला पॅसिफिक समुद्र पार करून १६ ते १७ तासांत अमेरिकेला पोचतात. भारतातून अमेरिकेला जाण्यास उत्तर ध्रुवावरून जात अगदी पृथ्वीच्या मस्तिश्कापर्यंत ($90^0$N) जाऊन अमेरिकेकडील दुसऱ्या बाजूने दक्षिणेकडे जाणारा, अंतर कमी करून वेळेत दीड ते दोन तासांची बचत करणारा हाच एक महावर्तुळी मार्ग. परंतु ध्रुवप्रदेशाचा बहुतांश भाग रशियाच्या हद्दीत मोडतो. रशिया आणि अमेरिकेतल्या शीतयुद्धामुळे रशियाने त्यांच्या या प्रदेशावरून कुठल्याही विमानास उडण्यास प्रतिबंध घातले होते. काही काळानंतर शीतयुद्ध संपले. रशिया आणि अमेरिकेतील तणाव कमी झाला. याचबरोबर पृथ्वीवरील कुठल्याही ठिकाणावरून इतर कुठल्याही ठिकाणापर्यंत विनाथांबा उडणाऱ्या बोईंग ७७७ यासारख्या (Ultra long haul) विमानांची निर्मिती करण्यात आली आणि उत्तर ध्रुवावरून उडत विमानं इंधन आणि वेळेत भरीव बचत करू लागली.

भूगोल आणि इतिहास आपल्या ज्ञानाचा परीघ पूर्ण करतात असे तत्त्ववेत्ता इम्येन्युएल काण्ट यांनी म्हटले होते. लोकमान्य टिळकांनी प्राचीन वैदिक साहित्यातील खगोलीय उल्लेखांच्या आधारे वेदांचा काळ आणि आर्यांचे उगमस्थान यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. सन १८९३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या 'द ओरायन' आणि 'द आर्क्टिकट होम इन द वेदास' या दोन अद्वितीय ग्रंथांद्वारे उत्तरध्रुवीय प्रदेशाच्या भूगोलाची भारताच्या वेदवाङ्मयीन इतिहासाशी अनोखी सांगड घातली. एअर इंडियाच्या वैमानिकांनी सुद्धा अशाच प्रकारे या उत्तरध्रुवाची सांगड इतिहासाशी घातली. १५ ऑगस्ट २०१९ रोजी एअर इंडियाच्या कॅप्टन रजनीश शर्मा, कॅ. दिग्विजय सिंग, कॅ. करण अगरवाल आणि कॅ. सिद्धेश दादरकर यांनी दिल्ली ते सॅन फ्रान्सिस्को नॉनस्टॉप विमान उडवून पहिल्या भारतीय 'नॉर्थ पोलर कमर्शियल फ्लाइट'चे सारथ्य केले आणि इतिहास घडवला. या प्रमाणीकरण करणाऱ्या फ्लाइटनंतर भारतातून अमेरिकेच्या वेस्ट कोस्टकडे जाण्यासाठी पोलर फ्लाइट सुरू झाली.

या ऐतिहासिक फ्लाइटबद्दल कॅप्टन सिद्धेश दादरकर यांना विचारले असता त्यांनी सांगितले, की ''दिल्ली-सॅन फ्रान्सिस्को हा मार्ग उत्तरध्रुवावरून जाणाऱ्या महावर्तुळावरून जातो. त्यामुळे हा मार्ग निवडल्यास फ्लाइट टाइममध्ये दीड ते दोन तासांची बचत करता येते. म्हणून एअर इंडियाने ही उत्तरध्रुवीय म्हणजेच पोलर फ्लाइट सुरू करण्याची मोहीम आखली. यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

८२ डिग्री नॉर्थ या अक्षांशापासून वरच्या भागास उत्तरध्रुवीय प्रदेश मानला जातो. बहुतांश विमानांना हायर लॅटिट्यूडला उडण्यास मर्यादा येतात. त्यासाठी विशेष तरतुदी कराव्या लागतात. विमानाला हवेत असताना सतत जमिनीवरील एअर ट्रॅफिक कंट्रोलरच्या संपर्कात राहावे लागते. ध्रुवीय प्रदेशामध्ये हा संपर्क साधणे कठीण होऊन बसतं. विशेषत: हिवाळ्यात वातावरणाची उंची खालावल्यामुळे फ्रिजिंग पॉईंट खाली येतो. अशा वेळेस खालच्या उंचीवर इंधन गोठण्याचीसुद्धा शक्यता असते. त्याचबरोबर या प्रदेशात सौर आणि भूचुंबकीय उत्सर्जनचा (Solar and Geomagnetic radiation) धोका असतो. सर्वात मोठी समस्या म्हणजे काही कारणास्तव विमानात आणीबाणी उद्भवल्यास या बर्फाळ प्रदेशात विमान खाली उतरवावे लागले तर तेथील अतिथंड हवामानामुळे कोणतीही मदत मिळणे आणि पुन्हा टेक ऑफ करणेसुद्धा अतिशय अवघड जाते.

या सर्व विषयावर सखोल संशोधन केले गेले. वैमानिकांना आणि केबिनकर्मींना विशिष्ट प्रशिक्षण देण्यात आलं. या फ्लाइटला डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशनच्या (DGCA) अनेक कसोट्यांना तोंड द्यावे लागले. अशा प्रकारचे अनेक अडथळे पार करून आम्ही ही फ्लाइट केली.''

अशी ही अंतर कमी करणारी, वेळ वाचवणारी पोलर फ्लाइट काही क्रियात्मक अडथळ्यांमुळे बंद झाली. फ्लाइट सेफ्टीचे मुद्दे आड येऊ लागले. परंतु पोलर रूटचे अनेक फायदे होते. इंधनात

बरीच बचत होते. इंधन कमी घेतल्याने विमानाचे वजन कमी होते त्यामुळे अधिक प्रवाशांची सोय होते. अशा प्रकारचा आर्थिक फायदा तर होतोच, त्याचबरोबर कमी इंधन वापरले गेल्यामुळे कार्बनचे उत्सर्जन कमी होते परिणामी पर्यावरणाची हानी टाळता येते. अशा या 'इकॉनॉमिक' फ्लाइटला पुनर्जीवित करण्याचा पुढाकार एअर इंडियाच्या श्रीमती हरप्रीतसिंग यांनी घेतला. डीजीसीएच्या असंख्य कसोट्या, नवीन कार्यप्रणाली इत्यादी मिळवून पोलर फ्लाइट पुन्हा सुरू केली. स्त्रिया अग्रस्थानी येतात तेव्हा इतर स्त्रियांसाठी बरेच काही करतात. त्यांनी महिला वैमानिकांना प्रोत्साहन मिळावे, युवा मुलींना प्रेरणा मिळावी म्हणून 'ऑल विमेन क्रू' फ्लाइटची संकल्पना अमलात आणली. महिलादिनी तर आम्ही जमतील तितक्या 'ऑल विमेन क्रू' फ्लाइट करत असतो.

भारताच्या सर्व एअरलाइन्सपैकी ९ जानेवारी २०२१ रोजी सॅन फ्रान्सिस्को म्हणजे अमेरिकेच्या सिलिकॉन व्हॅलीपासून अगदी उलट टोकाशी असलेल्या बंगळुरू म्हणजे भारताच्या सिलिकॉन व्हॅलीपर्यंत, उत्तरध्रुवाला स्पर्श करत, AI-176 ही १६००० कि.मी.चे अंतर पार करणारी जगातील सर्वात लांब पल्ल्याची फ्लाइट ठरली. कॅप्टन जोया अगरवाल, कॅ. तन्मय पापागारी, यांच्या बरोबरीने को-पायलट कॅ. आकांक्षा सोनवणे व कॅ. शिवानी मन्हस या भारताच्या लेकींनी या फ्लाइटचे सारथ्य करून आपले नाव इतिहासाच्या पानावर सुवर्णाक्षरांनी कोरले. जगभरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. 'एअर इंडियाच्या कुशल, पात्र महिला वैमानिकांनी सॅन फ्रान्सिस्कोपासून अत्यंत आत्मविश्वासपूर्ण उड्डाण घेत उत्तर ध्रुवाला पार करत बंगळुरूपर्यंतच्या फ्लाइटचे सारथ्य केले. आमच्या नारीशक्तीने इतिहास घडवला आहे.' असे गौरवोद्गार नागरी उड्डाणमंत्री हरदीप सिंग पुरी यांनी काढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा या महिला वैमानिकांच्या टीमचा त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल सत्कार केला.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंनी, 'धर्म बुडाला, जग बुडणार, कली आला' असे म्हणत अंगावर शेण फेकणाऱ्या, दगड मारणाऱ्या उन्मत्तांच्या विरुद्ध लढून स्त्रीशिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी लावलेले स्त्रीशिक्षणाचं रोपटे आज १७१ वर्षांनंतर अगदी विराट वृक्षात विकसित झालेय त्याबद्दल वादच नाही. पण, सुशिक्षित आणि व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेल्या अशा कितीतरी मुली आपल्या परिचित आहेत ज्या पाणिग्रहण करताच आपल्या कारकिर्दीवर पाणी सोडतात. महिलांचा देशाच्या आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये सक्रिय सहभाग म्हणजेच स्त्रीसशक्तीकरण. त्यासाठी मुलींना केवळ शिक्षण देणे पुरेसे नाही. त्यांना देशाच्या कार्यबलात (work force) समाविष्ट करणाऱ्या नव्या क्रांतीची गरज आहे. त्यांना पूर्णत: कार्यक्षम बनवणे ही समाजाची फार महत्त्वाची जबाबदारी आहे. वर्कफोर्समध्ये सहभागी होण्यास स्त्रियांपुढे अगणित अडथळे असतात. त्यांना या क्षेत्रात जम बसवण्यास प्रतिकार करणाऱ्या बाह्य अडचणी म्हणजे लिंगभेदावर आधारित भेदभाव, लैंगिक छळ, आर्थिक मदतीचा अभाव आणि रुढी-परंपरेच्या जाचक बेड्या. या सर्वांवर मात



सॅन फ्रान्सिस्कोमध्ये फ्लाईटपूर्वी ब्रिफिंग घेताना

करण्यासाठीचा रामबाण उपाय म्हणजे स्त्रियांनी सत्तेच्या अग्रस्थानी असणे. स्त्रियांसाठी अनुकूल धोरणे, योजना आणि आर्थिक मदतीचे स्त्रोत निर्माण करण्याची त्यांच्यामध्ये ताकद असते.

काही जण अशा मताचे आहेत की केवळ महिलांनी पुरुषाशिवाय विमान उडवण्याला इतके का वाखाणायचे. परंतु याला उत्तर हेच की साहसी आणि 'डॅशिंग' करिअर म्हटले की केवळ पुरुषच डोळ्यांसमोर येतात. अशा वेगळ्या क्षेत्रात जाण्याचा मुली विचारसुद्धा करत नाहीत. म्हणूनच अशा वेगवेगळ्या 'पुरुषी' क्षेत्रांतील महिलांना प्रकाशझोतात आणणे ही सामाजिक गरज आहे. अशा धाडसी आणि कर्तबगार स्त्रिया प्रकाशात येतात तेव्हाच युवा मुलींच्या मनात प्रेरणेचे बीज रुजवले जाते; अशा विषयांची चर्चा होते आणि त्यातूनच प्रश्नांच्या निरसनांना उगम फुटतो.

आमच्या या 'ऑल विमेन क्रू'च्या ऐतिहासिक पोलर फ्लाइटने सिद्ध केलेय, की महिला अग्रस्थानी जाऊ शकतात. शब्दश: अगदी जगाच्या डोक्यावर बसू शकतात. आपल्या देशात अशा अगणित प्रतिभावान लेकी आहेत ज्यांच्यामध्ये अफाट क्षमता आणि अपार परिश्रम घेण्याचीही तितकीच तयारी आहे. परंतु या हिरकणींना गरज आहे स्त्रीनेतृत्वाची आणि घरच्यांच्या मदतीची. शक्ती तर निसर्गाने स्त्रीला दिलीच आहे, अभाव आहे तो केवळ साहाय्याचा आणि सहकार्याचा.

समाज स्त्रियांना शतकानुशतके केवळ मनुष्यउत्पादनाचे साधन मानत आला आहे. इतर ठिकाणी मात्र तिला दुय्यम लेखले जाते. स्त्रिया मुलांना जन्म देऊन देशाच्या मानवी संसाधनात प्रचंड योगदान देतात; इतकेच नव्हे तर त्या स्वत: उत्कृष्ट दर्जाच्या मानवी संसाधन आहेत. हा दुर्लक्षित ठेवा मात्र भ्रामक सांस्कृतिक नियमांच्या, बुरसटलेल्या रुढीपरंपरांच्या, असमर्थनीय सामाजिक दबावाच्या पेटीत डांबून त्याला स्त्री-पुरुष विषमतेचे जाचक टाळे ठोकून बंदिस्त केलाय. या नारीशक्तीच्या कोंडून ठेवलेल्या धनास मोकळे केल्यास उत्कर्ष हा आपल्या सर्वांचाच आहे.

**– कॅप्टन नीलम इंगळे-लोबो**
भ्रमणध्वनी : +९१ ९८३३१६५७५९
neelam.ingale13@gmail.com



**कैलास जोशी**

# कोरोना आणि मुलींचे शिक्षण
# काही निरीक्षणे

**मा**णसाचे समाजशील असणे हेच मुळात त्याच्या सामाजिक असण्याला व दुसऱ्याला बरोबर घेऊन जाण्याच्या इच्छेला अधोरेखित करते. कोरोनाने माणसाच्या या समाजशील असण्याच्या जीवनशैलीला छेद दिला आहे. माणसाच्या वेगवेगळ्या सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांना कोरोनाने बदलून टाकले आहे. या निबंधात शैक्षणिक परिप्रेक्षात कोरोनाने काय बदल घडवून आणले व त्यातही मुलींच्या शिक्षणावर काय परिणाम घडवून आणले याचा विचार केला आहे. हा विचार करताना सांख्यिकीवर भर देण्यापेक्षा प्रत्यक्ष जीवनात शिक्षणव्यवस्थेत काय बदल झाले, हे बदल चांगले की वाईट, याचा विचार केला आहे. शिक्षण हा मानवी सांस्कृतिक उपक्रमांतील महत्त्वाचा उपक्रम आहे. भारतातील बहुतांश शिक्षण पारंपरिक पद्धतीचे तसेच प्रत्यक्ष संपर्कावर भर देणारे आहे. हे शिक्षक आणि विद्यार्थी यांचे प्रत्यक्षात असणारे नाते समोरासमोर आणि आता व येथे अशा वर्तमानकालीन स्वरूपाचे आहे. या साथरोगात मात्र माणसांनी एकमेकांच्या संपर्कात येऊ नये याची गरज भासवून दिली. शिक्षक-विद्यार्थी यांनी एकमेकांच्या प्रत्यक्ष संपर्कात न राहता शिक्षणव्यवस्था चालू राहावी यासाठी नवनवीन तंत्रांचा उपयोग केला गेला. ही तंत्रे कोणती व कशी, त्याचे चांगले-वाईट परिणाम आपण पाहणारच आहोत.

भारतीय शिक्षणाचा विचार करायचा झाल्यास आपल्याला असे लक्षात येते, की शिक्षणाची केंद्रे नागरी भागात तसेच सोयीसुविधा उपलब्ध आहेत अशा भागांत आहेत. उच्च आणि दर्जेदार शिक्षणाची केंद्रे तर महानगरांमध्ये एकवटलेली आहेत. महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाल्यास ही केंद्रे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा यांसारख्या महानगरांमध्ये तसेच दुसऱ्या व तिसऱ्या दर्जाच्या शहरांमध्ये एकवटलेली आहेत. ग्रामीण तसेच सुदूर भागात असलेली मुले व मुली शिक्षणाकरता या नागरी भागांमध्ये जाण्यास प्राधान्य देत असल्याचे आपल्याला दिसते. अर्थातच महानगरांमध्ये व शहरांमध्ये शिक्षणाकरता येऊन राहणे हे विद्यार्थ्यांच्या पालकांच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते. या विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या ठिकाणी राहण्याकरता वसतिगृहे उपलब्ध आहेत. या वसतिगृहांमध्ये सर्वच मुलांना संधी मिळते असे नाही, कित्येक वेळा वसतिगृहांची अनुपलब्धता, काही ठिकाणी त्यांची असणारी दुरवस्था यामुळे खाजगी वसतिगृहे आणि वेगवेगळी निवारास्थाने भाड्याने घेऊन हे विद्यार्थी गटाने राहतात. कोरोनाच्या येण्याने शिक्षणाची सर्व गणिते, शिक्षणाच्या पद्धती यांच्यात बदल घडवून आणले. मागील शैक्षणिक वर्ष पूर्ण तर झाले, परंतु विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाले की नाही याबाबत आपल्याला ठामपणाने काही म्हणता येत नाही. अनेक विद्यार्थी पदवीधर झाले. प्राथमिक शाळा ते पदवी यात आपापल्या इयत्ता ओलांडून पुढे गेले, परंतु त्या इयत्तांमध्ये शिक्षणाचा दर्जा राखला गेला असे आपल्याला म्हणता येत नाही. ज्या शिक्षणक्रमांत तांत्रिक ज्ञान घेण्याची आवश्यकता असते, विद्यार्थ्याने प्रत्यक्षात तेथे हजर असणे आवश्यक असते अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने योग्य झाले आहे असे म्हणता येत नाही. वैद्यकीय तसेच काही तांत्रिक विषय प्रत्यक्षात शिकण्याचे आहेत. त्यात अभ्यासविषयाची हाताळणी, त्यातील समस्या व त्यांची सोडवणूक प्रत्यक्ष हजर राहूनच योग्य रीतीने करता येते. परंतु मागील वर्षी हे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने अर्थात आभासी पद्धतीने देण्याचा प्रयत्न झाला. मागील वर्षी मार्च महिन्यात हे कोरोनाचे सावट आले व त्यानंतरच्या काळात

शिल्लक असलेला अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने झाला. या वर्षी शैक्षणिक वर्ष वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कालावधीत सुरू झाले. काही शिक्षणक्रम तर अजून सुरूही झालेले नाही. वैद्यकीय शिक्षण व तंत्रशिक्षणाच्या पहिल्या वर्षाचे विद्यार्थी आताशा कुठे व्यवस्थेत येत आहेत. या लेखाचा विषय या आभासी शिक्षणाच्या स्वरूपाबरोबरच या बदललेल्या शिक्षण पद्धतीचा, त्यामागील अपरिहार्यतेचा, मुलींच्या शिक्षणावर काय परिणाम झाला याचा विचार करणारा आहे. हे करताना वेगवेगळ्या ठिकाणची सांख्यिकी मांडून विद्यार्थ्यांच्या संख्यांचा विचार करून काहीएक विवेचन करता येऊ शकते परंतु एक शिक्षक म्हणून विशेषतः मानव्यशाखेचा एक शिक्षक म्हणून या शिक्षण पद्धतीचा मुलींच्या शिक्षणावर काय परिणाम झाला याबाबत काही निरिक्षणे नोंदवणारा आहे.

कोरोनाच्या दरम्यान काळाचा विचार करता शैक्षणिक वर्ष एकोणावीस-वीसचा बहुतांशी काळ हा पारंपरिक शिक्षणपद्धतीप्रमाणे पूर्ण झाला होता. नवीन शैक्षणिक वर्ष मात्र पूर्णपणे कोरोनासंक्रमणाच्या काळातच सुरू झालेले आहे. यातील निम्मा कालावधी पूर्ण झालेला आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे आभासी शिक्षण देण्याचे व घेण्याचे काम चालू आहे. या महिन्यात आभासी शिक्षणा व्यतिरिक्त प्रत्यक्ष व पारंपरिक शिक्षणाकरता प्रयत्न सुरू झाले आहेत. ज्यावेळेस हे प्रयत्न सुरू झाले त्यावेळेस त्यातील अडचणी तसेच गेले वर्षभर जे काही अनुभवले आहे त्याचा विचार करता येतो. हा निबंध लिहायला सुरुवात करण्याआधी मुलींचे शिक्षण थांबले तर नाही ना अशी शंका मनात उभी राहिली. काही आकडेवारी गोळा केली असता असे लक्षात आले, की मुलींच्या एकूण संख्येत फारसा फरक झालेला नाही नागर भागातील विद्यार्थिनींच्या संख्येत हा फरक अजिबात दिसून आला नाही किंबहुना काही ठिकाणी तर मागील वर्षाच्या तुलनेत विद्यार्थिनींची संख्या वाढलेली असल्याचे दिसून आले. याचा परिणाम मात्र अर्धनागर व ग्रामीण व आदिवासी भागात काही प्रमाणात दिसून आला. तेथील विद्यार्थिनींची संख्या अगदी थोड्या प्रमाणात घटलेली असल्याचे दिसते. असे पाहिले तर आपल्याला विशेषत: मुलींचे शिक्षण सुरळीत चालू आहे असे वाटते. मात्र या आभासी शिक्षणव्यवस्थेचा मुलींच्या शिक्षणावर परिणाम झालेला आहे अशी काही निरीक्षणे नोंदविता येतात. यातील काही निरीक्षणे मुलींच्या शिक्षणातील अडचणी म्हणून आधीपासूनच होती. या आभासी शिक्षणपद्धतीत त्या अडचणी अधिक गडद झालेल्या असल्याचे दिसून येते. या शिक्षणपद्धतीचा सर्वात महत्त्वाचा आधार दूरसंचार व्यवस्थेतील तंत्रज्ञान हे आहे. शिक्षक आणि विद्यार्थी एकमेकांपासून दूर राहून डिजिटल पद्धतीने अँड्रॉइड फोन, लॅपटॉप व इतर साधनांच्या माध्यमाने एकमेकांशी संपर्कात राहून शिक्षण देण्याघेण्याचे काम पूर्ण करत आहेत. साहजिकच विद्यार्थ्यांच्या बाजूने त्यांना ही साधने वापरणे आणि त्याकरिताचा डेटा वापरणे क्रमप्राप्त ठरले. महाराष्ट्रात दूरसंचारव्यवस्थेचे जाळे सर्व ठिकाणी सारख्या पद्धतीने पोहोचलेले नाही. ज्याप्रमाणे उत्तम दर्जाच्या शिक्षणाची केंद्रे शहरी व नागर भागात एकवटलेली आहेत, त्याचप्रमाणे या दूरसंचार व्यवस्थेची केंद्रेही शहरी-नागर भागात एकवटलेली आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण व आदिवासी भागात संचारव्यवस्थेचे जाळे आहे परंतु हे जाळे एकमेकांशी बोलणे, काही समूह माध्यमातून एकमेकांशी संपर्क साधणे याच्यापुरतेच आहे. परंतु पारंपरिक शिक्षणव्यवस्थेत असणारी आता आणि येथे ही वर्तमानकालीन व्यवस्था राबविण्याचा प्रयत्न शिक्षणसंस्था व शिक्षक करू लागतात त्या वेळेस विद्यार्थ्यांना उपस्थित राहता येतेच असे नाही. शिक्षकांच्या बाजूनेदेखील या काही अडचणी आहेतच. शिक्षणसंस्था, शिक्षक व विद्यार्थी कोणीच या स्थितीकरता तयार नव्हते. याकरता शासकीय पातळीवर परिपत्रके पाठवणे याव्यतिरिक्त कोणतेही धोरणात्मक आखणी नव्हती. अशा आभासी शिक्षणव्यवस्थेकरता कोणताही आराखडा नव्हता. तसा तो अजूनही नाही. अर्थात यात काही सर्जनशील व कल्पक माणसांनी आपापले मार्ग शोधले, परंतु प्रत्यक्ष संपर्कातून शिक्षण देण्याचा व शिक्षण घेण्याचा यातील वैशिष्ट्यपूर्णता आभासी शिक्षणात येणे कठीणच आहे. वर उल्लेखलेल्या मुद्यांपैकी या आभासी शिक्षणव्यवस्थेत सर्वात महत्त्वाचे ठरते ते त्याकरताचे साधन म्हणजे लॅपटॉप अथवा अँड्रॉइड फोन सर्व विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड फोन आहे हे येथे गृहीत धरलेले आहे. वस्तुतः विद्यार्थी जाऊ द्या, त्यांच्या पालकांकडेही सर्रास अँड्रॉइड पद्धतीचे फोन नाहीत. असले तरी ते सर्व पालकांकडे व विद्यार्थ्यांकडे सारख्या दर्जाचे नाहीत. या साधनाच्या आवश्यकता असण्याच्या शिक्षणपद्धतीत आर्थिक दरी महत्त्वाची व घातक ठरली. आपल्या दैनंदिन गरजा कशाबशा पूर्ण करणाऱ्या पालकांपुढे नवा प्रश्न येऊन उभा राहिला तो म्हणजे अँड्रॉइड मोबाइल आणि डेटा रिचार्जचा खर्च. वरवर पाहता आपल्याला हा फार मोठा खर्च वाटत नाही, परंतु ज्याचे आर्थिक उत्पन्न मासिक दहा ते वीस हजार रुपयांचे आहे त्यांच्याकरतादेखील हा खर्च निश्चित मोठा आहे. आता प्रश्न येतो तो सामाजिक विषमतेचा. एखाद्या घरात एकापेक्षा जास्त मुले आहेत आणि त्या मुलांना अँड्रॉइड फोन गरजेचा आहे अशा वेळेला मुलगा आणि मुलगी यात केला जाणारा भेद अधिक गडद होतो. अनेक उदाहरणांमध्ये असे दिसून आले आहे की घरात असलेला एक फोन मुलीपेक्षा मुलग्याला देण्याकडे कल दिसून आलेला आहे. आपल्याला असे वाटते की शहरी भागांमध्ये सर्व मुलींकडे अँड्रॉइड फोन सहज उपलब्ध आहे. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. येथे फोन उपलब्ध नसण्याची टक्केवारी कमी झाली असली तरी मुलींकरता तो उपलब्ध नाही हे वास्तव आहे. एकच फोन आळीपाळीने वापरायला मिळणे, महत्त्वाच्या वाटणाऱ्या शिक्षणक्रमाकरता तो वापरायला मिळणे आपल्याला दिसून येते. आपण आधी पाहिले की या नव्या शैक्षणिक वर्षात मुलींच्या प्रवेशामध्ये फारसा बदल झालेला नाही. वरवर पाहता हे चित्र आश्वासक वाटते, परंतु या मुलींची ऑनलाइन अर्थात आभासी शिक्षणव्यवस्थेतील उपस्थिती पाहिल्यास चित्र उलटे व विदारक दिसते. येथे मला प्रत्यक्ष प्रवेशसंख्या आणि उपस्थिती याच्यातील फरक अधोरेखित करायचा आहे. प्रवेश घेतलेल्या परंतु उपस्थित नसलेल्या मुली कोठे गेल्या याचा विचार करता आपल्याला

अनेक कारणे दिसून येतात. यातील एक महत्त्वाचे कारण असे, की मुलगी घरात असणे म्हणजे ती घरातील कामाला उपलब्ध असणे ही समजूत होय. मुलगी जेव्हा पारंपरिक शिक्षणाच्या ठिकाणी जात असते त्या वेळेला ती या घरातील वातावरणापासून दूर असते. परंतु कोरोनाकाळात शिक्षण घरूनच आणि तेही आभासी पद्धतीने घ्यायचे असल्यामुळे त्यातील सर्व व्याख्यानांना हजर राहिलेच पाहिजे असे काही नाही, असे म्हटले जाते. शिक्षकांनी हजेरी महत्त्वाची व अनिवार्य सांगितली तरी हजेरीपुरते व्याख्यान सुरू करून देऊन इतर कामाकरता मुलगी जाते. अर्थात सर्वच ठिकाणी असे होते असे नाही. मात्र घरात राहिल्यानंतर घरातील कामाकरता मुलगी उपलब्ध होते आणि शिक्षणात उपस्थित राहण्यामध्ये गळती होते हे मात्र निश्चित. नेटवर्कची अनुपलब्धता मुलांना आणि मुलींना सारखीच असते मात्र मुलगा आणि मुलगी दोघेही घरी जर असतील तर नेटवर्क असले तरी मुलीला घरातील कामांना लावले जाते हे सत्य आहे. कोरोनाकाळात घरातील कर्त्या व्यक्तींच्या उत्पन्नामध्ये घट झाल्यामुळेकित्येक ठिकाणी या मुली कामावर जायला लागल्या असल्याचे दिसून येते. जव्हार, मोखाडा यासारख्या दूर आदिवासी भागातील विद्यार्थिनींचा दिवसातील मोठा काळ केवळ पाणी आणण्याकरता जातो. पाणी भरण्याकरता दोन ते पाच किलोमीटर जाणे ही स्थिती आजही अस्तित्वात आहे. घरातील व इतर कामांपुढे आभासी पद्धतीचे हे शिक्षण दुय्यम महत्त्वाचे मानले जाते. या काळात लग्नसमारंभाच्या बाबतीत घडलेली एक गोष्ट अशी की लग्नाकरता ५० पेक्षा जास्त माणसांना परवानगी नाही. साहजिकच लग्नावरील खर्च कमी झाला. आपण या दरम्यान झालेली लग्ने पाहिली तर ती बऱ्यापैकी कमी पैशांत झालेली दिसतात. मुलगी वयात आल्यानंतर शिक्षणापेक्षा तिच्या लग्नाला प्राधान्य दिले पाहिजे अशी धारणा काही पालकांमध्ये दिसून येते. या काळात या धारणेला अधिक बळकटी मिळाली. ज्या मुलींना महाविद्यालयीन व इतर शिक्षण घेण्याची इच्छा होती अशा मुलींचे लग्न झाले आणि त्या शिक्षणव्यवस्थेतून बाहेर पडल्याचे दिसून येते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अनेक ठिकाणी त्यांचे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश तर आहेतच परंतु त्यांची उपस्थिती मात्र नाही अशी स्थिती दिसून येत आहे. अर्थात अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर व्यवसायाभिमुख शिक्षणाकडे कल वाढत आहे आणि येथील उपस्थितीवर मात्र फार परिणाम झालेला नाही. मानव्य शाखा दुय्यम महत्त्वाच्या मानण्याकडे आधीच कल आहे आणि त्यात व्याख्यानपद्धती-चर्चातपशिलांची भरमार असलेल्या या विद्याशाखांकडे काहीसे दुय्यम महत्त्वाच्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. या नव्या आभासी शिक्षणव्यवस्थेत मुलींच्या दृष्टीने प्रत्यक्ष गळती दिसत नसली तरी उपस्थितीच्या दृष्टीने गळती दिसून येत आहे. वेगवेगळ्या शिक्षण केंद्रांमध्ये शिक्षण घेण्याकरता वसतिगृहांमध्ये अनेक मुली प्रवेश घेत असत. या काळात सर्व वसतिगृहे बंद आहेत. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेतल्यानंतर ग्रामीण भागातील मुलींकरता एक नवा अवकाश उपलब्ध होत असे. आपल्या परिसरापासून दूर जाऊन एका नव्या अधिक खुल्या व मुक्त वातावरणात वावरण्याची संधी त्यांना उपलब्ध होत असे. या काळात ही संधी आता त्यांना उपलब्ध नाही. यातून मुलींच्या शिक्षणातील अनुपलब्धतेबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील संधींचा संकोच झालेला आहे. नागरी भागात तसेच शहरांमध्ये शिक्षणानिमित्त येऊन पारंपरिक शिक्षणाबरोबरच इतरही अनेक पूरक शिक्षणक्रम मुली पूर्ण करत असत, आता त्यांच्या भवतालचा हा अवकाश हा आक्रसला आहे. त्यांच्या या कमी झालेल्या संधींचे परिणाम आपल्याला पुढील काळात दिसून येतील. कोरोनाकाळातील या आभासी शिक्षणपद्धतीमुळे उच्चदर्जाच्या शिक्षणाचा अधिकार या मुलींकडून हिरावून घेतला गेला आहे. या शिक्षणक्रमातील अंमलबजावणीची घाई, अध्यापन व परीक्षा पद्धतीद्वारे त्याचे मूल्यमापन यांच्यात समन्वय नसल्याचे आपल्याला दिसून येते. ज्या अभ्यासक्रमांमध्ये दीर्घ पद्धतीच्या विवेचनाची आवश्यकता असते तेथे त्या विवेचनाबाबत होणारी परीक्षा मात्र बहुपर्यायी पद्धतीने झाली. या परीक्षेच्या अंमलबजावणीतदेखील प्रचंड घाई झाली. त्यांना गुण तर मिळालेले आहेत, हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, मात्र त्यांना शिक्षण मिळाले की नाही याबाबत शंका आहे. कोरोनाकाळातील या आभासी शिक्षणपद्धतीत मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणासंदर्भातील दरी काहीशी वाढली आहे असे दिसून येते.

या आभासी शिक्षणपद्धतीचे सर्व परिणाम वाईट होते असे नाही. यानिमित्ताने अनेक अभ्यासक्रम उपयुक्ततेच्या आणि वर्तमानात संवादी असण्याच्या कसोटीवर पारखले जात आहेत. आभासी शिक्षणपद्धतीमुळे आजवर नवीन तंत्रे संपर्काची माध्यमे व साधने यापासून दूर असलेल्या मुलींना ते उपलब्ध झालेले आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवते. या शिक्षणपद्धतीतून शिक्षणाच्या व्यवस्थेतून दूर गेलेल्या मुली जशा आहेत तसेच या शिक्षणपद्धतीत अंतराचे बंधन नसल्यामुळे जोडल्या गेलेल्या मुलीही आहेतच. या मुलींना नवी तंत्रविषयक भाषासाधने तसेच शिकण्याच्या नवनव्या पद्धती उपलब्ध झालेल्या आहेत. ज्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीच्या चांगल्या व वाईट अशा दोन्ही बाजू असतात तशाच या पद्धतीच्यादेखील आहेत. एका बाजूला नवीन शिक्षणव्यवस्था व विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने शिकण्याच्या व शिकवण्याच्या नवनव्या पद्धती आत्मसात करण्याची गरज आता नव्याने पुढे येत आहे. पारंपरिक शिक्षणव्यवस्थेला छेद देऊन नवे काहीतरी आत्मसात केले पाहिजे याची गरज प्रकर्षाने अधोरेखित झाली आहे. मुलगे आणि मुली यांच्यातील शिक्षणाची व संधीची दरी एका बाजूला रुंदावत असताना दुसऱ्या बाजूला त्या कमी करण्याच्या अनेक शक्यताही आहेत. शिक्षणक्षेत्रातील तसेच धोरण ठरवणाऱ्या व्यक्तींनी याकडे सकारात्मक पद्धतीने पाहून या आपत्तीचे संधीमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**- डॉ. कैलास प्रभाकर जोशी**
भ्रमणध्वनी : +९१ ९४२३९४७४००
kailasjosh@gmail.com



प्रभा जोशी

# मुंबईचे दिवस

मुंबई आणि पुणे या दोन महानगरांमधील भौगोलिक अंतर अगदी कमी असलं तरी प्रादेशिकता, हवामान यात पूर्ण भिन्नता आहे. दोन्हीकडचा सांस्कृतिक स्तर अगदी वेगळा आहे. त्याचं कवित्व वर्णन करायला अनेक विनोद, वात्रटिका, कविता, अगदी चित्रपटही खर्ची पडले आहेत. एकूण महाराष्ट्रातील ही दोन मोठी शहरं तुलनेच्या पातळीवर नेहमीच चर्चेत असतात हे खरं.

नोकरीतल्या बदलीमुळे २०१५ ते २०१९ अशी चार वर्ष मी पुण्याहून मुंबईला गेले, तिथे राहिले आणि हा फरक प्रकर्षानं जाणवला. विशेषतः मुंबई शहराचा ब्रिटिशकालीन इतिहास, स्थापत्यशास्त्राचे कलोनियल वारसा जपणारे अगणित नमुने, शहराच्या मध्यवर्ती भागात दिसणाऱ्या त्याच्या पाऊलखुणा, मुंबईची सर्वसमावेशकता आणि तिथे पूर्वापार रुजलेली, जोपासलेली कॉस्मोपोलीटीन संस्कृती अशा पातळीवर हे फरक जाणवले.

मी केंद्र शासनच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या आकाशवाणीमध्ये कार्यक्रम अधिकारी म्हणून नोकरी करते. सुस्थापित जागेवरून बदली होणं ही फार आनंददायी गोष्ट नसली तरी महाराष्ट्रातल्या छोट्या केंद्रात बदलून जाण्याऐवजी मुंबई मोठं आणि महत्त्वाचं केंद्र असल्यामुळे चांगला अनुभव मिळेल असा सकारात्मक विचार मी तेव्हा केला. जुलै २०१५ मध्ये मी आकाशवाणी मुंबईमध्ये रुजू झाले.

रोज मुंबई-पुणे प्रवास करत ही बदली निभावणं अवघड होतं. मग माझ्या बहिणीच्या ओळखीनं प्रभादेवीला सिद्धिविनायकमंदिराला लागून कामना सोसायटीत दोन खोल्यांचं छोटंसं घर मिळालं जे माझ्या एकटीसाठी ऐसपैस होतं.

पुण्याहून सामान आणलं. घर मांडलं. स्वयंपाकघर लावलं आणि मुंबईतलं आयुष्य सुरू झालं. सकाळी पोळीभाजीचा डबा घेऊन मी साडेआठला बाहेर पडायचे. बेस्टच्या ८५, ८६, ८७, ९२, ९३ नंबरवाल्या सगळ्या बस मंत्रालयाकडे जात. दर पाच मिनिटांनी कुठलीतरी बस यायचीच. मी तासाभरात पोचायचे. वेगवेगळ्या रस्त्यांनी बेस्ट बसमधून जे मुंबईदर्शन होई ते मला फार आवडे.

आकाशवाणी मुंबईत मी चार वर्षं संगीत विभागप्रमुख म्हणून काम पाहिलं. रोजची शास्त्रीय तसच सुगम संगीताची ध्वनिमुद्रणं त्यशिवाय अधूनमधून संगीतसभा आणि संमेलनं, ऑडिशन्स, संगीतस्पर्धा आणि रोज रेकॉर्डिंगला येणाऱ्या कलाकारांची वर्दळ असा व्यस्त दिनक्रम असे. त्या अनुभवाचं संचित वेगळ्या पातळीवरचं होतं. आनंद होता पण कडूगोड अनुभवही होते. पुण्यातलं घरकुटुंब सोडून मुंबईत एकटीनं राहण्याचं वैषम्य होतं.

संध्याकाळी काम आटपून ब्रॉडकास्टिंग हाऊसमधून मी घरी जायला निघे. आमच्या ऑफिसच्या मागच्या रस्त्यावर एलआयसीची योगक्षेम ही मुख्य इमारत होती. तिथून परतीची बस सुटायची. वेगवेगळ्या रूटनी जाणाऱ्या या बसमधून परत दक्षिण मुंबईचं दर्शन होई. बहुतेकदा मी खिडकीशी बसून शांतपणे बाहेरचं जग निरखत राही. या शहराचा सांस्कृतिक, सामाजिक दस्तऐवज दाखवणारा हा प्रवास मला कधी कंटाळवाणा वाटला नाही. चर्चगेट-मरीन लाईन्स-चर्नी रोड ते ऑपेरा हाऊसपर्यंत ऐसपैस पसरलेला महर्षी कर्वे रोड. हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन या तीनही धर्मीयांची जुनी प्रार्थनास्थळं या रस्त्यावर आहेत. इथेच रस्त्यालगत चंदनवाडी आणि बडा कब्रस्तान अशी हिंदू-मुस्लीम स्मशानं एका

भिंतीच्या अंतरानं उभी आहेत. पुढे लगेच पारशी अग्यारी आहे. संमिश्र वस्तीच्या या रस्त्यावरचं कलानिकेतन, क्वीन्स एम्पोरियम, रूपमिलन अशी प्रसिद्ध वस्त्रप्रावरणांची मोठी दुकानं ही आहेत. पुढे ऑपेरा हाऊस परिसर आणि रॉयल ऑपेरा हाऊस थिएटरची देखणी ऐतिहासिक वास्तू. हा पं. पलुस्कर चौक. विष्णू दिगंबर पलुस्करांनी लाहोरला गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली आणि पुढे मुंबईत भव्य विद्यालय सुरू केलं. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या चौकाचं नाव पलुस्कर चौक. हा रस्ता सरळ केनेडी ब्रिजकडे जाई. माझी बस डावीकडे वळून मामा वरेरकर पुलावरून बस ह्युजेस रोडला लागे. या चौकात विष्णू दिगंबरांचे शिष्य पं. बी. आर. देवधर यांचही संगीत विद्यालय होतं. त्यामुळे इथे देवधर यांच्या नावाचा चौक आहे. दक्षिण मुंबईतली ही मराठी कर्तृत्वचिन्हं आहेत.

ह्युजेस रोडच्या सुरुवातीला उजव्या बाजूला सोहराब वसाहत आहे. बिल्डिंगच्या मोठ्या खिडक्यातून जुनं लाकडी फर्निचर असलेली पारशी घरं दिसत. तिथे एका गॅलरीत संध्यकाळी वाहत्या रस्त्याकडे शून्य नजरेनं बघणारा पारशी टोपी घातलेला एक तरुण आणि त्याच्या अवतीभोवती फिरणारी किंवा शेजारी बसलेली, फ्रॉक घातलेली, बहुधा त्याची वयस्क आई असं दृश्य मला नेहमी दिसायचं. कुतूहलही वाटायचं. कधी मनात येई एखाद्या चित्राचं किंवा कथेचं बीज या फ्रेममध्ये आहे.

ह्युजेस रोड केम्प्स कॉर्नर पुलाजवळ संपतो. नेपियन सी रोड, मलबार हिल, अल्तामाउंट रोड याचं जंक्शन म्हणजे केम्प्स कॉर्नर. केम्प्स कॉर्नर हा उच्चभ्रू शॉपिंग एरिया. तिथली डिझायनर दुकानं, ब्रांडेड शॉप प्रसिद्ध आहेत. हा लखलखाट डोळे दिपवतो. केम्प्स कॉर्नर फ्लाय ओव्हर संपला की कंबाला हिलचा परिसर दिसतो आणि पेडर रोड सुरू होतो. भारतातील मोठे उद्योगपती आणि धनिकांचं वास्तव्य असलेला हा मुंबईतला चर्चित भाग. पेडर रोडची स्काय लाइनवर मागच्या अल्तामाउंट रस्त्यावरील अंबानींच्या अन्तालिया या भव्य वास्तूची ठळक पण बटबटीत छाया पडली आहे. पेडर रोडवर केनिलवोर्थ ही बीएआरसी कर्मचाऱ्यांची वसाहत आहे. हे भारतीय अणुभौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांचं जन्मस्थळ असा फलक इथे बाहेर लावला आहे. भारतीय अणुआयोग आणि टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे संस्थापक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे महान शास्त्रज्ञ इतकी मोठी ओळख असलेल्या भाभांचं हे जन्मस्थळ उपेक्षित आहे. मागे अन्तालिया आणि पुढे केनिलवोर्थ अशा दोन वास्तू म्हणजे वैज्ञानिक बुद्धिमत्ता, नीतीमत्ता आणि बेछूट व्यावसायिकता असा विरोधभास आहे, असं तिथून जाताना नेहमी माझ्या मनात येई.

पेडर रोडवरचं सांस्कृतिक आणि सांगीतिक वास्तूमहात्म्य तर खूपच वैभवी आहे. या रोडवर फिल्म्स डिव्हीजनचं ऑफिस आहे, जी एके काळी भारतातील महान लघुपट निर्मात्यांची कर्मभूमी होती. अलीकडे तिथे चित्रपटसंग्रहालयही नव्यानं वसवलं आहे. पुढे जसलोक हॉस्पिटलसमोरची देवाशिष बिल्डिंग हे संगीतकार कल्याणजी–आनंदजी जोडीचं घर. तर पेडर रोडच्या उत्तर टोकाकडे रस्त्यालगत उभ्या असलेल्या मकानी मनोर या वास्तूत संगीतकार मदन मोहन याचं प्रदीर्घ वास्तव्य झालं. हा रस्ता संपण्याआधी महालक्ष्मी मंदिराच्या अलीकडच्या चौकात देवी सरस्वतीचं प्रभुकुंज हे स्वरमंदिर उभं आहे. प्रभुकुंजमधलं मंगेशकरांचं घर रस्त्यावरून अगदी स्पष्ट दिसतं. मी बसमधून रोज भक्तिभावाने मंदिराचं दर्शन घेई. वाळ्याचे पडदे सोडलेल्या गॅलरीमधून हॉलमधलं उजळलेलं झुंबर दिसे. क्वचित कधी टीव्ही बघणाऱ्या पाठमोऱ्या व्यक्ती दिसत. यातच रोज देवी सरस्वतीचं दर्शन घडलं असं मी समजत असे.

ऑफिसकडून घराकडे जाणाऱ्या काही बस गिरगावातूनही जात. फोर्टमधून राजाबाई टॉवर, हायकोर्ट ओलांडून बस मेट्रो सिनेमाच्या चौकातून धोबी तलाव, चिराबाजार रस्त्याने जायची. हा पारशी, मुस्लीम, ख्रिश्चन असा संमिश्र भाग. २०१६ साली आकाशवाणीनं भारतातील वेगवेगळ्या जातीधर्मांची संस्कारगीतं ध्वनिमुद्रित करण्याचा प्रकल्प राबवला होता. त्याअंतर्गत मी आकाशवाणी मुंबईतून पारशीधर्मीयांची संस्कारगीतं रेकोर्ड केली होती. या प्रकल्पासाठी आकाशवाणी मुंबईतल्या आमच्या प्रशासकीय विभागातला सहकारी बिल्मोरिया यांनी खूप मदत केली. धोबीतलाव भागातल्या पारशीगीतं गाणाऱ्या जुन्या मंडळींची ओळख करून दिली. तेव्हा हा परिसर मी नीट पाहिला. इथे दोन अग्यारी आहेत. मी पाहिलेल्या इथल्या दोन घरांमध्ये विहिरी म्हणजे त्यांच्या बावडी होत्या. जलदेवतेसाठी तिथे काचेच्या कंदिलात मेणबत्ती जळत असे. मला बिल्मोरियानं इथली पॅरीस बेकरी दाखवली. तिथे आणि मेन रोडवरील सासानियान बोलान्जरी या रेस्तरौमध्ये खास पारशी पदार्थ मिळत.

मेट्रो सिनेमा चौकात भली मोठी आणि पुरातन अशी पाच माळ्यांची जेरबाई बिल्डिंग उभी आहे. तिच्या तळमजल्यावर फुटार्डोस हे वाद्यांचं जुनं आणि मोठं दुकान आहे. आमच्या संगीत विभागातल्या छोट्यामोठ्या खरेद्यांसाठी तिथे भेट देण्याचा योग यायचा. याच रस्त्यावर पुढे चिराबाजारात गिटार, पियानोचे बरेच क्लासही होते. आमच्याकडे पाश्चात्त्य वाद्यं वाजवणारी काही मंडळी तिथून येत. गोवन कॅथालिक मंडळीचा या क्षेत्रात राबता आहे.

पुढे कुलाबा ते सिप्झ भुयारी मेट्रोचं काम जोरात सुरू झालं आणि गिरगावातून येणाऱ्या या रस्त्यावर मोठी यंत्रं उभी राहिली. खणलेल्या रस्त्यातून मार्ग काढायला बस अभूतपूर्व वेळ घेऊ लागली. मी त्या बाजूनं येणाऱ्या बसमधून प्रवास मग थांबवला. मेट्रोचं काम जोरात सुरू झालं तसं सगळं झपाट्यानं बदलायला लागलं. वाहतुकीची कोंडी वाढली. मी राहत होते तिथे सिद्धिविनायक मंदिराजवळची बाग, नर्दुल्ला टँक मैदान मेट्रोनं काबीज केलं. अहोरात्र घरघर आवाज सुरू झाले. चर्चगेट ते आमचं ऑफिस इथल्या मोठमोठ्या वड, पिंपळ वृक्षांची आहुती पडली. ऑफिसला लागून भुयाराची खोदाई सुरू झाली. तिथून अगदी जवळच समुद्र आणि सीसीआय क्लबकडे जाणाऱ्या रस्त्यावरचा शंकर–जयकिशन चौक आणि फुलांनी डवरलेलं आयलंड अदृश्य झाले.

भुयारी मेट्रोच्या कामानं घर ते ऑफिस रस्ता व्यापून टाकला

तेव्हा बदलत्या परिस्थितीत मी ऑफिसला जाण्यासाठी टॅक्सी ठरवली. येताना मात्र बसचा प्रवास चालूच राहिला. सैनी नावाचे सरदार पापाजी मला ऑफिसमध्ये सुखरूप पोचवू लागले. सैनी गप्पिष्ट होते. एका बाजूला तोंडानं वाहे गुरू असा जप चालायचा. मुंबई शहराबद्दल, तिथल्या राजकारणाबद्दल ते मार्मिक बोलयचे. सैनी वर्षातून एकदा पंजाबात गावी जात तेव्हा सुवर्णमंदिरात माथा टेकवून मलाही प्रसाद घेऊन येत.

व्हीटी, फोर्ट परिसरातल्या एकोणिसाव्या शतकात उभ्या राहिलेल्या गॉथिक शैलीतल्या इमारती आणि मरिन ड्राइव्ह, चर्चगेट इथे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बांधलेल्या आधुनिक पण कलात्मक अशा शेकडो आर्ट डेको इमारती हा मुंबईतल्या जुन्या स्थापत्यकलेच्या दोन प्रवाहांच्या संगमाचा दुर्मिळ वारसा आहे. दुर्दैवानं तो जपण्यासाठी चाललेले प्रयत्न अपुरे आहेत. इथे रोज कामासाठी येणाऱ्या लाखो लोकांना त्याची जाणीवही नाही. सौंदर्यदृष्टी आणि तिचं संवर्धन याबाबतीतले आपल्याकडचे संस्कार केव्हाच हरवून गेले आहेत.

मरिन ड्राइव्हवरच्या या आर्ट डेको बिल्डिंगमध्ये पूर्वी चित्रपट क्षेत्रातल्या नामवंत मंडळींचं वास्तव्य झालं.

इथेच एका बिल्डिंगमधल्या मरिना गेस्ट हाऊसनं तेव्हा उमेदवारी करणाऱ्या नवोदित कलाकारांना आश्रय दिला. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हिंदी सिनेमातल्या अगणित दृश्यांमधून-गीतांमधून दिग्दर्शकांनी या मरिन ड्राइव्हच सुंदर दर्शन घडवलं.

या रस्त्याच्या शेवटी नरीमन पॉइंट इथे एअर इंडिया बिल्डिंग, ट्रायडेंट हॉटेल आणि समुद्राच्या टोकाला एनसीपीएचा रम्य परिसर आहे. एनसीपीएत अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम असतात. हा परिसर माझ्या ऑफिसपासून काही मिनिटांवर होता, पण मोजके अपवाद वगळता मला तिथले कार्यक्रम पाहणं फार जमलं नाही. बहुधा ते संध्यकाळी उशिरा असत आणि रात्री घरी परतण्याचा प्रश्न उभा राही.

कधी ऑफिस सुटल्यावर किंवा लंचटाईममध्ये थोडा वेळ काढून मी ओव्हल मैदान ओलांडून प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, जहांगीर आर्ट गॅलरी, नॅशनल मॉडर्न आर्ट गॅलरी अशी चक्कर मारून येई. इथे भरलेली प्रदर्शनं परत परत जाऊन मी बघितली. याच भागात काळा घोडा फेस्टिव्हलही होतो. तोही चार वर्षं सहज बघता आला.

मी दर शुक्रवारी ऑफिस संपवून पुण्याला येत असे आणि सोमवारी पुण्याहूनच मंत्रालय बस किंवा डेक्कन क्वीननं सरळ ऑफिसला जात असे. मी राहत होते त्या प्रभादेवी, दादर परिसर संमिश्र आणि बहुजन मराठी होता. या परिसरात कोकणी चाकरमान्यांची मोठी वस्ती आहे. गणपतीत रात्री इथल्या चाळी-वस्त्यांमधून भजनी मंडळाचे आवाज घुमत. मी राहत होते त्या कामना सोसायटीतही कामनादेवीचं मोठं नवरात्र भरायचं. नवचंडी पूजा, हळदीकुंकू, भंडारा असे भरगच्च कार्यक्रम दिसायचे. ख्रिसमसमध्ये कामनामधली गोवन कॅथलिक मंडळी येशूचा देखावा मांडून रोज ख्रिसमस कॅरल गात. पण सोसायटीमधली मूळ वाडीतून बिल्डिंगमध्ये आलेली मुख्य वस्ती कोकणी मंडळींचीच होती. प्रभादेवी-दादर परिसरात अद्याप काही वाड्या जिवंत आहेत. त्यातली कॅडल रोड ते बोले रोडपर्यंत टेकलेली धुरू वाडी आठवते. मोठं दगडी घरं, बाजूला टुमदार कौलारू घरं, छोटी पत्रे लावलेली चाळवजा घरं आणि जोडीला आंबा, नारळ, फणस अशी झाडं असं या वाड्यांचं ढोबळ रूप. पूर्वी अशा वाड्यांमध्ये विखुरलेल्या मुंबईत आता वाड्या शोधाव्या लागतात.

वीकेंडला पुण्याला गेले नाही तर मी फिरायला बाहेर पडायचे. मुंबई शहर खूप मोठं आहे. माझ्या चार वर्षांच्या वास्तव्यात दक्षिण मुंबईचा छोटासा भाग मी रोज बघितला. या महानगराचा लोकलच्या प्रवासाशिवाय न दिसणारा अक्राळविक्राळ परीघ मी ओलांडलाच नाही. तरीसुद्धा चार वर्षांत या शहराचं ऐश्वर्य दिसलं आणि मर्यादाही कळल्या.

अनेक वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वाची माणसं भेटली. त्यातून सामाजिक जीवनाचा बहुपेडी पोत आणि रंगरूप याचा अंदाज आला. पुणे-मुंबई भौगोलिक अंतर अगदी कमी असलं तरी दोन शहरांमधला सांस्कृतिक, सामाजिक फरक लख्खपणे कळला. मुंबई-पुणे विनोदांची व्युत्पत्ती लक्षात आली. या चार वर्षांनी पुष्कळच दान पदरात टाकलं असं आज निश्चित वाटतं.

**– प्रभा जोशी**

भ्रमणध्वनी : ९८२२११०८३३

ग्रंथाली

**नवी प्रकाशने**




# रोजी-रोटी

विजय कसबे

पुस्तिका म्हणजे व्यवस्थेसमोर मांडलेला एक प्रस्ताव

**मूल्य ५० रु.**

**सवलतीत ३० रु.**


# अभ्युदय

प्र. के. वकारे

आजच्या तरुणांना प्रेरणा देणारी चित्तवेधक कहाणी.

**मूल्य २०० रु.**

**सवलतीत १२० रु.**





**पुष्पा खरे**

# ताई - एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

**दि**नांक १४ डिसेंबर २०२० रोजी आमच्या ताईंचे देहावसान झाले. सगळ्यांना असे वाटले जणू आपला आधारस्तंभच निखळून पडला. संपूर्ण घर निःस्तब्ध झाले. ८-१० दिवस घरातील सगळे फोन सतत वाजत होते.

ताई इंदूर येथील मराठी व गैरमराठी समाजाकरता एक सन्माननीय व्यक्ती. संपर्कात आलेल्या प्रत्येकावर ताईंच्या व्यक्तित्वाचा एक प्रभाव होता, मग ते त्यांचे दोन पुत्र चालवत असलेल्या कोचिंग क्लासचे असंख्य माजी व वर्तमान विद्यार्थी आणि त्यांचे पालक असोत, भगिनीसमाजातील स्त्रिया असो अथवा परिवाराचे आप्तस्वकीय असोत. ह्या सर्व व्यक्तींना ताईंच्या प्रेमाची ऊब आजही तीव्रतेने जाणवते. प्रत्येकाने आपापल्या भावना वेगवेगळ्या शब्दांत व्यक्त केल्या.

कोणाला ताईंशी पाचच मिनिटे बोलून मानसिक शांतता वाटायची, तर कोणाला ताईंमध्ये आपली आई दिसायची व त्या गेल्यावर आई गमावल्याचे दुःख झाले. आश्चर्य म्हणजे, जो भेटेल त्याला प्रेम, स्नेह, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या धाग्यांनी बांधणाऱ्या आमच्या ताई मात्र ह्या मातृसुखाला अवघ्या सव्वा वर्षाच्या वयापासून वंचित होत्या.

ताई म्हणजे रोहिणी खरे. त्यांचा जन्म २९ जुलै १९२७ रोजी करंदीकर परिवारात झाला. करंदीकर कुटुंब त्या काळी एक सुखवस्तू आणि धार्मिक कुटुंब म्हणून ओळखले जात असे. होळकर रियासतीत दिवाण म्हणून काम करणारे विनायकराव करंदीकर त्यांचे वडील. धर्मपरायण आणि परंपरा वादी असलेल्या वडिलांचा स्त्रियांच्या औपचारिक शिक्षणाला विरोध होता, म्हणून ताईंना शालेय शिक्षण न देता, वडीलांच्या दृष्टीने योग्य शिक्षण व धार्मिक संस्कार घरीच दिले गेले. उत्तम धार्मिक पठण आणि स्वयंपाक ही वडिलांनी शिकवला. अवघ्या पंधराव्या महिन्यात मातृवियोग झाल्याने, त्यांना त्याच्या आजीने (आईची आई) आणि वडिलांनी वाढवले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर ह्या दोन्ही व्यक्तींचा खूप मोठा प्रभाव होता. मात्र शालेय शिक्षण न घेता आल्याची बोच व शिक्षणाविषयीची तीव्र ओढ त्यांना नेहमी वाटत राहायची.

वयाचा सोळाव्या वर्षी त्यांचा विवाह विख्यात वेदसंपन्न विद्वान गणेश दीक्षित-खरे ह्यांचे नातू वसंत नारायण खरे ह्यांच्याशी झाला. काशीपासून रामेश्वरपर्यंत ख्याती असलेल्या गणेशजींच्या अनेक आख्यायिका लहानपणापासून ऐकत असल्यामुळे त्यांची नातसून होण्याने त्यांना खूप समाधान वाटले. परंतु विवाहानंतरची परिस्थिती विषम होती. सासूबाईंचे निधन लग्नाआधीच झालेले, अत्यंत गरिबी, तापट सासरे व त्यांच्या पतींहून लहान असलेले चार दीर. त्यांना आधार होता तो पतीच्या सहकार्याचा, वडिलांच्या खात्रीचा आणि आजेसासऱ्यांच्या कीर्तीचा. वडिलांनी लग्नात आशीर्वाद दिला होता की घरात असलेला हुशारीचा वारसा, आजीचे संस्कार आणि मेहनत परिस्थितीवर नक्की मात करतील.

विवाहानंतर फक्त पतीच्या मिळकतीवर परिवाराचा खर्च चालत असे. तेव्हा आपले दैनंदिन घरकाम आटोपून ताईंनी शिवण, टिपण आणि अन्य कामे करून परिवाराला आर्थिक हातभारही लावला. ह्याकरता ताईंना दिवसाकाठी अक्षरशः सोळा ते अठरा तास काम करावे लागले, तेही सासऱ्यांची मर्जी सांभाळत आणि दिरा-मुलांना वाढवत. औपचारिक शिक्षणाविषयीच्या तीव्र मानसिक

ओढीमुळे त्यांनी चारही दिरांना उच्चशिक्षित व्हायची प्रेरणा दिली व त्यांना समाजात यथायोग्य स्थान मिळवून दिले. दरम्यानच्या काळात त्यांना चार पुत्र आणि एक पुत्री लाभली. त्यांचे पती सुधारवादी असल्याने त्यांनी आपल्या पत्नीला नेहमी बरोबरीचा दर्जा दिला आणि तिची शिक्षणाविषयीची ओढ जाणून घेऊन, तिला इंग्रजी लिहायला आणि वाचायला शिकवले.

हिंदी परीक्षेला बसण्यासाठीही त्यांनी ताईंना प्रोत्साहन आणि सक्रिय पाठिंबा दिला. पुढे ताईंनी मोठ्या मुलाबरोबर मॅट्रिक आणि हिंदीच्या विशारद व साहित्यरत्न या परीक्षा उत्तीर्ण केल्या.


**रोहिणीताई खरे**

आपल्या व्यग्र जीवनातून वेळ काढून, रोज सार्वजनिक वाचनालयात जाऊन ताईंनी स्वतःचा विद्याव्यासंग ही वाढवला. विषम परिस्थितीवर मात करण्यात त्यांना दोन गोष्टींची खूप मदत झाली. एक म्हणजे, प्रबळ आत्मविश्वासासह तीव्र इच्छाशक्ती आणि त्यांच्यात दडलेला कलाकार. गायन आणि काव्य ह्या त्यांच्या आवडत्या विधा. ताईंच्या कविता त्याच्याप्रमाणेच निर्मळ, गंभीर आणि भावनेने ओतप्रोत आहेत. त्यांचे तीन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची स्वयंपाक करतांना खुल्या व भावपूर्ण आवाजात म्हटलेली तालबद्ध सुरेल गाणी आजही परिवाराच्या स्मृतीत आहेत. मोठमोठ्या मराठी, हिंदी व इंग्रजी कविता त्यांना पाठ होत्या, अगदी वयाच्या ९३व्या वर्षापर्यंत.

पुढे दीर मार्गाला लागल्यावर ताईंच्या मुलांची शिक्षणे सुरू झाली. त्यांची आणि त्यांच्या पतीची मुलांना सक्त ताकीद होती की फ्रीशिपसाठी नव्हे तर शिष्यवृत्तीसाठी प्रयत्न करा व ती मिळवाच. त्यांच्या मुला-मुलींनीही आपापल्या विषयात पदव्युत्तर परीक्षा प्रथम स्थान टिकवून पार केल्या.

हे सारे सुरू असताना, त्यांची सामाजिक बांधिलकीची जाण तीव्र होती. कृष्णपुरा भगिनी समाजाच्या माध्यमाने ६० आणि ७० च्या दशकांत होम नर्सिंग, फर्स्टएड ट्रेनिंग, संततीनियमनाचा प्रचार, शाळेतील मुलांना सकस पौष्टिक नाश्त्याची पाकिटे मूळ किमतीत पुरवणे इत्यादी कामेही त्या करायच्या. सौरभ बालमंडळ ह्या लहान मुलांच्या संस्थेची स्थापनाही त्यांनी केली.

ताई सदैव हसतमुख असायच्या आणि त्यांच्या घरी सगळ्यांचे मनापासून स्वागत होत असे. पण पुढे परिवाराच्या आनंदाला जणु गाल बोटच लागले. १९७१ मध्ये पीएच.डी. करत असताना त्यांचा पुत्र विश्वास ह्याचा अपघाती मृत्यू आणि बहुधा ह्या धक्क्याने हादरलेल्या पतीचा १९७६ मध्ये ५१ व्या वर्षी मृत्यू, ह्या दोन घटना जन्मभर ताईंच्या मनात सलत राहिल्या.

परंतु ह्या मानसिक आघातांना मनाच्या आतल्या कप्प्यात दडवून, जबाबदारीचे वर्तुळ आक्रसण्याऐवजी त्यांनी ते आणखी वाढवले. साधारणपणे परिस्थितीचे तडाखे खाणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव एकांगी होऊन व्यवहारात कटुता येते, पण ताईंचे असे कधीच झाले नाही. त्यांच्यातील अंगभूत सुसंस्कृतता, सभ्यता, विवेक आणि प्रेमाचा झरा हे कायम राहिले. आप्तस्वकीय सल्ला घेण्यासाठी त्यांच्याकडे येत असत. प्रत्येक भेटणाऱ्या व्यक्तीशी संवाद साधण्याची कला त्यांना अवगत असल्याने, त्यांच्या अनेक प्रशंसकांमध्ये विश्वविद्यालयाचे कुलपती, प्रसिद्ध डॉक्टर, प्रोफेसर, लेखक समाजकर्मी, राजकारणी, वार्ताहर वगैरे आहेत.

कवितांच्या पुस्तकांव्यतिरिक्त, असंख्य कविता, फूटबॉलपटू पेले, नोबल पारितोषिकविजेते शात्रज्ञ सी.व्ही. रमन, रवींद्रनाथ टागोर इत्यादींवर उत्कृष्ट लेख त्यांच्या साहित्यिक उंचीची ग्वाही देतात. त्यांच्या मोठ्या सुनेला १९८० मध्ये शोधकार्यासाठी वर्षभर जर्मनीला जाण्याची संधी मिळाली, तेव्हा तीन महिन्यांच्या नातवाची काळजी घेण्यासाठी ताई तिच्याबरोबर जर्मनीला गेल्या. असे करणे त्यांच्यासाठी अजिबात सोपे नव्हते. इथल्या सर्व जबाबदाऱ्या सोडून एका अनोळखी, तेथील भाषादेखील न समजणाऱ्या, थंड प्रदेशात जाऊन इतके दिवस राहणे कठीणच होते. परंतु सुनेच्या प्रगतीसाठी त्यांनी ते स्वीकारले. तिथे त्यांनी इंग्रजी पुस्तके वाचण्यास सुरुवात केली व तेथील स्त्रियांशी मैत्रीही केली. जर्मन समाजाविषयी त्यांनी केलेला अभ्यास गद्य आणि पद्य स्वरूपात लिहिला.


लहान मुलांना हाताळण्यात तर त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या नातवंडांवरही त्यांनी उत्तम संस्कार केले. हसतखेळत व योग्य ठिकाणी रागावत नातवंडांना छान शिस्त लावली. आठही नातवंडांशी त्यांचे विशिष्ट भावबंध जुळले होते आणि प्रत्येक जण ह्याची मनःपूर्वक जाण ठेवून आहे.

ताईंचे सर्वात आकृष्ट करणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या आवाजातून व स्पर्शातून जाणवणारे प्रेम हे होय. त्यांच्याशी बोलणारा मंत्रमुग्ध होऊन त्यांच्या जवळ आपले मन मोकळे करत असे. अशा व्यक्ती खूपच दुर्मिळ असतात. त्यांचे सान्निध्य आमच्या नशिबात होते हे आमचे अहोभाग्य होय!

**– पुष्पा खरे**

भ्रमणध्वनी : +९१ ९६३७३६७६६७

pushpakhare@gmail.com




# व्हिज्युअल आर्ट ऑफ महाराष्ट्र- महाराष्ट्राच्या कलापरंपरेचा इंग्रजीतील पहिला महत्त्वाचा ज्ञानकोश

**दीपक घारे**

**२०१३** मध्ये हिंदुस्थान प्रकाशन संस्थेतर्फे दृश्यकला खंड प्रकाशित झाला त्यावेळेस अशा प्रकारचा ग्रंथ इंग्रजीत प्रकाशित व्हावा अशी सर्वांचीच इच्छा होती. प्रकाशन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या दादिबा पंडोल ह्यांनी जाहीरपणे इंग्रजी प्रकाशनास साहाय्य करण्याची तयारी दर्शवली. पुढे वर्षभरात पंडोल आर्ट गॅलरी आणि दृश्यकला खंडाच्या संपादकांनी या प्रकल्पाला मूर्त स्वरूप दिलं आणि कामाला सुरुवात झाली. आज सहा वर्षांच्या अथक परिश्रमानंतर इंग्रजी कोश प्रकाशित होत आहे.

'Encyclopaedia : Visual Art of Maharashtra : Artists of the Bombay School and Art Institutions (Late 18th Century to Early 21st Century)' असं या कोशाचं नाव असून सुहास बहुळकर व दीपक घारे प्रमुख संपादक आणि सुधीर पटवर्धन व दिलीप रानडे हे या कोशाचे असोसिएट एडिटर आहेत. कोशातील चरित्रात्मक नोंदीचं भाषांतर करण्याचं काम दृश्यकला क्षेत्राशी संबंधित अनुवादकांनीच केलेलं आहे. प्रत्येक नोंदींमध्ये योग्य त्या तपशिलांची भर घालून संपादकांनी त्या परिपूर्ण केलेल्या आहेत. त्याशिवाय सत्तावीस नव्या नोंदींचा समावेश इंग्रजी कोशात केलेला आहे. अभिजात कला आणि उपयोजित कला अशा दोन विभागांमध्ये मिळून चित्रकार, शिल्पकार, उपयोजित चित्रकार अशा एकूण ३०७ नोंदी आहेत. या नोंदी आणि सोबतच्या चित्रांमधून दोनशे वर्षांचा महाराष्ट्राचा कलाइतिहास उलगडत जातो.

**प्रस्तावना**

सुरुवातीची ७६ पानांची प्रस्तावना कोशाचं वैशिष्ट्य ठरावं. प्रागैतिहासिक काळापासून आधुनिक काळापर्यंत महाराष्ट्रात विविध कलाप्रवाहांचं अभिसरण झालं आणि नागरकला व लोककलांचा विकास झाला. त्याचे पडसाद आजच्या आधुनिक दृश्यकलेतही उमटले. त्याचा आलेख प्रस्तावनेत आलेला आहे.

**रंगीत चित्रांचा विभाग**

१३२ पानांच्या रंगीत विभागात चित्रकार, शिल्पकारांच्या कलाकृती देण्यात आलेल्या आहेत. चित्रकारांच्या जन्मतारखेनुसार चित्रांची मांडणी केल्यामुळे कालक्रमानुसार कलानिर्मितीत होत गेलेले बदल इथे लक्षात येतात.

**कलासंस्था**

महाराष्ट्राच्या कलाविषयक जडणघडणीत कलासंस्थांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, बॉम्बे आर्ट सोसायटी, आर्ट सोसायटी ऑफ इंडिया व आर्टिस्ट्स सेंटर या चार संस्थांचा इतिहास यात समाविष्ट केला आहे.

या व्यतिरिक्त ‘रेलिक्स ऑफ द पास्ट’, ‘ग्लॉसरी’ अशा अनेक पानपूरकांचा आणि परिशिष्टांचा समावेश कोशात केलेला आहे.


एकूण ९६० पृष्ठांचा हा एनसायक्लोपिडिया महाराष्ट्राच्या आणि भारतीय कलेच्या संदर्भात चित्रकार, कलाअभ्यासक आणि कलारसिक अशा सर्वांसाठीच अत्यंत महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे.

पंडोल आर्ट गॅलरीतर्फे प्रकाशित होणाऱ्या या कोशाची किंमत ४००० रुपये आहे. नाशिकच्या साहित्य संमेलनात ग्रंथालीच्या स्टॉलवर तो सवलतीच्या किमतीत, ३,००० रुपयांत उपलब्ध असेल.

**– दीपक घारे**
भ्रमणध्वनी : +९१ ९१६७७६४३२८
gharedeepak@rediffmail.com

ग्रंथाली

## नवी प्रकाशने




### वादळवाट

एम.डी. देशमुख


**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

हे पुस्तक तुमचं कमी आणि तुमच्या काळाचं आत्मकथन जास्त आहे. निसर्ग, माणसं, गाव, काळ तुम्ही हुबेहूब रेखाटला आहे. त्यामुळं ही कहाणी तुमची एकट्याची न राहता एका काळाची कहाणी झालेली आहे. त्यामुळं या पुस्तकाला एक सामाजिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेलं आहे. तुम्ही जगला त्या काळाची ही एक बखर आहे.

**– इंद्रजित भालेराव**

### एकला चलो रे!


बी.जी. वाघ




**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**

‘एकला चलो रे’ हे त्यांचे पुस्तक म्हणजे त्यांनी जीवनभर घेतलेले अनुभव आणि मानव व निसर्ग यांच्या परस्परसंबंधातील केलेले चिंतन यांची अभिव्यक्ती आहे. व्यासंगाच्या अनेक खुणा ‘एकला चलो रे’ या पुस्तकात दिसतात.

**– रावसाहेब कसबे**




### आत्मभान


गो. श्री. पंतबाळेकुंद्री

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

मुंबई शहर, महाराष्ट्र शासन आणि सरकारी यंत्रणा यांचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे छोटेखानी पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल. निवृत्तीनंतर दत्तभक्तीत रममाण झालेले लेखक महाशय मराठी कणा कसा ताठ असतो याचे मूर्तरूप उदाहरण आहेत. शासन आणि प्रशासन यांचे नेतृत्त्व करणारे आपल्या देशात अपवादानेच लिखाण करतात. त्या पार्श्वभूमीवर या पुस्तकाचे स्वागत होईल असा विश्वास आहे.

### सहा दशकांची पत्रकारिता

वसंत वासुदेव देशपांडे




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाली आहेत. हा बहुतेक काळ वसंत वासुदेव देशपांडे यांनी एक पत्रकार म्हणून अनुभवला आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, कोयनेचा भूकंप, आणीबाणी, इंदिरा गांधी यांची हत्या, हिंदुत्वाचा राजकारणात उदय, किल्लारी–सास्तुरचा भूकंप, शिवसेनेतील दुफळी, शिवसेना–भाजपचे युती शासन, हर्षद मेहता प्रकरण आणि अशा विविध प्रमुख घडामोडींचा नेमक्या शब्दात आढावा देशपांडे यांनी घेतला आहे.

वृत्तांत

# ‘कॉर्पोरेट कविता’चे प्रकाशन



श्रीधर अंभोरे, दासू वैद्य, स्वानंद बेदरकर, प्रथमेश पाठक आणि तेजस्विनी पाठक

‘कॉर्पोरेट कविता’ या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ ‘ग्रंथाली’तर्फे नुकताच नाशिकमधील कुसुमाग्रज स्मारक येथे संपन्न झाला. प्रख्यात कवी, गीतकार दासू वैद्य यांच्या हस्ते, प्रमुख वक्ते, संपादक स्वानंद बेदरकर आणि ज्येष्ठ चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या उपस्थितीत हा हृद्य सोहळा पार पडला.


स्वानंद बेदरकर आपल्या भाषणात म्हणाले, कॉर्पोरेट कविता हा संग्रह म्हणजे परंपरा आणि आधुनिकता या दोन टोकांचे हस्तांदोलन आहे. या संग्रहात आपल्याला महानगरीय जीवनाचे संदर्भ आढळतात. त्या अनुषंगाने अनेक इंग्रजी शब्द वाचायला मिळतात. परंतु ते कुठेही रसभंग न करता कवितेला अधिक अर्थवाही करतात. त्या इंग्रजी शब्दांची अपरिहार्यता वाचकाला जाणवत राहते हे कवितेचे ठळक वैशिष्ट्य आहे. आश्वासकता आणि सहजता ही बलस्थाने घेऊन कवी लिहिता झाला आहे. ओढूनताणून आणलेली भावव्याकुळता यात अजिबात आढळत नाही, तरल संवेदना जशीच्या तशी अनुभवाच्या पातळीवर शब्दांकित करण्यात कवी यशस्वी ठरला आहे.

तर आपल्या भाषणात प्रख्यात कवी, गीतकार दासू वैद्य यांनी, कवीची भूमिका मांडण्याचा सुरेख आविष्कार केला. ते म्हणाले, जशी मुलगी नांदायला निघाल्यानंतर वधुपित्याची घालमेल व्हावी तशीच आपला पहिला संग्रह वाचकांच्या भेटीला देताना कवीची होत असते. ते पुढे म्हणाले की, प्रथमेशच्या कुटुंबातच शब्दांचे पूजन करण्याची परंपरा आहे जी त्याने खंडित होऊ दिलेली नाही. ज्या पद्धतीचे लेखन तो करतो आहे त्यासाठी तरल द्रवरूप मानसिकता असावी लागते, कवीला कधी जोखीम पत्करावी लागते तर कधी भाबडे व्हावे लागते. अशा विचारांच्या घुसळणीतूनच श्रेष्ठ कविता निर्माण होत असते. घुसळणीच्या परंपरेतील कवी हा महत्त्वाचा घटक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. नवकवी किंवा युवा कवी म्हणून प्रथमेश हा निश्चितच आपणास अश्वस्त करतो. हे पुस्तक अंतिम नाही याची त्यालाही जाणीव आहे असेही ते म्हणाले.

ज्येष्ठ कवी श्रीधर अंभोरे यांनी कुटुंबातील ज्येष्ठ पितृतुल्य व्यक्ती म्हणून प्रथमेशचा लहानपणापासून आज एक आश्वासक कवी हा प्रवास कथन केला. जवळच्या मित्राचा मुलगा म्हणून नाही तर एक तटस्थ व्यक्ती म्हणून परखडपणे या कवितांकडे कायम पाहत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्याचे निवेदन डॉ. स्नेहा रत्नपारखी यांनी केले. प्रास्ताविक हर्ष जोशी यांनी केले तर आभार प्रेषिता पंडित यांनी मानले. तसेच, ‘ग्रंथाली वॉच’ या फेसबुक पेजवर समारंभाचे थेट प्रक्षेपण झाले.


॥ग्रंथाली॥




कॉर्पोरेट कविता

प्रथमेश किशोर पाठक

मूल्य १५० रु.

सवलतीत ९० रु.

# ‘चित्रकार आनंद देवधर याच्या आठवणीतल्या शिल्पाकृती’ या पुस्तकाचे आणि ‘आनंदतरंग’ ह्या कवितासंग्रहाचे प्रकाशन



**प्रकाशनसमयी अस्मिता पांडे, सन्मित्रचे अध्यक्ष सुहास तेरवाडकर, शिल्पकार आनंद देवधर, दिनकर गांगल, मुकुंद संगोराम, कवयित्री जयश्री हरी जोशी**

‘प्रसिद्ध शिल्पकार आनंद देवधर यांच्या आठवणीतल्या शिल्पाकृती’ ह्या पुस्तकाच्या लोकार्पणाचा सोहळा, सन्मित्र ललित कला या संस्थेच्या पुढाकाराने शनिवार, १३ फेब्रुवारी २०२१ च्या संध्याकाळी पेण येथे आयोजला होता. दिनकर गांगल, मुकुंद संगोराम, अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे आणि कवयित्री जयश्री हरी जोशी यांची व्यासपीठावरील उपस्थिती सुखावणारी होती. पेणच्या सध्याच्या गणेशमूर्ती व्यवसायाचे जनक कै. राजाभाऊ देवधर हे आनंदजींचे पिताजी होते.

अस्मिता पांडे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी नेटकी सांभाळली. सुरुवातीलाच सन्मित्रचे अध्यक्ष सुहास तेरवाडकर यांनी हा कार्यक्रम त्यांच्या संस्थेने प्रायोजित करण्यामागची संस्थेची भूमिका मोजक्या शब्दांत उलगडून सांगितली. २०१३ साली देवधर कला दालनाचे उद्घाटन करताना संगोरामजींचे वक्तृत्वशैली आणि कलेसंबंधी मननीय विचार यांचा ठसा श्रोत्यांच्या मनावर उमटलेला होता. या समारंभातील भाषणाने तो अधिकच गडद झाला.

मित्राच्या आनंदात सहभागी होण्यासाठी आलेल्या कविवर्य अशोक नायगावकर आणि अरुण म्हात्रे श्रोत्यांत उपस्थित होते. अचानक अस्मिता यांनी त्यांना रंगमंचावर पाचारण केले. दोघांनी मैफिलीत जान भरली. योग्य दिशेने प्रयत्न झाले तर ‘देवधर कलादालन’ हे जागतिक दर्जाचे एक छान पर्यटनस्थळ होऊ शकते असे अशोकजींनी नमूद केले. तर अरुण म्हात्रे यांनी खुसखुशीत भाषण करून मजा आणली. आपल्या भाषणाचा शेवट त्यांनी कविश्रेष्ठ सुरेश भट यांची ‘देखावे बघण्याचे वय निघून गेले’ ही कविता गाऊन केला.

या कार्यक्रमात एक सरप्राइझ एलिमेंट होता, ‘आनंदतरंग’ ह्या आनंदजींच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन!

पाच भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय लेखकांच्या व कवींच्या बरोबर संवाद साधणाऱ्या जयश्री हरी जोशी या ज्येष्ठ कवयित्रीच्या हस्ते ‘आनंदतरंग’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. आपल्या छोटेखानी भाषणात ‘कविता’ या विषयावर जयश्रीजींनी आपले विचार प्रभावीपणे मांडले.

शेवटचे भाषण झाले दिनकर गांगल यांचे. या पुस्तकातील अनेक सौंदर्यस्थळे त्यांनी उमलून सांगितली. या पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर होऊन हे पुस्तक जगभर गेले पाहिजे. जेणेकरून महाराष्ट्राची ही अनोखी कला जगात सगळीकडे पोचेल हे त्यांनी अधोरेखित केले.

उत्तरार्धात आनंदजी यांना बोलते केले अस्मिता यांनी. आपले कुटुंब, वडील, संस्कार, स्नेही, अनुभव अशा अनेक विषयांवर आनंदजी अगदी मनमोकळे बोलले. ह्या हृद्य गप्पा रसिकांना भिडल्या.

**धनंजय गांगल ९८२१०३२८३०**
**विनायक गोखले ९४२३५८१३७५**


ग्रंथाली




**ठोंब्या, टकलू अंकल**
**आणि इतर कथा**
**आबा गोविंद महाजन**
**मूल्य ३० रु.**
**सवलतीत २० रु.**

## ग्रंथालीच्या नवीन 'साहित्य-आस्वाद' डिजिटल कार्यक्रमाचा आरंभ चंद्रशेखर सानेकर यांच्या गझल सादरीकरणाने




**प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूकर, अदिती आणि राजीव श्रीखंडे, गझलकार चंद्रशेखर सानेकर, धनंजय गांगल आणि अस्मिता पांडे**

प्रसिद्ध शायर मिर्झा गालिब यांच्या स्मृतिदिनी, १५ फेब्रुवारी २०२१ रोजी, गझलकार चंद्रशेखर सानेकर यांच्या 'माझ्या दृष्टांताची दृश्ये' व 'गझलेच्या उजेडात गझल' या दोन पुस्तकांचे प्रकाशन राजीव श्रीखंडे यांच्या हस्ते झाले. त्याचा समारंभ स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहाच्या ध्वनिमुद्रण कक्षात मोजक्या दहा जणांच्या उपस्थितीत ध्वनिमुद्रित झाला. यावेळी सुदेश हिंगलासपूरकर आणि धनंजय गांगल या विश्वस्तांनी 'ग्रंथाली'ची कार्यक्रमामागची भूमिका व या पुस्तकांबाबत प्रास्ताविक केले. राजीव श्रीखंडे यांनी सानेकरांच्या या दोन्ही पुस्तकांचे नेटके आणि मर्मग्राही विवेचन केले. अस्मिता पांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रचालन केले. हा कार्यक्रम ग्रंथालीच्या Granthali Watch यूट्यूब चॅनेलवर प्रसारित करण्यात आला. पाऊण तासाच्या या कार्यक्रमात प्रकाशनानंतर अर्धा तास सानेकर यांनी नवप्रकाशित पुस्तकांबद्दल थोडक्यात मनोगत मांडले आणि पुढील जवळपास अर्धा तास गझल सादर केल्या. 'ग्रंथाली' दर महिन्याला एका साहित्यिकाचा 'साहित्य-आस्वाद' हा डिजिटल कार्यक्रमही करणार आहे. यातून त्या त्या लेखकाच्या सादरीकरणातून त्याच्या साहित्याचा आस्वाद घेता येईल. वाचकांनी ग्रंथालीच्या Granthali Watch या यूट्यूब चॅनेलवर हा कार्यक्रम पाहावा आणि चॅनेलला सबस्क्राइबही करावे, म्हणजे 'ग्रंथाली'ला डिजिटल व्यासपीठ म्हणून उभं राहताना आपण दिलेल्या पाठिंब्याचे बळ मिळेल.

---


## प्रत्येक तरुणाने अभ्यासावे असं पुस्तक -विश्वास ठाकूर



**अनिलभाई पटेल**



**विश्वास ठाकूर**



**संतोष हुदलीकर**




**डॉ. मृण्मयी भजक**



**शुभांगी पाटील**



**संजय चौधरी**



**वसंत खैरनार**

मराठी भाषादिनाचे औचित्य साधून 'पिठाई ते पिकवे' या शुभांगी पाटील लिखित पुस्तकाचे डिजिटल प्रकाशन ग्रंथाली आणि ज्योती स्टोअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी रोजी करण्यात आले.

विश्वास बँकेचे संस्थापक, अध्यक्ष विश्वास ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यावेळी ते म्हणाले, पुस्तक उत्कृष्ट आहे. प्रत्येक तरुणाने आवर्जूनअभ्यासावे असं हे पुस्तक आहे.

मूळ गुजरातमधील पिठाई नावाच्या गावातले अनिलभाई पटेल दक्षिण आफ्रिकेतील पिकवे नावाच्या गावी येतात, स्थायिक होतात. आज ते मोठे उद्योजक आहेत. त्यांचा हा प्रवास लेखिकेने ओघवत्या भाषेत मांडला आहे, असं लेखक, कवी संतोष हुदलीकर म्हणाले.

हे पुस्तक सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल, माझ्यासाठी ही प्रेरणा देणारं आहे, असं मत ख्यातनाम कवी संजय चौधरी यांनी व्यक्त केलं.

अनिलभाई पटेल यांनीही आपल्या मनोगतात पुस्तकाचा प्रवास सांगितला, आणि पुस्तक लिहिल्याबद्दल लेखिकेचे आभार मानले.

लेखिका शुभांगी पाटील म्हणाल्या, की किडनी ट्रान्सप्लांट झाल्यानंतरही अनिलभाई ज्या ऊर्जेने काम करत होते, त्यावर त्यांना लेख लिहायचा होता, पण जसजसं त्या लिहू लागल्या, त्यांना विषयाची व्याप्ती समजली आणि पुस्तक लिहिण्याचा निर्णय त्यांनी घेतला. 'ग्रंथाली'तर्फे सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केलं. ज्योती स्टोअर्सतर्फे वसंत खैरनार यांनी स्वागतपर मनोगत केलं. डॉ. मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केलं. धनश्री धारप कार्यक्रमाच्या आयोजक होत्या. तांत्रिक बाजू राजू कदम यांनी सांभाळली.

# 'प्रभु अजि गमला' पुस्तकाचे प्रकाशन





**प्रकाशसमयी वीणा सामंत, लेखिका डॉ. स्मिता निखिल दातार, डॉ. मोनिका ठक्कर, राजश्री आणि रामदास प्रभुगावकर, डॉ. पी.एस. रामाणी, अशोक पत्की आणि सुदेश हिंगलासपूरकर**

दिनांक २७ फेब्रुवारी, मराठी भाषादिनी डॉ. स्मिता दातार लिखित, ग्रंथाली प्रकाशन प्रकाशित 'प्रभु अजि गमला' या चरित्राचे प्रकाशन झाले. प्रख्यात न्यूरोसर्जन, गोमंतभूषण डॉ. पी.एस. रामणी, साहित्यातले सव्यसाची पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, संगीतकार अशोक पत्की यांच्या शुभहस्ते प्रकाशनसोहळा संपन्न झाला. 'कवी, चित्रकार, लेखक, गुलाब संशोधक, उद्यान कलावंत, लोकसाहित्याचे अभ्यासक, गोवा मुक्तिसंग्रामातले स्वातंत्र्यसैनिक रामदास प्रभुगावकर यांचे हे चरित्र अनेकांना प्रेरणादायी ठरेल.' असे उद्‌गार पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी काढले. 'हाती जे काम घेईन ते सर्वोत्कृष्ट करणाऱ्या श्री. प्रभुगावकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू या चरित्रात आपल्याला दिसतात,' असे डॉ. रामणी म्हणाले. या प्रसंगी श्री. प्रभुगावकर यांनी लिहिलेल्या, डॉ. मोनिका ठक्कर यांनी संपादित केलेल्या, अक्षरबंध प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'धालो ते धूलपद – गोमंतकीय लोकसंपदा' या अभ्यासपूर्ण संशोधनपर पुस्तकाचे आणि श्री. प्रभुगावकर यांनी लिहिलेल्या व वीणा सामंत यांनी संकलित व प्रकाशित केलेल्या 'अबोली' या काव्यसंग्रहाचेही प्रकाशन झाले. 'श्री. प्रभुगावकरांनी लिहिलेल्या सुंदर कवितांची आता गाणी होत आहेत,' अशा शब्दात संगीतकार अशोक पत्की यांनी या कवितांचे कौतुक केले. या प्रसंगी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि संपादक अरुण जोशी उपस्थित होते. 'प्रभु अजि गमला' या चरित्रातील काही अंशाचे अभिवाचन लेखिका डॉ. स्मिता दातार यांनी केले. श्री. गुरुदत्त लाड यांनी 'अबोली'तील कवितांचे वाचन केले. गायिका मोना कामत प्रभुगावकर यांनी 'अबोली'तील कवितेचे झालेले गाणे गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले. या एका देखण्या आणि हृद्य सोहळ्याचा आनंद प्रेक्षकांनी प्रत्यक्ष आणि डिजिटल माध्यमातून घेतला.

# नवी प्रकाशने





**'आत्मभान' – गो. श्री. पंतबाळेकुंद्री आणि 'सहा दशकांची पत्रकारिता' – वसंत देशपांडे**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या**

**अनुपमा निरंजन उजगरे**




**लोप पावत चाललेल्या लोकसाहित्याचे अक्षररूप**

खेळू नको भातुकली झुळू नको झोका बाई
खेळाखेळातला कसा तुला सांगू धोका बाई

'ओवी' हा एक साधासरळ साहित्यप्रकार, दोन ओळींत सगळा आशयाचा आवाका सावरून धरलेला. अभंग, गझलेचा शेर, पद, रुबाया यांच्या पंक्तीला वसलेला. तरीही स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व जपलेला. भक्तिमार्गातला जवळचा, जिव्हाळ्याचा आणि थेट देवाशी संवाद साधण्याचा सहजसोपा मार्ग. 'पाळणा' याच्याशी सलगी सांगणारा हा साहित्यप्रकार आपला सांस्कृतिक ठेवा आहे. तो अनेक तऱ्हेने व्यक्त झालेला दिसून येतो.

उषेची प्रभा अवतरण्यापूर्वी, पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होण्याआधी जात्याच्या घरघर संगीतावर घरातली माऊली स्वत:शीच एकटीच संवाद साधायची.

पहिली माझी ओवी नाही गाण्याचा आळस
तारक येशू ख्रिस्त माझ्या जिण्याचा कळस

या ओव्यांमध्ये देव येतो. दिवसभराचा दिनक्रम येतो. आई, वडील, बहीण, भाऊ या माहेरच्या माणसांची गुंफण येते. सासू, सासरा, नणंद, जावा, दीर यांचा गोफ उलगडत जातो. शेत, समाज यांची वर्णने येतात.

शेतात ग माझ्या बाच्या भरल्या इहिरी
मोट हाकिती गडी बैल ढवळे खिल्लारी

जात्यावर दळणे ही एकेकाळची अपरिहार्य अशी निकड होती. संपूर्ण कुटुंबासाठी भाकऱ्या थापायच्या तर तेवढे पीठ हवे. त्यासाठी कुटुंबातली सून जात्यापाशी बसायची. दगडाचे नाते, सूप भरून दाणे आणि ती. दळण आणि ओव्यांची सोबत. जात्यातून पीठ पाझरत राहते ओव्यांच्या नादात, असे एकेकाळचे चित्र घराघरात दिसायचे. आज काळ बदलला. परिस्थिती बदलली. जाते गेले, ओव्या गेल्या. एका सांस्कृतिक ठेव्यापासून आज आपण खूप दूर आलो आहोत. लोकजीवन, लोकसाहित्य यातला एक घटक आपल्यातून वेगळा झाला याची कोणाला ना खंत ना खेद! परंतु आजही काही सजग प्रतिभासंपन्न मंडळी, भलेही ती मोजकीच आहेत, आपल्या या ठेव्याला जतन करण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत. त्यांच्यापैकी एक आहेत डॉ. अनुपमा निरंजन उजगरे!

डॉ. उजगरे यांचा खरा परिचय आहे तो एक तरल, संवेदनशील कवयित्री म्हणून. 'सांगी', 'पश्चात' हे त्यांचे दर्जेदार कवितासंग्रह. परंतु याशिवायचा त्यांचा एकूण लेखनप्रवास थक्क करणारा आहे. कथा, वैचारिक लेख, ललित, चिंतन, चरित्र, अनुवाद, संपादने आदींची जवळपास पस्तीस प्रकाशित पुस्तकांची उत्तम साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. अनेक पुरस्कारांनी त्यांच्या या कसदार लेखनाचा गौरव केलेला आहे. 'ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या' हा याच परंपरेतील उत्तम संकलन आणि संपादन असलेला संग्रह आहे.

संशोधन आणि चोखंदळपणाचे दर्शन घडवणारा हा संग्रह विविधतेने नटलेला आहे. 'जात्यावरच्या ओव्या' हा मौखिक वारसा जपणारा साहित्यप्रकार. लिखित स्वरूपात त्याचे अस्तित्व अगदीच नगण्य. आज जात्याला मागे पडून पन्नास वर्षांचा काळ उलटून गेला आहे. ज्या कुणी ओव्या म्हणत त्यांची वानवा असणे तर गृहीतच धरायला हवे. अशा प्रतिकूल परिस्थितीत ही बिकट वाट तुडवत ईप्सितापर्यंत पोहोचणे म्हणजे अग्निदिव्यच म्हणायला हवे. परंतु जिद्द, ध्यास आणि अथक परिश्रम करण्याची तयारी यांच्या जोरावर ही नौका पैलतीरी पोच झाली, यासाठी डॉ. अनुपमा उजगरे यांचे अभिनंदन करायला हवे.

शीर्षकात 'ख्रिस्ती' हा शब्द आला आहे, त्यामुळे दचकून जाण्याचे कारण नाही. ख्रिस्ती धर्मात गेलेला समाज हा याच मातीतला मूळ समाज आहे. धर्म बदलला तरी जीवनरहाटी तीच राहिली आहे. त्यामुळे या ओव्या याच मातीतून उगवलेल्या आहेत, हे ध्यानात घ्यायला हवे. दिनक्रम, दळण, मायलेकरू, मायलेक/बापलेक, जावई, बहीण–भाऊ–भावजय, पती–पत्नी, दीर–जाऊ–नणंद ही नाती धर्म बदलला तरी तीच राहिली आहेत. फरक झाला तो येशू आणि बायबल या दोन शब्दांचा. त्यामुळे हा ठेवा समग्र ओवीसाहित्यापासून वेगळा काढणे कठीण आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर भटकंती करून सिद्ध केलेल्या संग्रहात त्या त्या प्रादेशिक भाषेचे सौंदर्यही त्यांनी उजेडात आणलेले आहे. संपादन, मांडणी, विषयवार वर्गवारी, ही जिकिरीची कामे, परंतु अतिशय निगुतीने ही जबाबदारी त्यांनी पार पाडल्याची कबुली द्यायला हवी, हा संग्रह त्यांच्या या जबाबदारीचा साक्षीदार ठरतो. जवळपास अकराशे ओव्या उपलब्ध झाल्या त्यांची संगतवार नोंद त्यांनी विषयवार दिलेली आहे. अर्थ–टिपा दिलेल्या आहेत. त्यामुळे हा संग्रह संदर्भग्रंथाचे मोल सिद्ध करतो. ''घराघरातून आता जातं जात चाललंय, पण ओव्यांची तरी 'अक्षर' राहाव्यात ह्या इच्छेने जात्याचा खुंटा मी हाती धरला.'' या शब्दांत त्या आपली भूमिका स्पष्ट करतात. त्याचे हे संशोधन आणि संकलन नक्कीच अक्षर राहील असा विश्वास वाटतो.

डॉ. तारा भवाळकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. त्यांनी केलेले कौतुक डॉ. अनुपमा उजगरे आणि या संग्रहाचे स्थान अधोरेखित करणारे आहे.

आशयाला संपन्नतेची जोड देणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १८० रुपये सवलतीत ११० रुपये**



# ग्रंथपान

**माझ्या दृष्टातांची दृश्ये**
**चंद्रशेखर सानेकर**



**एक दवाचा थेंब; त्यात ताऱ्यांचा महाल आहे**

*विलाप कानी पडतो आहे कुठेतरी ढग रडल्याचा*
*कुठेतरी आचके देत चुपचाप मरत असणार झरा!*

'माझ्या दृष्टांताची दृश्ये' हा चंद्रशेखर सानेकर यांचा सहावा गझलसंग्रह. त्याचे शीर्षकच संग्रहाचे सार सांगून जाते. कवी हा द्रष्टा असतो. साक्षात्कार झाल्याशिवाय तो प्रकटत नाही. त्याचे प्रकटणे हे त्याच्या अंतर्यामी साचलेल्या संचिताचे धन असते. हे संचित त्याने कल्पिलेल्या, अनुभवलेल्या अनुभूतीला पारखून, जोखून स्थायी आलेले असते. तेच तो शब्दांतून मांडतो तेव्हा त्याचे रूप लौकिक अर्थाने काव्य असते, परंतु प्रत्यक्षात तो त्याचा परीसस्पर्शित अंतरीचा हुंकार असतो. हा हुंकार क्षितिजाला स्पर्श करून आलेला असतो. मातीच्या गंधाने माखलेला असतो. मनोव्यापाराच्या हेलकाव्यांनी हिंदळकलेला असतो, जगरहाटीच्या वणव्यातून होरपळलेला, तावून-सुलाखून निघालेला असतो. अनंताच्या ठायी असलेल्या ग्रहताऱ्यांसारखा ठिकऱ्या-ठिकऱ्यांतून भिरकावलेला असतो. असे सारे असूनही त्याचा तो अचल, अक्षर स्वर असतो. जसा रापलेला अनुभूतीसंपन्न हुंकार प्रत्येक शेरातून व्यक्त झालेला वाचायला मिळतो तो या गझलसंग्रहातून, ज्याचे नाव आहे, 'माझ्या दृष्टांताची दृश्ये'.

प्रत्येक शेर स्वतंत्र असतो, हे गझलेचे वैशिष्ट्य असते. परंतु ते केवळ तंत्र आहे असे सांगून चालत नाही. त्याचे अस्तित्व दृश्य स्वरूपात प्रत्यक्ष साकारलेले असावे लागते. तो अनुभव हा संग्रह देतो.

*सैतानाचे काम तसे तर देवाचे कौशल्य असे*
*सुऱ्यासारखे मोरपीस तर पिसासारखा सुरा फिरे*

चंद्रशेखर सानेकरांची गझल एक मोठा व्यापक असा अवकाश उभी करते. तिचा आवाका स्वकेंद्रित परिघाला भेदून सर्वसमावेशक अशा विशालपटलाच्या अंत:करणाला हात घालतो, त्याला उलगडून दाखवतो.

*गरिबांच्या डोक्यावर इतक्या दु:खाचे का ओझे*
*हा जो ईश्वर आहे तो कोणाचा हमाल आहे?*

काळ आणि दुनिया ही सतत स्थित्यंतरे दाखवणारे, माणसाला आशेवर ठेवून अचानक चकवा देणारे. तरी प्रत्येकाच्या आयुष्याला व्यापून टाकणारे सजग घटक. हे दोन्ही या संग्रहात अनेक रूपांत आपल्या भेटीला आलेले आहेत. बदल हा त्यांचा स्थायिभाव असल्याने प्रत्येक टप्प्यावर त्याचे अस्तित्व वेगवेगळे भासत राहते. हे भासणे अनुभवाच्या अंगाने असते, परंतु त्याकडे कवी कोणत्या कल्पकतेने पाहतो, हे पाहणे कुतूहलाचे ठरते.

*दुनिया इतकी भरदिवसा झगमगते का?*
*झगमगते तर रात्री काळी पडते का?*
व
*दुनियेची मोडतोड पाहून सवाल त्याला केला तर*
*काळ म्हणाला, 'माझ्यापाशी नवे युगांतर आहे ना!*

शेत, शेतकरी, दुष्काळ हेही विषय गझलेत सामावलेले आहेत. ऊन, वारा, सावली, ऋतुमानाचे बोट धरून आलेले आहेत. गरीब-श्रीमंत, उजेड-अंधार, शासन आणि जनता असे परस्परविरोधी, असमांतर अंतर पार करताना सानेकरांची गझल कधी धारदार होते, वर्मावर घाव घालते, निर्भीडपणे-ठामपणे व्यक्त होते. वास्तवाच्या विस्तवाला राखेपासून मुक्त करू पाहते. ढोंग, लबाडी, फसवणूक, चालढकल याविषयी चीड अस्वस्थ करून जाते तेव्हा सरळ थेट आव्हान देते, तर कधी दवाच्या अंत:करणात ताऱ्यांचा महाल अलवारपणे उभी करते. 'भग्न आस्थेचे तुकडे' या त्यांच्याच कवितासंग्रहाचे स्मरण हा गझलसंग्रह वाचताना होत राहते.

चंद्रशेखर सानेकर हे आजच्या पिढीतले एक उत्तम गझलकार म्हणून ओळखले जातात. 'एका उन्हाची कैफियत', 'एका शहराच्या खुंटीवर', 'नभाशी बोलण्यासाठीच', 'माझ्या काळाचा अनुवाद', 'एक अजब कोलाहल' हे त्यांचे प्रकाशित गझलसंग्रह. प्रसिद्ध गीतकार असा लौकिक असलेल्या सानेकरांच्या गाण्यांच्या पन्नासहून अधिक सीडी व अल्बम प्रकाशित आहेत. उत्कृष्ट गीतकार म्हणून 'झी अल्फा'चे दोन वेळा नामांकन लाभलेले आहे.

गझलतंत्राची उत्तम जाण असलेल्या सानेकरांची गझल उत्तम शब्दकळेने नटलेली आहे. तिची धार लखलखणारी आहे तसा तिच्यातला सहजपणा भावणारा आहे. शाब्दिक करामती करून मंचीय प्रतिसादाचा सोस यापासून ती दूर आहे, म्हणून ती स्वतंत्र आणि खणखणीत आहे. त्यांनी स्वत:च म्हटले आहे,

*आजवरी जे लिहिले ते ते केले एका शिडीसारखे*
*पायतळी ज्ञाताला घेऊन अज्ञाताला बघण्यासाठी*

या गझलसंग्रहाचे शीर्षक 'माझ्या दृष्टांताची दृश्ये' असे असल्याने आतील गझलांना वेगळी शीर्षके नाहीत. एकूण सत्तावन्न गझल आणि संपूर्ण गझल भासावी असे अठरा शेर या संग्रहात आहेत. एक चांगला उमदा गझलसंग्रह वाचल्याचा आनंद हा संग्रह देतो.

चंद्रकांत गणाचार्य यांनी आशयसंपन्न असे मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**



# ग्रंथपान

**पिठाई ते पिटवे**
**शुभांगी पाटील**




**इया इया हाता रळीयामना**

''जीवन असेच असते. लोक आपल्या जीवनात येतात आणि निघून जातात. काहीही आठवण राहते, काहींना आपण विसरूनही जातो. आपणही किती लोकांच्या स्मरणात राहत असणार आणि लक्षात राहिलो तरी चांगल्या कारणासाठी राहिले पाहिजे.''

आयुष्यात यशस्वी होणे, गरिबीतून श्रीमंत होणे, तळागाळात सर्वसामान्यातील दुर्लक्षित एक असण्यापेक्षा पृष्ठभागावर येऊन स्वत:ची ओळख निर्माण करणे, अशी मनीषा कुठल्याही माणसाच्या मनात असणे स्वाभाविक ठरते. परंतु अशा स्वप्नांच्या रथावर स्वार होऊन 'जिंकणारच' अशी जिद्द, ध्यास मनात बाळगून तिला परिश्रम आणि प्रयत्नांचे पंख जोडणे वेगळे असते. असे पंख ल्यालेले मोजकेच असतात आणि त्यांनी त्यांच्या ईप्सिताला गवसणी घातली, असे ठामपणे ज्यांच्याविषयी सांगता येते अशी मंडळीही मोजकीच असतात. अशा मोजक्या यशस्वी मंडळींपैकी एक नाव आहे अनिलभाई पटेल.

अनिलभाई पटेल आफ्रिकेतील बोत्सवाना या देशात जातात. तेथे स्वत:चा उद्योगधंदा उभारतात. एक यशस्वी उद्योजक म्हणून स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करतात. वयाला लाजवेल अशा उत्साहाने, शिस्तीने हाती घेतलेल्या उपक्रमात स्वत:ला झोकून देतात. सततचा ध्यास आणि परिश्रम करण्याची धडाडी, यामुळे नुसत्या उद्योगजगतातच नव्हे तर सामाजिक जीवनातही एक नवा आदर्श निर्माण करतात. अशा एका यशस्वी व्यक्तिमत्त्वाच्या एक नवा आदर्श निर्माण करतात. अशा एका यशस्वी व्यक्तिमत्त्वाच्या जीवन प्रवासाचा आलेख चितारणारे पुस्तक म्हणजे 'पिठाई ते पिकवे.'

अनिलभाई गुजरातमधील पिठाई गावचे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, 'पूर्वज चौदाव्या शतकात खैबरघाटीतून, उत्तरेकडून आले, फक्त दोर आणि लोटा घेऊन. ते पिठाईला स्थिर झाले. जमिनी केलेल्या, शेतीवाडी, घरदार वसवले.'

अनिलभाईंचा सुरुवातीचा काळ याच गुजरातमधला. सिव्हिल इंजिनीयर म्हणून काही काळ वेगवेगळ्या क्षेत्रांत नोकरी केली. परंतु त्यापेक्षा काही वेगळे करायचे हा ध्यास. त्यासाठी नोकरी सोडून आफ्रिकेला प्रयाण केले. ही भरारी त्यांच्या यशस्वी जीवनाला कलाटणी देणारी ठरली. येथे त्यांचा प्रवास नोकरी, उद्योगात भागीदारी आणि पुढे स्वत:चा उद्योग, अशा चढत्या क्रमाने झाला. लायन्स क्लबचे गव्हर्नरपद चालून आले. त्यातून जागतिक शांततेचा संदेश देत अनेक उपक्रमांद्वारे समाजाभिमुख राहण्याची संधी त्यांना मिळाली.

अनिलभाईंचा हा जीवनप्रवास शुभांगी पाटील यांनी 'पिठाई ते पिकवे' या चरित्रग्रंथात शब्दबद्ध केलेला आहे. दुसऱ्याचे चरित्रलेखन करणे ही खरे तर तारेवरची कसरत असते. कुटुंब, संस्कार, संस्कृती, चालीरीती, वैयक्तिक स्वभाव, परस्परांशी असलेली नाती आणि त्यांच्याकडे भावबंध, अशा अनेक पातळ्यांवर व्यवधान ठेवून, कुठे तोल बिघडणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्याचबरोबर साहित्यमूल्यांचीही जपणूक करण्याचे भान राखावे लागते. सरळधोप अशी घटनांची मालिका जुळवून कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मिळवणे सोपे असते. परंतु तसे करणे म्हणजे स्वत:चा प्राण हरवल्याचाच अनुभव पदरी येतो. हे सारे मात्र लेखिकेने कसोशीने समोर ठेवून लेखन केलेले आहे. त्यासाठी केलेल्या प्रयत्नांची आणि स्वीकारलेल्या लेखनतंत्राची खास नोंद घ्यायला हवी. 'फ्लॅशबॅक' या तंत्राचा उपयोग करून कथानकाला नेमकेपण तर मिळालेच परंतु त्याच्यासोबत सुंदर अशी गुंफण करण्याचा प्रयत्न दाद द्यावा इतका यशस्वी झाला आहे. अनिलभाई किडणी आजाराच्या उपचारासाठी दवाखान्यात आहेत हा केंद्रबिंदू. इथेच अनिलभाई आणखी एका लहान अनिलशी जोडले जातात, 'एक झाड आणि दोन पक्षी' याप्रमाणे. लहान अनिल ते दवाखान्यात असलेले यशस्वी अनिलभाई असा प्रवास व्हाया कुटुंबाचा इतिहास. त्यातल्या मोटाबा, दादा ते सर्व आप्त, त्यांची प्रत्येकाची वैशिष्ट्ये; इथे अतिशय कौशल्याने दाखवले आहे. लेखिकेचे हे कौशल्य केवळ तंत्रापुरते मर्यादित नाही, त्यांची साहित्यिक जाण आणि त्यांच्याकडे असलेली प्रतिमा, यांचाही सुंदर आविष्कार इथे अनुभवास येतो. त्यांची ओघवती आणि सहज लेखन तरलता सुखावून जाते. मनोविश्लेषण करताना काही ओळी त्या सहजपणे लिहून जातात, जिथे आपण हरखून जातो. 'स्त्रीचे पूर्ण आयुष्य सासरी गेले तरी माहेराची माया काही संपत नाही.' 'लग्न करून सासरी गेलेल्या मुली अंगणात चिवचिवाट करणाऱ्या चिमण्यासारख्या असतात. योग्य वेळासाठी येतात आणि भुर्रकन उडून जातात. पण त्या थोड्याशा वेळातपण आपल्या किलबिलाटाने आईवडिलांचे मन आनंदित करतात.'


सदरचे लेखन हा लेखिकेचा पहिलाच प्रयत्न असल्याचा त्या मनोगतात नमूद करतात. हा प्रयत्न यशस्वी व्यक्तिमत्त्वाइतकाच यशस्वी झाला आहे असे निश्चितपणे म्हणता येईल.

दिनेश पैठणकर यांनी अतिशय सुरेख अशी मुखपृष्ठाची रचना केली आहे.

**मूल्य ३०० रुपये   सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**आत्मभान**
**गो.श्री. पंतबाळेकुंद्री**




**चाकोरीला विस्तारणारे प्रायोगिक स्वभान**

''शासकीय कामकाज कसे चालावे याबद्दल 'रूल्स ऑफ बिझनेस' नावाची पुस्तिका आहे. त्यात असा नियम आहे, की एखादा घेतलेला निर्णय नियमांनुसार योग्य नाही, असे एखाद्या खात्याला वाटत असेल तर मुख्य सचिवामार्फत ती फाईल राज्यपालांपर्यंत पाठवण्याचे अधिकार त्या खात्याच्या सचिवांना आहेत. कारण सरकारी अधिकारी हा प्रत्येक निर्णय 'राज्यपालांच्या वतीने आणि राज्यपालांकरिता' काढत असतो. त्यामुळे निर्णय घेणारी व्यक्ती निवडून आलेली असली तरी निर्णय मात्र शासनाचे असतात असे गृहीत धरले जाते.''

शासनाच्या सेवेत प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करत असताना अनेक प्रकारचे अनुभव वाट्याला येतात. काही क्रियाशील भरीव कार्य आपल्या हातून झाले याचा सुखद समाधानठेवा आयुष्यभर बाळगण्याचे भाग्य लाभते ते या सेवेतच. तसे गोडकटू अनुभवांचे संचितही टाळता येत नाही. याचे कारण या व्यवस्थापन प्रक्रियेत निर्णय घेणारा कुणी एक असला तरी त्यात अनेकांचा सहभाग असतो. अनेक म्हटले की व्यक्ती तितक्या प्रकृती ही उक्ती मान्य करावी लागते. तरी या शासकीय प्रक्रियेबद्दलचे कुतूहल टाळता येत नाही. केवळ निघालेला आदेश वा सुरू झालेला प्रकल्प एवढेच दृश्यस्वरूप सामान्याच्या नजरेसमोर येते, परंतु त्यामागे असलेली निर्णयप्रक्रिया कशी आणि किती वेळात पार पडते हे तसे केवळ कुतूहलाचे ठरते. असे कुतूहल काही प्रमाणात समाधान तेव्हाच पडेल जेव्हा संबंधित अधिकारी त्यांच्या अनुभवांचे संचित वाचकांसमोर उलगडून दाखवील. गो.श्री. पंतबाळेकुंद्री यांनी अशी अनुभवांची शिदोरी वाचकांच्या हाती दिली आहे. तिचे नाव आहे, 'आत्मभान.'

गो.श्री. पंतबाळेकुंद्री हे सिव्हिल इंजिनीयर असलेले अधिकारी. १९६२ साली शासकीय सेवेत दाखल झाले ते रचना साहाय्यक (प्लॅनिंग असिस्टंट' या पदावर कोल्हापूर येथील कार्यालयात. त्यानंतर ते 'नगर रचनाकार' म्हणून राजवटीत अधिकारी झाले. पुढे साहाय्यक संचालक, नगररचना, अपर सचिव, उपसचिव, उपसंचालक ही पदे त्यांनी भूषवली. त्यांच्या सेवेचा काळ २००९ पर्यंतचा. त्यानंतर नागरी वारसा जतन अर्बन हेरिटेज कॉन्झर्वेशन सोसायटी आणि पर्यावरण सुधारणा सोसायटी या दोन संस्थांचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे.

पंत हे स्वतंत्रवृत्तीचे आहेत. कल्पकता आणि ठाम निर्णय घेण्याची क्षमता ही त्यांची आयुधे आहेत. कायदा, नियम, आपल्या कामातील सर्व बारकावे यांचे चोख आणि अद्ययावत असे ज्ञान त्यांनी संपादन केले. तज्ज्ञ म्हणून ते ओळखले जातात. जे करेन ते नियम आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच, हा कणखरपणा आणि त्यापासून तसूभरही मागे हटणार नाही हा ताठ बाणा त्यांची कवचकुंडले आहेत. अशा कणखर, ताठ, तज्ज्ञ माणसाच्या वाट्याला रोष नावाचे बाण नेहमीच झेलावे लागतात, पंतही त्याला अपवाद नाहीत.

राज्याच्या अनेक जिल्ह्यांत सेवा केल्यानंतर मंत्रालयात स्थिर झाले. मंत्रालयाविषयी त्यांनी संबंधित खात्याच्या मंत्र्यांना स्पष्टपणे बजावले, की 'मंत्रालयाचे काम कायदेकानूनुसार करायचे आहे. वैयक्तिक अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालय नाही. त्यासाठी आपल्यावर दडपण आणावे, असे चालणार नाही.'

'नगररचना' या खात्याच्या अंतर्गत येणारी अनेक कामेही बाह्य विकास आखाडा, राखीव भूखंड, जमिनी या विषयांशी संबंधित असतात आणि याच कामांसाठी अनेकांचे हितसंबंध हस्तांदोलनातून जाणले जातात. परंतु पंतांनी स्वत:च्या विवेकापासून कधीही फारकत घेतलेली नाही. आमदार, मंत्री, मुख्यमंत्री आणि विकासक या सगळ्यांशी पंतांचा संबंध आला आणि प्रत्येकाने आपले हित कायदा गुंडाळून जपावे यासाठी पंतावर दडपण आणले, त्यासाठी अनेकदा खडाजंगी झाली. थेट गडचिरोलीच्या पलीकडे बदली करा, हा माणूस मंत्रालयात नको इतपर्यंत मजल गेली. परंतु द्वारकानाथ कपूर, जोसेफ यांसारखे कर्तव्यनिष्ठ अधिकारी नेहमीच त्यांच्या पाठीशी राहिले. याचे कारण कामावरील चोख निष्ठा आणि कुठलाही आरोपाचा शिंतोडा अंगावर नाही.

त्यांना बॅ. रामराव आदिक, रणजित देशमुख, पतंगराव कदम, अशोक चव्हाण, निलंगेकर–पाटील, शंकरराव चव्हाण, मनोहर जोशी अशा अनेक थोर राजकारणी, मंत्र्यासह, मुख्यमंत्र्यांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्या सगळ्यांचे अनुभव येथे संग्रहित केलेले आहेत. आपल्या कामावर निष्ठा कशी असावी, याचे सूत्र पंतांनी स्वत: निश्चित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी सार्वजनिक हित, जुनी सुंदर शिल्पे भासावीत अशा इमारती, किल्ले यांचे जतन व संवर्धन कसे करता येईल, याच ध्यासाने आपले मूल्य जपले आहे. त्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत, त्याचा लेखाजोखा अतिशय रसाळ पद्धतीने मांडलेला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्याचे अनुभवदर्शन आणि राजकारणीमंडळी प्रशासनाकडे आमजनतेच्या दृष्टीने कशी पाहतात, त्याचे दर्शन यातून झालेले आहे.

सतीश भावसार यांनी मुखपृष्ठाची रचना सुंदर केली आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**


Vaseline
सह-प्रस्तुत
पाहिले न मी तुला
1 मार्च पासून
सोम-शनि | संध्या. 7 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Co-Presenting Sponsor: Vaseline
Streaming Partner: ZEE5

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.